सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**विभागीय माहिती कार्यालय, नाशिक**

**मिडिया सेंटर, बी. डी. भालेकर मैदान, महाकवी कालिदास कलामंदिर समोर, नाशिक ४२२००१**

दूरध्वनी क्र(०२५३) २५९०९५६, २५९०४१२, २५९०९६९ ई-मेल :dydirectornashik@ gmail.com

---

# नाशिक विभाग

## जिल्हा नाशिक

**दै.सकाळ** **दि.१९ ऑगस्ट,२०२५**

सकाळ

# आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेशाची प्रतीक्षा

## दोन महिने उलटले; ११५ कोटींच्या निविदा प्रक्रियेस विलंब

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १८ : शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दोन महिने होऊनही आदिवासी आश्रमशाळांतील दोन लाख विद्यार्थी गणवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. प्रथम सत्र परीक्षा सुरू होत असताना गणवेश केव्हा मिळणार, असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.

राज्यात आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत एकूण ४९७ आश्रमशाळा असून, त्यात पहिली ते बारावीपर्यंत दोन लाख चार हजार ४५८ विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळा सुरू झाल्यापासून रोजंदारी (तासिका) तत्त्वावरील शिक्षकांचे आंदोलन सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यात पालकही सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांअभावी अध्यापनावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. अशा परिस्थितीत शाळा सुरू ठेवण्यासाठी आदिवासी विकास विभाग प्रयत्नशील असला, तरी विद्यार्थ्यांना अद्याप पहिला गणवेश मिळालेला नाही. आश्रमशाळा व वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश आणि इतर मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी आदिवासी विकास विभागाची आहे. मात्र, गणवेश वितरण प्रक्रियेत कायदेशीर अडचणी आल्याने हा विलंब होत आहे.

### तांत्रिक अडचणी

■ **पुरवठादारांशी संबंधित तांत्रिक अडचणी आणि निधी वितरणातील विलंब यामुळे गणवेश वितरण प्रक्रिया ठप्प झाली आहे. कायदेशीर प्रसंग उद्भवल्याने विद्यार्थ्यांपर्यंत गणवेश पोहोचलेले नाहीत. परिणामी आश्रमशाळांतील विद्यार्थी मूलभूत सुविधांपासून वंचित राहत असून, पालक व शिक्षकांमध्ये नाराजी वाढत आहे.**

### ११५ कोटींची निविदा प्रक्रिया

■ **विद्यार्थ्यांना दोन गणवेशांसह शालेयपूरक साहित्य पुरविण्यासाठी आदिवासी विकास विभागाने ११५ कोटींची निविदा काढली आहे. त्यासाठी 'प्री-बिड' बैठकही पार पडली; मात्र आलेल्या आक्षेपांमुळे ही प्रक्रिया रखडली आहे. यातून मार्ग निघेपर्यंत विद्यार्थ्यांना गणवेशासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.**

Nashik, Main
19/08/2025 Page No. 2

सकाळ

# क्रेडाईच्या प्रॉपर्टी प्रदर्शनातून शंभर कोटींची उलाढाल

## प्रदर्शनाचा समारोप; ५० प्लॉट, ५० फ्लॅटचे 'ऑन दी स्पॉट बुकिंग'

सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १८ : पाच दिवसांपासून सुरू असलेल्या प्रॉपर्टी महाकुंभाचा सोमवारी (ता. १८) राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. भविष्यात नाशिकची ओळख 'एज्युकेशन हब' म्हणून होईल, असे त्यांनी आश्वासित केले. पाच दिवसांच्या प्रॉपर्टी महाकुंभातून शंभर कोटींहून अधिक उलाढाल झाली. या वेळी ५० प्लॉट व ५० फ्लॅटचे 'ऑन द स्पॉट बुकिंग' झाले.**






**नाशिक :** क्रेडाई नाशिक मेट्रो आयोजित प्रॉपर्टी महाकुंभाच्या समारोप कार्यक्रमात सोमवारी बोलताना राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे. शेजारी (डावीकडून) 'क्रेडाई'चे मानद सचिव तुषार संकलेचा, प्रदर्शनाचे समन्वयक हृषीकेश कोते, प्रदर्शन कमिटीप्रमुख मनोज खिंवसरा, उपाध्यक्ष उदय घुगे, 'म्हाडा'च्या नाशिक विभागाचे सभापती रंजन ठाकरे, 'क्रेडाई नाशिक मेट्रो'चे अध्यक्ष गौरव ठक्कर, प्रवीण तिदमे, 'क्रेडाई'चे माजी अध्यक्ष कृणाल पाटील, विद्यमान उपाध्यक्ष अनिल आहेर व समन्वयक नरेंद्र कुलकर्णी. दुसऱ्या छायाचित्रात प्रदर्शनात स्टॉलवर झालेली नागरिकांची गर्दी.

क्रेडाई नाशिक मेट्रोच्या वतीने पाच दिवसांपासून प्रॉपर्टी महाकुंभाचे आयोजन करण्यात आले. ठक्कर डोम येथे झालेल्या प्रॉपर्टी महाकुंभाचा समारोप करण्यात आला. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिक्षणमंत्री भुसे म्हणाले, प्रॉपर्टी प्रदर्शनाचा समारोप झाला असला तरी अनेकांसाठी त्यांच्या गृह स्वप्नपूर्तीची सुरुवात झाली आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा होत आहे; या कुंभमेळ्याच्या माध्यमातून नाशिकची ओळख एज्युकेशन म्हणूनदेखील होणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. म्हाडाच्या नाशिक विभागाचे अध्यक्ष रंजन ठाकरे म्हणाले, सर्वांसाठी हक्काची घरे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी नियमातील त्रुटी दूर करून म्हाडाकडून सकारात्मक सहकार्य केले जाईल. क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरव ठक्कर म्हणाले, आंतरराष्ट्रीय दर्जाचे गृहप्रदर्शन अनेक अर्थाने यशस्वी ठरले आहे. प्रदर्शनामुळे नाशिकचे ब्रँडिंग होण्यास मदत झाली. ग्राहकांच्या पसंतीनुसार टाऊनशिप व ॲमिनिटीजसोबतच मोठ्या घरांकडे कल असल्याचे दिसून आले. प्रदर्शनातील प्रतिसादामुळे नाशिकचे अर्थकारण भविष्यात सकारात्मक होईल. या वेळी मानद सचिव तुषार संकलेचा, एक्स्पोचे समन्वयक हृषीकेश कोते, नरेंद्र कुलकर्णी, माजी अध्यक्ष कृणाल पाटील, एक्स्पो कमिटीप्रमुख मनोज खिंवसरा, उपाध्यक्ष अनिल आहेर, उदय घुगे, श्यामकुमार साबळे, प्रवीण तिदमे, कामगार विकास उपायुक्त विकास माळी, मुख्य प्रायोजक दीपक बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्सचे संचालक दीपक चंदे, माजी अध्यक्ष जितूभाई ठक्कर, सुरेश पाटील, अनंत राजेगावकर, किरण चव्हाण, सुनील कोतवाल, उमेश वानखेडे, रवी महाजन आदी उपस्थित होते.

### उत्कृष्ट स्टॉलसाठी पुरस्कार

■ प्रदर्शनात ५० हून अधिक फ्लॅट आणि ५० हून अधिक प्लॉटचे स्पॉट बुकिंग झाले. स्पॉट बुकिंगसाठी ग्राहकांना क्रेडाई नाशिक मेट्रोच्या वतीने चांदीचा शिक्का भेट देण्यात आला. उत्कृष्ट स्टॉलसाठी पुरस्कार देण्यात आले. यात प्रथम पारितोषिक वास्तू ग्रुप, द्वितीय ठक्कर ग्रुप लिमिटेड, तृतीय कन्स्ट्रुवेल प्रा. लिमिटेड, तर चौथे पारितोषिक स्पॅन कन्स्ट्रक्शनला देण्यात आले

सकाळ

# नाशिक-पुणे औद्योगिक द्रुतगती महामार्गाला मंजुरीची प्रतीक्षा

## मंजुरीनंतरच भूसंपादन व इतर प्रक्रिया; समस्या 'जैसे थे'




प्रस्तावित नाशिक-पुणे औद्योगिक महामार्ग.

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १८ : नाशिक-पुणे महामार्गाची झालेली दुरवस्था व वाहतूक कोंडीमुळे पाच तासांहून अधिक कालावधी हे अंतर पार करण्यासाठी लागतो. मात्र नागरिकांना अजूनही काही कालावधी याचप्रकारे प्रवास करावा लागणार आहे. 'एमएसआरडीसी'ने नाशिक-पुणे औद्योगिक द्रुतगती महामार्गाचा प्रस्ताव शासनाकडे दिला आहे. मात्र अजूनही अंतिम मंजुरीची प्रतीक्षा कायम आहे.**

या नवीन मार्गामुळे नाशिक- पुणे मार्गाचा प्रवासासाठी लागणारा कालावधी पाच तासाहून तीन तासांवर येणार आहे. यामुळे नाशिक- पुणे दरम्यानचा प्रवास हा अतिजलद व वेगवान होणार आहे. मंजुरीनंतर सदर महामार्ग उभारण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागेल. पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेच्या मार्गात सध्या अनेक अडथळे असून, हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी प्रलंबित आहे. मात्र औद्योगिक महामार्गाला चालना मिळाल्यास पुणे-नाशिक दरम्यानचे अंतर पाच तासांवरून तीन तासांपर्यंत कमी करण्यासाठी शासनाने एमएसआरडीसीला तसा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले होते. प्रस्तावित पुणे- नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीतून पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाची आखणी करता येईल का याची पडताळणी करावी, असा आदेश दिले होते. सदर महामार्ग पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यातून जाणार आहे. पुढे हा महामार्ग सुरत चेन्नई या ग्रीनफिल्ड महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. नाशिक- मुंबई- पुणे हा विकासाच्या दृष्टीने सुवर्ण त्रिकोण मानला जातो. नाशिक- पुणे महामार्गावरून रोज हजारो वाहने प्रवास करतात. औद्योगिक दृष्टया हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे; मात्र या मार्गाच्या समस्या अनेक वर्षांपासून जैसे थे आहे.

नाशिक शहराच्या आजूबाजूच्या शहरांना जाण्यासाठी वेगवान असे अतिजलद महामार्ग उभारले आहेत; मात्र नाशिक-पुणे मार्गाकडे सुरवातीपासून दुर्लक्ष झालेले होते. त्याला पर्याय म्हणून नाशिक- पुणे हायस्पीड रेल्वे सुरू करण्यात यावी असाही प्रस्ताव विचाराधीन होता. मात्र त्यावरही अंमलबजावणी झालेली नाही. त्यालाच पर्याय म्हणून शासनाने आता १३३ किलोमीटरचा नाशिक- पुणे नवीन महामार्ग उभारण्याची ठरविले आहे. त्यानुसार नियोजन सुरू आहे. एमएसआरडीसीने तसा प्रस्तावही दिला; मात्र मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी दिल्यानंतरच भूसंपादन व इतर प्रक्रिया सुरू होईल. असे एमएसआरडीसीच्या सूत्रांकडून सांगण्यात आलेले आहे.

### दृष्टिक्षेपात

- एकूण प्रकल्प खर्च २८ हजार ४२९ कोटी
- मार्गाची लांबी १३३ किलोमीटर
- नाशिक, संगमनेर, जुन्नर, आंबेगाव, शिरूर व खेड
- इंटरचेंज- चिंचळी, चाकण, खंदरमाळ, साकूर, पाचळ, राहुरी, माची कासारे
- भूसंपादन आवश्यक १५४५ हेक्टर

सकाळ

# सुरत-चेन्नईवरून यंत्रणांमध्ये असमन्वय

## भूसंपादनातील तिढ्यामुळे महामार्गाचे भवितव्य धूसर

नाशिक, ता. १८ : सुरत- चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (न्हाई) हालचाली सुरू केल्या आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन व इतर बाबींवर काम सुरू असून, हा टप्पा अद्याप पूर्ण झाला नाही. महसूल प्रशासनाकडून भूसंपादनाबाबत योग्य समन्वय साधला जात नसल्याने प्रकल्प अधांतरी राहण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारने भारतमाला योजना गुंडाळल्यामुळे या बहुचर्चित प्रकल्पावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र,

पान १० वर

### उद्योग-व्यवसायाला गती

- या महामार्गामुळे उद्योग व व्यवसायाला चालना मिळणार आहे. महाराष्ट्रात लॉजिस्टिक पार्क, संशोधन केंद्रे, गोदाम, कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांना मोठा फायदा होईल. उत्तर महाराष्ट्रातील शेतमाल वेळेत सुरत व दक्षिणेकडील राज्यांत पोहोचणार आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, शिर्डी, सप्तश्रृंगगड या धार्मिक स्थळांच्या महत्त्वातही भर पडणार आहे.

Nashik, Main
19/08/2025 Page No. 1

सकाळ

# जिल्हा परिषदेत पदोन्नती प्रक्रिया स्थगित

## अंतर्गत तक्रारींमुळे अधिकाऱ्यांचा वाद, पुढील आठवड्यात नवी प्रक्रिया

■ सकाळ वृत्तसेवा

> शासन निर्णयाच्या आधारेच पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्यात येईल. त्याचा अभ्यास पूर्ण झाल्यावर पुढील आठवड्यात प्रक्रिया होणार आहे.
>
> **- दीपक पाटील,** प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

नाशिक, ता. १८ : जिल्हा परिषदेतील कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदोन्नतीला सोमवारी (ता. १८) मुहूर्त लाभणार होता. मात्र, अधिकाऱ्यांमधील अंतर्गत तक्रारींमुळे ही प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली. पुढील आठवड्यात नवी प्रक्रिया राबविण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांनी दिले आहेत.

जिल्हा परिषदेतील आठ वरिष्ठ सहायक कनिष्ठ प्रशासन अधिकारी होण्यासाठी पात्र ठरले आहेत. यात दोन महिला व सहा पुरुष कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. समुपदेशन पद्धतीने प्रक्रिया होणार होती. मात्र, सामान्य प्रशासन विभागातील सहायक प्रशासन अधिकारी अनिल गिते यांच्या हस्तक्षेपामुळे ऐनवेळी प्रक्रिया थांबवावी लागली. मुख्य कार्यकारी अधिकारी पवार यांनी गिते यांना याबाबत चांगलेच सुनावल्याचे समजते.

ता. २५ जुलैला शासनाचा पदोन्नतीबाबतचा आदेश निर्गमित झाला होता. तरीही गिते यांनी त्याचा उल्लेख फाईलमध्ये केला नाही, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. तसेच, एका महिला कर्मचाऱ्याला मुख्यालयातच पदोन्नतीसाठी विराजमान करण्याबाबत त्यांनी स्वारस्य दाखविल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, संबंधित कर्मचारी हरकत नोंदविणार असल्याची चर्चा गत आठवड्यापासूनच सुरू होती.

Nashik, Main
19/08/2025 Page No. 2

सकाळ

# महिला लोकशाही दिनात वर्षभरानंतर दोन तक्रारी

## समितीपुढे पीडितांची माहेरून फसवणूक झाल्याची कैफियत

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १८ : जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता. १८) पार पडलेल्या महिला लोकशाही दिनात अवघ्या दोन तक्रारी समितीपुढे प्राप्त झाल्या. विशेष म्हणजे, तब्बल वर्षभरानंतर पहिल्यांदाच समितीकडे तक्रारी दाखल झाल्या असून, त्यात पीडितांची माहेरून फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. समितीने या तक्रारींची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

समाजातील समस्याग्रस्त महिला व पीडितांना न्याय देण्यासाठी दर महिन्यात जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे पीडित महिलांना त्यांच्या समस्या मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार सोमवारी (ता. १८) लोकशाही दिन पार पडला. मात्र, या वेळी केवळ दोन तक्रारी दाखल झाल्या. पहिल्या तक्रारीमध्ये दिंडोरी तालुक्यातील माहेर असलेल्या पीडितेने आपली परवानगी न घेता भावाने परस्पर जमीन विकली. तसेच जमीन विक्रीतून आलेल्या रकमेतील हिस्सा दिला नसल्याची कैफियत मांडली. दुसऱ्या महिलेने तीच्या वडिलांच्या पश्चात भावाने बनावट कागदपत्रांद्वारे कळवणमधील जमीन विक्री, तसेच वडिलांच्या बँक खात्यामधील पैसे काढून घेतल्याची तक्रार केली. गेल्या तीन वर्षांपासून या प्रकरणी लढा देत असताना शासकीय यंत्रणांकडून सहकार्य लाभत नसल्याची व्यथा मांडली. समितीच्या अधिकाऱ्यांनी दोन्ही महिलांचे म्हणणे ऐकून घेताना संबंधितांचे अर्ज त्या-त्या विभागाकडे पाठवून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### लोकशाही दिनाबद्दल उदासीनता

■ **पीडितांना न्याय देण्यासाठी लोकशाही दिन आयोजित केला जातो. पण ऑगस्ट २०२४ नंतर पहिल्यांदा यंदा दोन तक्रार अर्ज समितीपुढे दाखल झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एकूणच परिस्थिती बघता महिलांमधील अनास्था किंवा भीतीमुळे त्या पुढे येत नसतील. याशिवाय यंत्रणांकडून लोकशाही दिनाबद्दल पाहिजे तशी जनजागृती होत नसल्याने अपेक्षित प्रतिसाद लाभत नसल्याची चर्चा आहे.**

सकाळ

# सुरत-चेन्नईवरून यंत्रणांमध्ये असमन्वय

> पान १ वरून

महामार्ग प्राधिकरणाने पुढाकार घेत जबाबदारी स्वीकारली आहे. प्रस्तावित १,२७१ किमी महामार्गामुळे सूरत-चेन्नई प्रवासाचा कालावधी १२- १४ तासांवर येणार आहे. नाशिक- सूरत हे १७६ किमी अंतर अवघ्या सव्वा तासांत पार होऊ शकणार आहे. त्यामुळे या महामार्गाचे महत्त्व अधिक आहे.

सरकारच्या वेळापत्रकानुसार २०२३ मध्ये काम सुरू होऊन २०२६ पर्यंत वाहतूक सुरू होणे अपेक्षित होते. पण घोषणेपासूनच अडथळे निर्माण झाल्याने वेळापत्रक वारंवार लांबले. जुलै महिन्यात भारतमाला योजना गुंडाळल्याने हा प्रकल्प कागदावरच राहील, अशी भीती होती. मात्र, न्हाईच्या पुढाकारामुळे पुन्हा आशा निर्माण झाली आहे.

दरम्यान, ज्या जमिनींचे अधिग्रहण झाले आहे त्यांचे अवॉर्ड जाहीर असून बाधितांना मोबदला वाटप बाकी असल्याचे प्राधिकरणाकडून सांगितले जात आहे. तर महसूल विभागाकडून 'आमच्याकडे पत्रव्यवहारच आलेला नाही' अशी भूमिका घेतली जात आहे. या असमन्वयामुळे प्रकल्पाची डेडलाईन आणखी पुढे ढकलली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## नाशिक जिल्ह्यातील मार्ग

- नाशिक जिल्ह्यात १२२ किमी अंतर
- सुरगाणा (राक्षस भवन) येथे सुरुवात
- पेठ, दिंडोरी, निफाड, नाशिक, सिन्नरमार्गे अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश
- एकूण ९९६ हेक्टर जमिनीचे संपादन आवश्यक

## महामार्गाची वैशिष्ट्ये

- एकूण लांबी : १,२७१ किमी
- सूरत- सोलापूर व सोलापूर- चेन्नई असे दोन कॉरिडॉर
- सहापदरी महामार्ग, कमाल वेगमर्यादा १२० किमी
- गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तमिळनाडू या राज्यांतून मार्ग
- नाशिक, नगर, सोलापूर, कलबुर्गी, कर्नुल, कडप्पा, तिरुपती ही प्रमुख शहरे जोडली जाणार

सकाळ

# गोदावरी पाणीवाटपावर लवकरच तोडगा

## मांदाडे समितीचा अहवाल प्रसिद्ध; अभिप्राय, हरकतींसाठी आवाहन

■ **निखिल रोकडे** :
सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १८ : गेल्या दीड दशकापासून नाशिक-अहिल्यानगर व मराठवाडा भागात गोदावरी नदीच्या पाणीवाटपावरून सुरू असलेल्या संघर्षावर तोडगा निघण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (एमडब्ल्यूआरआरए) समन्यायी पाणीवाटपाचा नवा अहवाल आता मराठी भाषेत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला



आहे. या अहवालावर नागरिक व शेतकऱ्यांनी अभिप्राय व हरकती एका महिन्याच्या आत नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर प्राधिकरण अंतिम निर्णय घेणार आहे.

हा अहवाल १८ ऑगस्टला प्रकाशित झाला असून, यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये तो इंग्रजीत प्रसिद्ध झाला होता. मात्र सर्वसामान्यांना त्यातील तांत्रिक बाबी समजण्यास अडचण येत असल्याने मराठीत आवृत्ती देण्याची मागणी होती. त्यानुसार हा अहवाल आता मराठी भाषेतही उपलब्ध झाला आहे.

### मेंढेगिरी समितीच्या अहवालाला विरोध

■ मेंढेगिरी समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाला होता. या समितीने जायकवाडी धरणाची प्रत्यक्ष साठवण क्षमता, प्रकल्प अहवालातील गृहीतके, नगर व नाशिक जिल्ह्यांतील लाभधारकांना दिलेली आश्वासने यांचा विचार न करता फक्त जायकवाडी धरण भरण्यावरच भर दिला असल्याची टीका करण्यात आली होती. त्यामुळे भंडारदरा व मुळा प्रकल्पातील लाभधारकांवर अन्याय होणार असल्याचे नमूद करून विशेषतः अहिल्यानगरमध्ये या अहवालाला प्रखर विरोध झाला होता.

### ६५ टक्के विरुद्ध ५८ टक्के पाणीसाठ्याचा मुद्दा

■ २०१३ मध्ये मेंढेगिरी समितीने जायकवाडी धरणात कायम ६५ टक्के पाणीसाठा राखावा, अशी शिफारस केली होती. मात्र तत्कालीन महासंचालक प्रमोद मांदाडे यांच्या समितीने जुलै २०२३ मध्ये केलेल्या पुनर्विलोकनानंतर हा टक्का कमी करून ५८ टक्के ठेवण्याचे सुचविले. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील धरणांतून समन्यायी पाणी सोडावे लागत होते. परंतु सात वर्षांत जायकवाडीतील पाणी ६५ टक्क्यांवरच असल्याने प्रत्यक्षात पाणी सोडण्याची वेळ आली नव्हती.

“ बदलती परिस्थिती व विविध घटकांचा सारासार विचार करून गोदावरी पाणीवाटप अहवाल सादर करण्यात आला आहे. तो वस्तुनिष्ठ मांडण्याचा प्रयत्न आहे.

**- प्रमोद मांदाडे,**
निवृत्त महासंचालक (मेरी), अध्यक्ष, गोदावरी अभ्यासगट समिती

### वस्तुनिष्ठ व वास्तववादी अहवाल

मांदाडे समितीने बदलत्या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून निरीक्षणे मांडली असल्याने हा अहवाल अधिक वास्तववादी असल्याचे मानले जाते. आता नागरिकांचे अभिप्राय व हरकती आल्यानंतर यावर अंतिम निर्णय होईल.

सकाळ

# गट-गण प्रसिद्धी लांबणीवर

## आयोगाच्या सूचना : मान्यतेसाठी शुक्रवारची मुदत

**नाशिक, ता. १८ :** राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गट-गणाच्या अंतिम प्रारुप मान्यतेला शुक्रवारपर्यंत (ता. २२) मुदतवाढ दिली आहे. मात्र, अंतिम प्रसिद्धीची तारीख आयोगाने अद्यापही जाहीर केलेली नसल्याने इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नव्याने गट-गणाची प्रारुपरचना तयार करण्यात आली आहे. प्रस्तावित प्रारुपानुसार नाशिक जिल्हा परिषदेत तीन नवीन गटांची भर पडून संख्या ७४ वर पोहोचली आहे. तर पंधरा पंचायत समित्यांमधील गटांची संख्या १४८ झाली आहे. जिल्ह्यातून या प्रारुपावर एकूण ६४ हरकती दाखल झाल्या होत्या. विभागीय आयुक्तांकडे त्यावर रीतसर सुनावणी घेण्यात आली.

सोमवारी (ता.१८) जिल्हाधिकाऱ्यांनी गट-गणाचे अंतिम प्रारुप आयोगाकडे सादर करून त्याला प्रसिद्धी देणे अपेक्षित होते. मात्र, दरम्यान आयोगाने मंगळवारी (ता.१२) नव्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांना प्रारुप अंतिम करण्या साठी चार दिवसांची मुदतवाढ दिली.

नव्या वेळापत्रकानुसार शुक्रवारी (ता.२२) जिल्हाधिकारी गट-गण अंतिम करून ते आयोगाकडे सादर करतील. तसेच अंतिम प्रसिद्धीसाठीचा दिवस ठरविण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना बहाल करण्यात आले आहेत. आयोगाच्या या ऐनवेळच्या भूमिकाबदलामुळे गट-गणाची प्रसिद्धी आता ऑगस्टच्या अखेरच्या आठवड्यातच होणार असून, तोपर्यंत इच्छुकांची 'जीव टांगणीला' लागणार आहे.

Nashik, Main
19/08/2025 Page No. 2

सकाळ

# महापालिका हद्दीला जोडणारे रस्ते १५ मीटर बंधनकारक

## पोच रस्त्यांसाठी जागा देण्याच्या 'एनएमआरडी' चे आवाहन



■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १८ : समृद्धी महामार्गासह प्रस्तावित ड्रायपोर्ट, आयटी पार्क, वाढते औद्योगिकरण, लॉजिस्टीक पार्क, ओझर विमानतळाचा विस्तार व आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याचा विचार करून नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) शहराला जोडणाऱ्या पोच रस्त्यांची किमान रुंदी पंधरा मीटर अनिवार्य केली आहे. भौगोलिक अडथळे असलेल्या रस्त्यांची रुंदी बारा मीटर करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात निवेदन जाहीर केले आहे.

नाशिक शहराचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. शहरात वाढती वाहतूक लक्षात घेऊन [illegible] दिली आहे. समृद्धी व सुरत-चेन्नई ग्रीन फिल्ड महामार्ग [illegible] केंद्र ते इगतपुरी येथे समृद्धी महामार्गाला नाशिक येथे जोडणारा १२८ किलोमीटर महामार्ग तयार केला जाणार आहे. आयटी पार्क, ड्रायपोर्ट, लॉजिस्टीक पार्कमुळे वाहतूक वाढणार आहे. विकासाच्या या सर्वच लक्षात घेता नाशिक महापालिकेच्या हद्दीला लागून असलेल्या अर्थात एनएमआरडीएच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात नागरिकरण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवरील वाढता ताण लक्षात घेऊन निवासी, व्यावसायिक किंवा अन्य प्रकारच्या मालमत्तांचा विकास करण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. यापुढे [illegible] प्रमाणात जागा सोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. एनएमआरडीएने यापूर्वी रस्ता रुंदीकरणात बदल केले.

### काय म्हटलंय नवीन आदेशात?

■ [illegible]

त्यात ग्रामीण मार्ग १५ मीटरवरून १८ मीटर, इतर जिल्हा मार्ग १८ मीटरवरून २४ मीटर, प्रमुख जिल्हा मार्ग २४ मीटरवरून ३० मीटर करण्यात आले आहे. आता ले-आउट करताना प्रमुख रस्त्यांना जोडणारे रस्ते पंधरा मीटर बंधनकारक करण्यात आले आहे.

सकाळ

# नाशिकच्या घाटमाथ्याला आज 'रेड अलर्ट'

नाशिक, ता. १८ : दोन दिवसांपासून जिल्ह्यात हजेरी लावणाऱ्या पावसाचा जोर सोमवारी (ता. १८) वाढला. ग्रामीण भागात ठिकठिकाणी दिवसभरात मध्यम ते जोरदार सरी बरसल्या. हवामान विभागाने जिल्ह्याच्या घाटमाथा परिसराला मंगळवारी (ता. १९) रेड, तर बुधवारी (ता. २०) ऑरेंज अलर्ट दिला आहे. नागरिकांनी सावधानता बाळगावी, अशा सूचना जिल्हा प्रशासनाने केल्या आहेत.

राज्यात पावसाचे धूमशान सुरू आहे. उत्तर महाराष्ट्रातही त्याने जोर पकडला आहे. आठवड्याच्या पहिल्या दिवशी नाशिक शहर व परिसरात रिमझिम सरी बरसल्या. तर ग्रामीण भागात मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस झाला. विशेषतः इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तसेच पेठ आणि सुरगाण्यात विविध ठिकाणी पावसाचा जोर अधिक होता. जिल्ह्यात पावसाच्या पुनरागमनासोबत धरणांमधील पाण्याची आवक वाढत आहे. सद्यःस्थितीत दारणासह दहा धरणांमधून विसर्ग कायम आहे. घाटमाथा भागात पावसाचा जोर वाढल्यास गंगापूर धरणातूनही पाणी सोडण्यात येऊ शकते.

Nashik, Main
19/08/2025 Page No. 3

पुण्य नगरी

# स्थानिक ठेकेदारांचे आजपासून आंदोलन

## मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहनाचा इशारा

**नाशिक :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध प्रकल्पांतर्गत रस्ते, पूल, इमारतींची कामे पूर्ण करूनही गेल्या दोन-तीन वर्षांपासून बिले अडकली असून, प्रलंबित बिलांचा तातडीने निपटारा व्हावा आणि सिंहस्थासाठीच्या कामांकरीता स्थानिक ठेकेदारांना प्राधान्य द्यावे या मागण्यांसाठी बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाच्या नाशिक शाखेने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मंगळवारपासून (दि. १९) दोन दिवस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक व त्र्यंबकेश्वर सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर तब्बल १४०० कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली असून, काही ठराविक बाहेरील ठेकेदारांनाच कामे मिळत आहेत. स्थानिक ठेकेदारांना पूर्णपणे दुय्यम स्थान दिले जात असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक ठेकेदार बेरोजगार झाले असून, प्राधान्य न मिळाल्यास आत्मदहनासारखे टोकाची पावले उचलण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे. सरकारने स्थानिकांना प्राधान्य दिल्यास थोडासा दिलासा मिळेल. सिंहस्थातील कामांमध्ये स्थानिक ठेकेदारांना संधी मिळाल्यास त्यांच्या समस्या सुटतील. मात्र, सध्या पूर्णपणे वंचित ठेवले जात आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

स्थानिक ठेकेदारांच्या संघटनांनी १९ आणि २० ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यानंतरही सरकारकडून सकारात्मक तोडगा न निघाल्यास, २१ ऑगस्टला दुपारी दोन वाजेपर्यंत अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यानंतर सर्व ठेकेदार सामूहिक आत्मदहन करतील, असाही इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

पुण्य नगरी

# पीएम स्वनिधीच्या लाभार्थ्यांना अन्य योजनांचाही मिळणार लाभ

**नाशिक :** केंद्र शासनाच्या 'स्वनिधी से समृद्धी' या योजनेअंतर्गत शहरी भागातील फेरीवाल्यांना व्यवसायाच्या दृष्टीने आता पीएम स्वनिधीबरोबरच इतरही अनेक महत्त्वाच्या योजनांचा लाभ मिळणार आहे. या योजनांच्या माध्यमातून पथविक्रेत्यांना आत्मनिर्भर बनण्यास मोठा हातभार मिळणार आहे.

कोविड महामारीमुळे शहरी भागातील फेरीवाले आणि पथविक्रेत्यांवर मोठा आर्थिक परिणाम झाला. त्यांच्या व्यवसायाला पुनरुज्जीवन देण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) ही योजना १ जून २०२० पासून सुरू आहे. योजनेअंतर्गत फेरीवाल्यांना व्यवसायासाठी आवश्यक खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात येत आहे. याच योजनेअंतर्गत अधिकाधिक लाभ मिळावा, 'स्वनिधी से समृद्धी' या अभियानांतर्गत पीएम स्वनिधी योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग केली जात असून, त्याअनुषंगाने लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देता येणार आहे. त्यानुसार पीएम मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, पीएम सुरक्षा विमा योजना, पीएम जीवन ज्योती विमा योजना, पीएम जनधन योजना, एम. श्रमयोगी मानधन योजना, वन नेशन वन राशन कार्ड, इमारत व इतर बांधकाम कामगार योजना अशा विविध योजनांचा लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

## विभागीय कार्यालयात संपर्क साधावा

■ सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग ऑनलाइन पोर्टलवर भरायची असून, ती ११ ऑगस्ट २०२५ पासून हे काम सुरू झाले आहे. पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज लाभ घेतलेल्या सर्व पथविक्रेत्यांनी आपल्या जवळील नाशिक महापालिकेच्या विभागीय कार्यालयातील एनयूएलएम कक्षात वेळेत संपर्क साधून ही माहिती भरावी, असे अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या उपायुक्त सुवर्णा दखणे यांच्या वतीने कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नाशिक मनपाच्या संबंधित विभागीय कार्यालयाशी साधावा, असे आवाहन मनपाने केले आहे.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# नाशिक शहराला जोडणारे रस्ते होणार १५ मीटर रुंदीचे!

## नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा निर्णय

**नाशिक** : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासह नाशिकमधून जोडला जाणारा समृद्धी महामार्ग, तसेच प्रस्तावित ड्रायपोर्ट, आयटी पार्क, औद्योगीकरणाचा विस्तार, लॉजिस्टिक पार्क आणि ओझर विमानतळाचा विस्तार पाहता नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) शहराला जोडणाऱ्या पोहोच रस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर अनिवार्य केली आहे. त्याचबरोबर भौगोलिक अडथळे असलेल्या रस्त्यांची रुंदी १२ मीटर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासंदर्भात एनएमआरडीएने निवेदन जारी केले आहे.

नाशिक शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. शहरात वाहतुकीची होणारी कोंडी लक्षात घेता जास्तीत जास्त वाहतूक ही शहराबाहेरून वळविण्याच्या दृष्टीने प्रशासन, तसेच शासनाकडून बाह्य रिंगरोडला देखील मान्यता देण्यात आली आहे. समृद्धी व सुरत-चेन्नई ग्रीन फिल्ड महामार्ग, तसेच वाढवण बंदर ते इगतपुरी येथे समृद्धी महामार्गाला भरवीर येथे जोडणारा ११८ किलोमीटर महामार्ग तयार करण्यात येणार असून, त्याचे नियोजनही अंतिम टप्प्यात आहे. नाशिक शहराला लागून भविष्यात आयटी पार्क, ड्रायपोर्ट व लॉजिस्टिक पार्क उभे राहणार आहे. त्यामुळे शहर व जिल्ह्यातील वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. विकासाच्या या बाबी लक्षात घेता नाशिक महापालिकेच्या हद्दीला लागून असलेल्या एनएमआरडीएच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढणार आहे. त्यामुळे रस्त्यांवरील वाढता ताण लक्षात घेऊन निवासी, व्यावसायिक, तसेच अन्य प्रकारच्या मालमत्तांचा विकास करताना त्यालगतच्या रस्त्यांचे रुंदीकरण केले जाणार असून, यापुढील काळात आता ठरवून दिलेल्या नियमानुसारच ले-आउटला परवानगी देऊन नियमानुसार रस्त्यासाठी जागा सोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. एनएमआरडीएने यापूर्वी रस्ता रुंदीकरणात बदल केले. त्यात ग्रामीण मार्ग १५ मीटरवरून १८ मीटर, इतर जिल्हा मार्ग १८ मीटरवरून २४ मीटर, प्रमुख जिल्हा मार्ग २४ मीटरवरून ३० मीटर करण्यात आले आहेत. त्याचबरोबर ले-आउट करताना प्रमुख रस्त्यांना जोडणारे रस्ते १५ मीटर करणे बंधनकारक असेल.

### काय म्हटले आहे नवीन आदेशात?

प्रचलित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यक उपलब्ध पोहोच रस्त्याच्या रुंदीनुसार प्रस्तावाधीन जागेत विकास परवानगी दिली जाते. त्याअनुषंगाने भविष्यातील मोठ्या रुंदीच्या रस्त्यांची आवश्यकता विचारात घेता, पोहोच रस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर अनिवार्य आहे. अपरिहार्य भौतिक किंवा भौगोलिक अडथळे- जसे की नदी, धरण, डोंगर आदींबाबत महानगर प्राधिकरण आयुक्तांच्या पूर्वमान्यतेने किमान १२ मीटर रुंदीचा पोहोच रस्ता संमतीने घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

www.epunyanagari.com

# अकरा नगरपरिषदांची प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध !

**नाशिक :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्याच्या मार्गावर आहे. नगरपरिषदांच्या प्रभाग रचनेच्या वेळापत्रकानुसार प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडून निवडणूक आयोगाकडे सादर झाला होता. आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिल्यानंतर सोमवारी जिल्ह्यातील ११ नगर परिषदांच्या प्रारूप प्रभाग रचना संबंधित नगरपरिषद कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली. त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

नाशिक जिल्ह्यात एकूण ११ नगरपरिषदांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. मनमाड नगरपरिषदेत (३३), येवला (२६), सिन्नर (३०), ओझर (२७), पिंपळगाव बसवंत (२५), चांदवड (२०), इगतपुरी (२१), सटाणा (२४), भगूर (२०), त्र्यंबकेश्वर (२०) आणि नांदगाव नगर परिषदेत (२०) जागांसाठी निवडणूक होणार आहे. यातील ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. प्रारूप प्रभाग रचनेबाबत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर दि. १ ते ८ सप्टेंबर या कालावधीत सुनावणी होईल. त्यांतर यातील शिफारशी विचारात घेऊन अंतिम केलेली प्रभाग रचना पुढील काळात नगरविकास विभागाला सादर केली जाईल. राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम केलेली प्रभाग रचना दि. २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत प्रसिद्ध होणार आहे.

## गट-गणाच्या अंतिम रचनेच्या मान्यतेला शुक्रवारपर्यंत मुदतवाढ

**नाशिक :** राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गट-गणाच्या अंतिम रचनेच्या मान्यतेला शुक्रवारपर्यंत (दि. २२) मुदतवाढ दिली आहे. पण, अंतिम प्रसिद्धीची नवीन तारीख आयोगाने अद्यापही जाहिर केलेली नाही, अशी माहिती प्रशासनाने दिली. त्यामुळे इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी नव्याने गट आणि गणाची प्रारुपरचना तयार करण्यात आली आहे. प्रस्तावित प्रारुपनुसार नाशिक जिल्हा परिषदेत नव्याने तीन गट वाढले असून त्यांची संख्या ७४ वर पोहचली आहे. तर पंधरा पंचायत समित्यांमधील गटांची संख्या १४८ वर पोहचली आहे. जिल्ह्याभरातून या सर्व गट-गणांवर ६४ हरकती दाखल झाल्या होत्या. विभागीय आयुक्तांकडे या हरकतींवर रितसर सुनावणी घेण्यात आली. सोमवारी (दि. १८) जिल्हाधिकाऱ्यांनी गट-गणाची अंतिम प्रारुप आयोगाकडे सादर करताना त्याला प्रसिद्धी देणे अपेक्षित होते. मात्र, दरम्यानच्या काळात आयागाने मंगळवारी (दि. १२) नव्याने आदेश काढले. या आदेशात जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्यास्तरावर गट-गणाचे प्रारुप अंतिम करण्यासाठी चार दिवसांची मुदत वाढवून दिली आहे.

निवडणूक आयोगाच्या नवीन वेळापत्रकानुसार शुक्रवारी (दि. २२) जिल्हाधिकारी गट-गण अंतिम करून त्याचे प्रारुप आयोगाकडे सादर करतील. तसेच अंतिम प्रसिद्धीसाठीचा दिवस ठरविण्याचे अधिकार हे विभागीय आयुक्तांना बहाल करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने ऐनवेळी भुमिका बदल्यामुळे आता ऑगस्टच्या अंतिम आठवड्यातच गट-गणाची प्रसिद्धी होईल. तोपर्यंत इच्छुकांची जीव टांगणीला लागणार आहे.

## मनपाच्या प्रारूप प्रभागरचनेवर ४ सप्टेंबरपर्यंत नोंदवता येणार हरकती

**नाशिक :** महापालिका निवडणुकीसाठी प्रभागरचनेचा सुधारित कालबद्ध कार्यक्रम राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने जारी केला आहे. प्रारूप प्रभागरचनेवरील हरकती व सूचनांसाठी दि. ४ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढविली आहे. या आधीच्या निवडणूक कार्यक्रमानुसार दि. २२ ते २८ ऑगस्ट अशी मुदत होती. मात्र, या कालावधीत येणाऱ्या शासकीय सुट्ट्यांमुळे हरकती व सूचनांसाठी केवळ तीनच दिवस उपलब्ध होत असल्यामुळे सुधारित कार्यक्रम जारी करत मुदत वाढवून देण्यात आली आहे.

ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनेसंदर्भात दाखल याचिकांवरील सुनावणीबाबत सर्वोच्च न्यायलयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग खुला केला आहे. चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार नगरविकास विभागाने २०२२ मध्ये प्रभागरचनेबाबत घेतलेले आदेश कायम ठेवत, महापालिकांना चार सदस्यीय प्रभागरचना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार नाशिक महापालिकेने २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे १२२ सदस्यसंख्या असलेले चार सदस्यीय २९ व तीन सदस्यीय दोन अशा एकूण ३१ प्रभागांची प्रारूप रचना तयार करून ती दि. ५ ऑगस्ट रोजी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर केली आहे. यानंतर नगरविकास विभागाने प्रारूप प्रभागरचनेचा आराखडा राज्य निवडणूक आयोगाला सादर केला असून, दि. २२ ते २८ ऑगस्टदरम्यान प्रारूप प्रसिद्धी, त्यावर हरकती व सूचनांसाठी मुदत दिली होती. आता ही मुदत दि. ४ सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

प्रारूप प्रभागरचनेवरील प्राप्त हरकती व सूचनांसाठी २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान सुनावणी घेण्यात येणार होती. आता ती दि. ५ ते १२ सप्टेंबरदरम्यान घेतली जाईल.

पुढारी

# गणेश मंडळांची आज महापालिकेत बैठक

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीसंदर्भात मंगळवारी (दि.१९) दुपारी ४ वाजता महापालिका मुख्यालय राजीव गांधी भवनात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात नाशिक महानगर गणेशोत्सव महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांची भेट घेत विविध मागण्या केल्या होत्या. त्यानुसार आयुक्तांनी संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते.

यंदाच्या गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. गणेशोत्सव महामंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने गणेश मंडळांना अर्ज केल्यापासून पुढील २४ तासांत मंडप, स्टेज उभारण्यास परवानगी द्यावी, एक खिडकी योजना तसेच मनपा आणि गणेश मंडळ यांच्यातील समन्वयासाठी एका उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी आदी मागण्या महापालिका आयुक्तांकडे केल्या होत्या. गणेशभक्तांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता, कीटकनाशक फवारणी, विविध माहितींचे सूचना फलक लावण्याबाबतही मागणीही करण्यात आली होती. या मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी आयुक्तांनी ही बैठक बोलविली आहे. ही बैठक मुख्यालयातील अधिकारी-पदाधिकारी वाहनतळ, पूर्व गेट येथे होणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी दिली.

नाशिक शहरातील सर्व गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन मनपाचे उपायुक्त नितीन पवार, शहर अभियंता संजय अग्रवाल यांनी केले आहे.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी

# वर्षभरात 36 हजार अपघातांत 15 हजार प्रवाशांचा मृत्यू

## ३० हजार जखमी, प्रति दहा हजार वाहनांमागे सात अपघात





नाशिक : दिलीप सूर्यवंशी

गत वर्षभरात राज्यातील विविध महामार्ग आणि राज्यमार्गावर झालेल्या ३६ हजार ८४ अपघातांमध्ये सुमारे १५ हजार ३३५ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले, तर ३० हजार ७३० प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघातांवर नियंत्रण मिळविण्याचे मोठे आव्हान यंत्रणेपुढे आहे.

पुढारी विशेष

वाहतूक मंत्रालय, सरकारच्या आर्थिक पाहणी अहवाल आणि रस्ता सुरक्षा समितीच्या निरीक्षणानुसार डिसेंबर २०२४ मध्ये मोटार वाहनांची संख्या ४.८८ कोटी, तर प्रति दहा हजार वाहनांमागे सात अपघात अशी नोंदवली गेली. २०१५ मध्ये हेच प्रमाण २५ होते. २०२४ मध्ये अपघातांच्या संख्येत घट आणण्यात यश आले असले तरी, अद्यापही अपघातांचे प्रमाण मोठे आहे. ते कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. अपघात रोखण्यासाठी दरवर्षी रस्ते सुरक्षा या संकल्पनेवर आधारित पथनाट्य आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात, तर रस्ते सुरक्षा उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी जानेवारी महिन्यात रस्ते सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येतो.

### अपघातांची प्रमुख कारणे

- **चालकाची चूक** : ८० टक्के अपघात हे चालकाच्या चुकीमुळे होतात. यासाठी चालकांना योग्य प्रकारचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.
- **अतिवेग** : सर्वाधिक अपघात आणि मृत्यूमागचे मुख्य कारण वाहनाचा अतिवेग आहे. अतिवेगामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटते जे अपघाताला कारणीभूत ठरते. महामार्गावर सजगपणे वेगावर नियंत्रण ठेवाचे फलक लावलेले असतात. सूचना दिलेल्या असतात त्यांचे पालन करणे गरजेचे आहे.
- **मद्यप्राशन करून वाहन चालवणे** : अनेक वेळा चालक मद्यप्राशन करून वाहन चालवितात, यामुळे वेगावर नियंत्रण राहत नाही, परिणामी वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होतो.
- **थकवा / झोपेत वाहन चालवणे** : खासकरून ट्रकद्वारे लांब पल्ल्याच्या वाहनांचा अपघात होण्याची शक्यता असते. वाहन चालविताना थकवा किंवा झोप येणे यामुळे चालकाचे मेंदूवरील नियंत्रण सुटते अन् रात्री-अपरात्री अपघात घडतो.
- **मोबाइल वापरणे** : वाहन चालविताना निष्काळजीपणे मोबाइल वापरल्याने ड्रायव्हिंगकडे दुर्लक्ष होते. कॉल, मेसेज, सोशल मीडिया यामुळे लक्ष विचलित होते. परिणामी अपघात घडण्याची शक्यता वाढते.
- **वाहन चालविण्याचा अनुभव नसणे** : नवे ड्रायव्हर, परवाना नसलेले चालक वाहन चालवितात यामुळे अपघात घडतो.
- **वाहन संबंधित कारणे** : ब्रेक, टायर, स्टेअरिंग, हेडलाइट यांची खराब अवस्था यामुळे चालकाला वाहनावर नियंत्रण ठेवणे अवघड होते.
- **ओव्हरलोडिंग** : वाहतूक शाखेकडून नियमित तपासणी होत नसल्याने अधिक भाड्याच्या हव्यासापोटी वाहनचालकांकडून ओव्हरलोडिंग केली जाते. अधिक प्रवासी आणि अधिक माल भरणे यामुळे वाहन चालविणे अवघड होते.
- **रस्ता व वाहतूक व्यवस्थापनातील कारणे** : रात्रीच्या वेळी वाहन चालविताना खड्डे, अंधार, चुकीची वळणे यामुळे अपघात घडतात. याशिवाय वाहतूक नियमांचे पालन न करणे (सिग्नल तोडणे, चुकीच्या बाजूने वाहन चालवणे), रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग, अतिक्रमण, अपुरे वाहतूक चिन्ह (साइन बोर्ड, स्पीडब्रेकर) आदींमुळेही अपघात घडतात.
- **हवामान व नैसर्गिक कारणे** : जोरदार पाऊस, धुके, वादळी वारे दृश्यमानता कमी होते. पावसाळ्यात ओले रस्ते किंवा निसरडे रस्ते तयार होतात यामुळे वाहन घसरून अपघात होतात.
- **इतर कारणे** : पादचारी, सायकलस्वारांच्या चुकीचा वापर, रस्ता अचानक ओलांडणे, जनावरे, रस्त्यावर अचानक रस्त्यावर येणे.

### शासनाकडून केले जाणारे उपाय

- **सीसीटीव्ही कॅमेरे** : वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ३६ हजारांपेक्षा अधिक कॅमेरे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक ठिकाणी बसविण्यात आले.
- **ई-चलन प्रणाली** : वाहतूक नियम मोडणाऱ्यांकडून ई-चलन प्रणालीद्वारे दंड वसूल करण्यात येत आहे.
- **खड्डेमुक्ती प्रकल्प** : २०२४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने ८ हजारांपेक्षा अधिक रस्ते दुरुस्त केले.
- **अतिवेगावर नियंत्रण** : हायवे व शहरी रस्त्यांवर स्पीडगन, कॅमेरे, ई-चलन, दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई, नियमित अल्कोहोल टेस्ट, हेल्मेट, सीटबेल्ट सक्ती, दंड व जनजागृती मोहिमा.
- **व्यावसायिक चालकांचे प्रशिक्षण** : ट्रक, बसचालकांसाठी खास रस्ता सुरक्षा कोर्स.
- **वाहन फिटनेस तपासणी** : दरवर्षी वाहनांची तांत्रिक तपासणी.
- **रस्ते व वाहतूक व्यवस्थापन सुधारणा** : वारंवार अपघात होणारी ठिकाणे दुरुस्त करणे.
- **स्मार्ट ट्रॅफिक सिग्नल** : रस्त्यांवर रिफ्लेक्टर, साईनबोर्ड, स्पीडब्रेकर बसविणे.
- **खड्डेमुक्त रस्ते अभियान** : विशेषतः पावसाळ्यात पादचारी पूल, झेब्रा क्रॉसिंग वाढवणे.
- **जनजागृती मोहिमा** : दरवर्षी जानेवारीत रस्ता सुरक्षा सप्ताह, शाळा-कॉलेजमध्ये रस्ता सुरक्षा शिक्षण तसेच सोशल मीडियावर ड्राइव्ह सेफ अभियान राबविणे.
- **कायदे व धोरणे** : मोटर वाहन (दुरुस्ती) कायदा, २०१९ - दंड व शिक्षा कठोरपणे राबविणे.
- **आपत्कालीन सेवा** : हेल्पलाइन १०८ चा वापर करण्यासंदर्भात जनजागृती करणे, अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णालयात नेणे, अपघात झाल्यास हायवे पेट्रोलिंग यंत्रणेद्वारे तत्काळ मदत उपलब्ध करून देण्यात येते.
- **गोल्डन अवर उपचार योजना** : अपघातानंतरच्या पहिल्या एक तासात मोफत उपचार.

पुढारी

# 'एनएमआरडीए' क्षेत्रात किमान 15 मीटरचे रस्ते

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

आगामी सिंहस्थ कुंभमेळा तसेच प्रस्तावित ड्रायपोर्ट, आयटी पार्क, वाढते औद्योगिकरण, लॉजिस्टिक पार्क, ओझर विमानतळाचा विस्तार लक्षात घेता नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा (एनएमआरडीए)ने नाशिक शहराला जोडणाऱ्या पोच रस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर अनिवार्य केली आहे. भौगोलिक अडथळे असलेल्या रस्त्यांची रुंदी १२ मीटर केली जाणार आहे.

शहराचा विस्तार मागील काही वर्षांत झपाट्याने वाढत आहे. महापालिका हद्दीलगतच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाच्या हद्दीतील भागाच्या विकासासाठी आराखडा तयार केला जात आहे. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन या आराखड्यातील रस्त्यांची रुंदी निश्चित करण्यात आली आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहराची गरज लक्षात घेता, बाह्यरिंग रोडलाही मान्यता देण्यात आली आहे. समृद्धी व सुरत - चेन्नई ग्रीन फिल्ड महामार्ग तसेच वाढवण बंदर ते इगतपुरी येथे समृद्धी महामार्गाला भरविहीर येथे जोडणारा ११८ किलोमीटर महामार्ग तयार केला जाणार आहे. आयटी पार्क, ड्रायपोर्ट, लॉजिस्टिक पार्कमुळे वाहतूक वाढणार आहे. त्यामुळे एनएमआरडीमार्फत रस्त्यांचे रुंदीकरण केले जाणार आहे. एनएमआरडीएने यापूर्वी रस्ता रुंदीकरणात बदल केले, त्यात ग्रामीण मार्ग १५ मीटरवरून १८ मीटर, इतर जिल्हा मार्ग १८ मीटरवरून २४ मीटर, प्रमुख जिल्हा मार्ग २४ मीटरवरून ३० मीटर करण्यात आले आहे. आता ले - आउट करताना प्रमुख रस्त्यांना जोडणारे रस्ते १५ मीटर बंधनकारक करण्यात आले आहेत.



### असा आहे आदेश...

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. माणिकराव गुरसळ यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आले आहेत. प्राधिकरणाकडे विकास परवानगीसाठी प्राप्त होणाऱ्या बहुतांश प्रस्तावाखालील जागांस, नजीकच्या सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या जागांतून संबंधित जागामालकांच्या संमतीने पोच रस्ता उपलब्ध करून घेण्यात येतो. प्रचलित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील तरतुदींनुसार आवश्यक उपलब्ध पोच रस्त्याच्या रुंदीनुसार प्रस्তাবाधिन जागेत विकास परवानगी दिली जाते. त्या अनुषंगाने भविष्यातील मोठ्या रुंदीच्या रस्त्यांची आवश्यकता विचारात घेता, पोच रस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर अनिवार्य करण्यात आली आहे. अपरिहार्य भौतिक किंवा भौगोलिक अडथळे जसे की, नदी, धरणे, डोंगर आदींबाबत महानगर आयुक्तांच्या पूर्वमान्यतेने किमान १२ मीटर रुंदीचा पोच रस्ता संमतीने घेण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

पुढारी

# विभागीय आयुक्त शुक्रवारी जाहीर करणार प्रभागरचना

- जि.प. गण–गट रचना आराखडा सादर

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने गट-गण प्रारूप आराखड्यावर झालेल्या सुनावणीनंतर काही दुरुस्त्या, नवीन बदल करून करण्यात आलेला गट, गण रचना आराखडा सोमवारी (दि.१८) विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना सादर करण्यात आला. अंतिम झालेल्या प्रभागरचना जाहीर करण्याचे अधिकार निवडणूक आयोगाने विभागीय आयुक्तांना दिले असल्याने ते शुक्रवारी (दि.२२) जाहीर करणार आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी नव्याने गट, गण आराखडा जाहीर करण्यात आल्यानंतर निर्धारित कालावधीत जिल्ह्यातून एकूण ६४ हरकती प्राप्त झाल्या होत्या. सर्वाधिक हरकती निफाड तालुक्यात १८, त्या खालोखाल नाशिक तालुक्यात १४, मालेगावला १२, चांदवडला ४, देवळा ३, नांदगाव आणि सिन्नर प्रत्येकी दोन, तर त्र्यंबक, येवला, पेठ, सुरगाणा आणि कळवण येथे प्रत्येकी एक हरकत नोंदवण्यात आली. इगतपुरी, दिंडोरी आणि बागलाण या तालुक्यांतून कोणतीही हरकत प्राप्त झाली नव्हती. तहसील कार्यालयांमध्ये प्राप्त हरकती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविल्यानंतर त्या हरकती अभिप्रायासह विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आल्यानंतर त्यावर ११ ऑगस्टपर्यंत सुनावणी घेऊन या हरकती निकाली काढण्यात आल्या. यात ४३ हरकती फेटाळण्यात आल्या आहेत. सात मान्य तर, १३ अशंत: मान्य करण्यात आल्या आहे. मालेगाव तालुक्यातून प्राप्त १३ पैकी पाच हरकती मान्य तर, तीन हरकती फेटाळण्यात आल्या पाच अंशतः मान्य करण्यात आल्या. नांदगाव तालुक्यातून प्राप्त तिन्ही हरकती फेटाळण्यात आल्या आहेत. येवल्यातही हरकती नाकरण्यात आल्या आहे. सर्वाधिक १९ हरकती निफाड तालुक्यातून आल्या होत्या. मात्र, यातील एकही हरकत मान्य झालेली नाही. नाशिक तालुक्यात पाच हरकती अमान्य तर, आठ हरकती अंशतः मान्य करण्यात आल्या. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील प्राप्त एकमेव हरकत मान्य करण्यात आली. सिन्नमधील दोन्ही, देवळ्यातील तिन्ही, कळवणमधील एक हरकत अमान्य करण्यात आली. सुरगाण्यातील दोनपैकी एक अमान्य एक मान्य करण्यात आली. पेठ तालुक्यातील एकही हरकत मान्य करण्यात आली नाही. चांदवड तालुक्यातील पाचही हरकती अमान्य करण्यात आलेल्या आहेत.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

पुढारी

# सिंहस्थासाठी २२ ठिकाणी वाहनतळ उभारणार

## ८ रस्त्यांवरील २६३ हेक्टर जागेवर पार्किंग

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सिंहस्थ कुंभमेळ्यात येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या गर्दीचे तसेच वाहनतळांचे नियोजन प्रशासनामार्फत आतापासूनच सुरू करण्यात आले आहे. शहरात येणाऱ्या आठ प्रमुख रस्त्यांवर पार्किंगसाठी २२ ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, जवळपास २६३ हेक्टर क्षेत्रावर पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. विशेष म्हणजे भाविकांना अधिक पायपीट करावी लागू नये यासाठी पार्किंगपासून नदीघाटापर्यंतचे अंतर दोन ते अडीच किलोमीटरपेक्षा अधिक असणार नाही, यादृष्टीने वाहनतळांचे नियोजन करण्याचे निर्देश आयुक्त मनीषा खत्री यांनी दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी महापालिकेला वाहनतळांचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार नाशिक महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे वाहतूक व्यवस्थापन आणि पार्किंग सुविधांसाठी नियोजन सुरू केले आहे. यासंदर्भात सोमवारी (दि.१८) महापालिका आयुक्त खत्री यांच्या अध्यक्षतेखाली या सर्व विभागांची बैठक पार पडली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक किरण भोसले, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खाडवी, जलसंपदाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, शहर अभियंता संजय अग्रवाल, वाहतूक सेलचे कार्यकारी अभियंता रवींद्र बागूल यांच्यासह रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महापालिकेने तयार केलेल्या पार्किंग आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

> “ सर्व विभागांतील अधिकारी संयुक्त पाहणी दौरा करणार आहेत. भाविकांची पायपीट होऊ नये यासाठी घाट आणि पार्किंगचे अंतर कमीत कमी ठेवण्याचे नियोजन आहे.
>
> **- प्रदीप चौधरी,**
> अतिरिक्त आयुक्त, मनपा

**पार्किंगस्थळांची संयुक्त पाहणी करणार :** पार्किंग स्थळांमध्ये पेठ रोड, दिंडोरी रोड, धुळे रोड, पुणे रोड, गंगापूर रोड, त्र्यंबक रोड, मुंबई रोड, छ. संभाजीनगर रोड आदींचा समावेश आहेत. या पार्किंग स्थळांची बुधवारी (दि.२०) वाहतूक सेल, एसटी महामंडळ, रेल्वे अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस अधिकारी हे संयुक्त पाहणी करणार आहेत. या पाहणीचा अहवाल येत्या २१ तारखेला विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे होणाऱ्या बैठकीत सादर केला जाणार आहे.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुढारी

# कनिष्ठ सहायकांच्या पदोन्नती रद्द करण्याची नामुष्की

## जि. प. सामान्य प्रशासन विभागाचे कामकाज पुन्हा चर्चेत

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा परिषदेतील रखडलेल्या कनिष्ठ प्रशासन अधिकारीपदी पदोन्नतीला सोमवारी (दि.१८) मुहूर्त लागला खरा. मात्र, सामान्य प्रशासन विभागातील सहायक प्रशासन अधिकारी अनिल गिते यांनी भलताच पुढाकार घेतल्याने ऐनवेळी ही प्रक्रिया रद्द करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी संबंधित गिते यांची चांगलीच खरडपट्टी काढली.

जिल्हा परिषदेतील आठ वरिष्ठ सहायक हे कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदाच्या पदोन्नतीसाठी पात्र ठरले होते. यात दोन महिला, तर सहा पुरुष कर्मचाऱ्यांचा समावेश होता. समुपदेशनाने ही पदोन्नती प्रक्रिया राबविण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार सोमवारी ही प्रक्रिया राबविण्यात येणार होती. प्रशासनाने १२ ऑगस्टला पत्र काढून या आठ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पाचारण केले होते. मात्र, सोमवारी प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी एका कर्मचाऱ्याने हरकत नोंदविल्याने ही प्रक्रिया ऐनवेळी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पवार यांनी गिते यांना चांगलेच सुनावले.

दि. २५ जुलैच्या शासन आदेशानुसार पदोन्नती राबविण्याबाबत संबंधिताने हरकत घेतली. त्यामुळे हा शासन आदेश निघून २० दिवस झाले होते. त्यावर, गिते यांनी फाइलमध्ये उल्लेख का केला नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे, एका महिला कर्मचाऱ्याला पदोन्नतीने मुख्यालयातच विराजमान करण्यासाठी गिते यांनी स्वारस्य दाखविल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, सोयीच्या पदस्थापनेसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची चर्चा रंगली आहे. संबंधित कर्मचारी हरकत नोंदविणार असल्याची ओरड गत आठवड्यापासून करण्यास सुरुवात झाली होती. पदोन्नतीच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्याने दाखविलेले धाडस अंगाशी आल्याने संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी नेमकी काय कारवाई करणार, याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### वादग्रस्त अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

काही दिवसांपूर्वी शिक्षण विभागातील सहायक प्रशासन पद रिक्त झाल्यावर लागलीच विभागाने तेथे अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. मात्र, बांधकाम विभाग एकमध्ये वरिष्ठ सहायक हे पद फेब्रुवारीत रिक्त होऊनही ते पद तीन महिने रिक्त ठेवले होते. बांधकाम विभाग तीनमध्ये वरिष्ठ सहायक यांची नियुक्ती केली. परंतु, तो न्यायालयीन वाद असल्याचे दाखविण्यात आले होते. अंतर्गत टेबल बदलण्यातही नियमबाह्य पद्धतीने ठराविक कर्मचाऱ्यांना विभाग, टेबल देण्यात आल्याच्या तक्रारी झाल्या. त्यामुळे या वादग्रस्त अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी कर्मचारी वर्गाकडून होऊ लागली आहे.




> कनिष्ठ प्रशासन अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया सोमवारी आयोजित केली असता एका कर्मचाऱ्याने हरकत नोंदविली. त्यामुळे ही प्रक्रिया स्थगित केली असून, पुढील आठवड्यात ही प्रक्रिया राबविली जाणार आहे.
>
> **-दीपक पाटील,**
> प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प.

पुढारी

# नाशिकला 'सर्किट बेंच'साठी हुंकार

## बार असोसिएशनकडून हालचाली; सरकार व उच्च न्यायालयाकडे करणार मागणी

**सिडको : पुढारी वृत्तसेवा**

उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसह वकिलांना दिलासा देण्यासाठी नाशिकमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच (खंडपीठ) सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नाशिक बार असोसिएशन आणि स्थानिक वकिलांकडून यासाठी हालचाली गतिमान झाल्या असून, यासंदर्भात राज्य सरकार आणि उच्च न्यायालयाकडे मागणी केली जाणार आहे. सध्या नाशिककरांसह उत्तर महाराष्ट्रातील पक्षकार आणि वकिलांना मुंबई उच्च न्यायालयात जावे लागते. हा प्रवास वेळखाऊ आणि आर्थिकदृष्ट्या त्रासदायक ठरत असल्याने न्याय मिळवण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची होते.



राज्यात सध्या मराठवाड्यासाठी औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे तर विदर्भासाठी नागपूर येथे सर्किट बेंच आहे, तर रविवारी (दि. १७) कोल्हापूर येथे सरन्यायधीश भूषण गवई यांच्या उपस्थितीत उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरू झाले आहे. याच धर्तीवर नाशिक विभागासाठी सर्किट बेंच सुरू करण्याची मागणी पुढे आली आहे. नाशिक हे उत्तर महाराष्ट्राचे केंद्रस्थान असून येथून धुळे, जळगाव, अहमदनगर आणि नंदुरबार या जिल्ह्यांसाठी प्रवास करणे सोयीचे आहे. नाशिकमध्ये सर्किट बेंच सुरू झाल्यास या सर्व जिल्ह्यांतील हजारो पक्षकारांना आणि वकिलांना मोठा फायदा होणार आहे. तसेच उच्च न्यायालयातील खटल्यांचा निपटारा लवकर होण्यास मदत होऊन जलद गतीने न्याय मिळवणे सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> नाशिकमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरू करण्याचा विषय बार असोसिएशनच्या बैठकीत घेण्यात आला आहे. नाशिक येथे नवीन जिल्हा न्यायालय इमारतीचे उद्घाटन २७ सप्टेंबर रोजी होत आहे. त्यावेळी मुख्यमंत्री, वरिष्ठ न्यायमूर्ती व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यावेळी याबाबत मागणी केली जाणार आहे.
>
> **- ॲड. नितीन ठाकरे**, अध्यक्ष, नाशिक बार असोसिएशन

> उच्च न्यायालयात जाण्यासाठी वेळ, पैसा खर्च होण्याबरोबरच मानसिक त्रासही सहन करावा लागतो. त्यामुळे नाशिकला उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरू झाले तर नाशिककरांसह उत्तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना सोयीचे होईल.
>
> **- ॲड. प्रशांत जाधव**

> राज्यात मुंबई, नागपूर, संभाजीनगर आता कोल्हापूरला सर्किट बेंच सुरू झाले आहे. नाशिकला प्रादेशिक विभागासाठी उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरू होण्याची गरज आहे. यामुळे पक्षकारांसह वकिलांची होणारी परवड थांबेल.
>
> **ॲड. सागर कडभाने**

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## आदेश : कपालेश्वर मंदिर-विश्वस्त प्रकरणी

# एका वर्षात अंतिम निर्णय द्या

**आपलं महानगर वृत्तसेवा**

**पंचवटी ।** कपालेश्वर मंदिर विश्वस्त संस्थेच्या कारभारावर सुरू असलेल्या दीर्घकालीन वादात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. प्रथम अपील निकाली काढताना न्यायालयाने नाशिक जिल्हा न्यायालयाला ट्रस्ट सूट क्र. २/२०११ कायद्यानुसार एका वर्षाच्या आत अंतिम निकाल देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

कपालेश्वर मंदिराचा इतिहास शेकडो वर्षापूर्वीचा असून, त्याचा उल्लेख प्राचीन धार्मिक ग्रंथांतही आहे. मंदिराबाबतचा हक्काचा दस्तऐवज मुघलकालीन असून, ११६३ चा आहे. मंदिराच्या कारभारासाठी २० एप्रिल १९२३ रोजी जिल्हा न्यायालयाने योजना मंजूर केली होती. २००४ मध्ये तत्कालीन विश्वस्तांवर गैरव्यवहाराचे आरोप सिद्ध झाल्याने धर्मादाय आयुक्तांनी त्यांना पदावरून दूर केले. त्यानंतर सात जणांना फिट पर्सन म्हणून नियुक्त केले. ज्यात चार सरकारी अधिकारी व तीन खासगी व्यक्ती होत्या. त्याच वर्षी १ नोव्हेंबरला मंदिरासाठी नवी योजना जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आली. मात्र, ही योजना २१ वर्षांपासून प्रलंबित आहे. धर्मादाय कार्यालयाकडून २०२३ मध्ये सात खासगी व्यक्तींना दोन वर्षांच्या कालावधीसाठी विश्वस्त म्हणून नेमण्यात आले होते. त्यांचा कार्यकाळ २७ जून २०२५ रोजी संपुष्टात आला. अपीलाच्या सुनावणीदरम्यान, २५ जून २०२५ रोजी उच्च न्यायालयाने नवीन विश्वस्त नेमण्यास मनाई करत कारभार पाहण्यासाठी धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातील अधिकाऱ्याला प्रशासक म्हणून नियुक्तीचे निर्देश दिले. सध्या जे प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत तेच कामकाज पाहतील. त्र्यंबकेश्वर, सप्तशृंगी गड आणि श्री काळाराम मंदिर या ठिकाणी असलेल्या कार्यकारिणीप्रमाणे कपालेश्वर संस्थेच्या कार्यकारिणीची निर्मिती व्हावी. संस्थानचे अध्यक्ष पद न्यायाधीशांकडे असावे, अशी काही भक्तांनी इच्छा व्यक्त केली आहे.

### न्यायालयाचे मुख्य आदेश

- ट्रस्ट सूट क्र. २/२०११ जिल्हा न्यायालयाने एका वर्षाच्या आत अंतिमतः निकालात काढावा
- संयुक्त धर्मादाय आयुक्त, नाशिक यांना या प्रकरणात पक्षकार करावे
- सार्वजनिक नोटीस देऊन इच्छूक व्यक्ती व प्रलंबित अर्जदारांना ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत सूचना/अर्ज सादर करण्यास संधी द्यावी
- आवश्यक असल्यास ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतरिम विश्वस्तांची नियुक्ती करावी
- ट्रस्ट सूट निकाली येईपर्यंत सध्याचे प्रशासक कारभार पाहत राहील

www.mymahanagar.com
आपलं महानगर | My महानगर.com

# सिंहस्थाच्या विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरवा

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर येथे २०२६- २०७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त भूसंपादनासह विविध विकासकामांना गती द्यावी. सर्व कामांचे नियोजन करत ती कालबद्ध वेळेत पूर्ण करावीत. सर्व कामे गुणवत्तापूर्ण होतील याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले.




नाशिक त्र्यंबकेश्वर येथील आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने करावयाच्या कामांचा विषयानुरूप आढावा घेतल्यानंतर महाजन म्हणाले की, आगामी कुंभमेळा विकास कामासंदर्भात कोणताही विलंब नको. सर्व कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. विकास कामे नियोजनबद्ध व दर्जेदार होतील याची सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी. ही कामे पूर्ण करताना त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा. त्यातही रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच कुंभमेळ्यात लोकसहभाग वाढविण्यासाठी उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत रिंगरोड भूसंपादन, त्र्यंबकेश्वर - गोदावरी पाणीपुरवठा योजना, घाटांचे बांधकाम, साधुग्राम भूसंपादन, रस्ते बांधकाम, रेल्वे स्थानक, ओझर विमानतळ विकास कामे आदींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त नायर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, पोलीस अधीक्षक पाटील, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. श्रिया देवचक्के यांनी आपापल्या विभागांतर्फे सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# चायना मेड सी बँड रडारमुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात



**नाशिक :** मराठवाड्यासह देशात चायना मेड सी बँड डॉप्लर रडारसाठी काही लोक आग्रही आहेत. या चायना मेड सी बँड रडारचा डेटा थेट चीनकडे पोहोचत असल्याचे गंभीर संकेत असून, त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली असल्याचा इशारा ढगफुटी तज्ज्ञ तथा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरोलॉजीचे (आयआयटीएम) माजी संशोधक प्रा. किरणकुमार जोहरे यांनी दिली आहे.

देशी बनावटीचे एक्स बँड डॉप्लर रडार हे ढगातील अगदी बोटांच्या पेराएवढ्या भागात किती बाष्प, पाणी व बर्फकण आहेत याची इतंभूत माहिती देत दुष्काळ, ढगफुटी किंवा वातावरणातील बदल अत्यंत अचूक माहिती देते. एक्स बँड डॉप्लर रडार हिमालयात देखील कार्यरत झाली आहे. मात्र नाशिक, मुबई, पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजनगर येथे विविध कारणे देत ते कार्यान्वित करण्यासाठी अदृश्य शक्तींच्या दबावाखाली 'टेक्निकल' कारणांच्या नावाखाली 'अर्थपूर्ण' टाळाटाळ होत आहे की कसे याचा शोध गरजेचा आहे.

एक्स बँड डॉप्लर रडारऐवजी कमी दर्जाची चिनी रडार यंत्रणा आणण्यासाठी काही देशविघातक लोक कार्यरत आहेत की काय याचा जनहित व राष्ट्रीय सुरक्षा लक्षात घेत शासनाने तातडीने छडा लावून दोषींवर कठोर कार्यवाही करणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अपरिहार्य बनले आहे.

प्रा. जोहरे यांना अमेरिका, ब्रिटन, जपान, जर्मनी आणि ऑस्ट्रेलियासह १०० देशांमध्ये ढगफुटी तज्ज्ञ म्हणून मान्यता प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्राला विखुरलेल्या पावसासह सप्टेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ ढगफुटींचा घटनांचा सामना करावा लागू शकतो, असे ही आंतरराष्ट्रीय हवामान तज्ज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी सुचित केले. त्यांची "अंदाज नव्हे, माहिती"

## एक्स बँड डॉप्लर रडार अन् रियल टाईम अलर्ट

देशभरासह महाराष्ट्रात देखील आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण कक्षासह एक्स बँड डॉपलर रडारचे नेटवर्क उभारणे गरजेचे आहे. ८ ते १२ गिगाहर्टझ फ्रिक्वेन्सी वर काम करणारे एक्स बँड डॉप्लर रडारचे जाळे तातडीने कार्यान्वित होणे गरजेचे आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), पीएलसी, स्काडा ब्लॉकचेन आदी एडव्हान्स टेक्नोलॉजीचा वापर करीत देशातील प्रत्येक नागरिकाला व शेतकऱ्यांना मोबाईलवर रियल टाइम (घटना घडत असतांनाच) अॅलर्ट व इन्फोर्मेशन देत, देशातील तात्काळ आपत्तकालीन यंत्रणा सज्ज ठेवून योग्य समन्वय साधणे गरजेचे असल्याचे आवाहनही प्रा. जोहरे यांनी केले आहे.

आपल्या बातम्या, आपल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# सोयगाव तालुक्यात एकाच रात्री अतिवृष्टी

## सोयगाव, जरंडी मंडळात सरासरी शंभरी गाठली; वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो

आपलं महानगर वृत्तसेवा

**सोयगाव ।** सोयगाव सह तालुक्यात प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर शनिवारी रात्री पाच तास झालेल्या पावसाने सोयगाव आणि जरंडी या दोन मंडळात शंभरी गाठली असून एकाच रात्रीतून वेताळवाडी धरण ओव्हरफ्लो झाले आहे त्यामुळे सोयगावची सोना नदी रविवारी पहाटे दुथडी भरून वाहत होती.

तालुक्यात चारही महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून मोठ्या प्रतिक्षेनंतर सावळदबारा मंडळात ९५ मी मी पाऊस झाला आहे.

दरम्यान सोयगाव चे वेताळवाडी धरण ओव्हरफ्लो झाले या धरणाच्या सांडव्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे त्यामुळे सोना नदीला मोठा पूर आला होता सोयगाव मंडळात तीन महिन्यांत पहिल्यांदा अतिवृष्टीचा पाऊस झाला आहे पाच तासात सोयगाव मंडळात १०८ मी मी तर जरंडी मंडळात १०५ मी मी पाऊस झाला त्यामुळे सोयगाव शिवारात मका,कपाशी,पिके पाण्यात बुडाली आहेत बनोटी मंडळात ६२ मी मी पाऊस झाला.



या भागात हा पाऊस खरिपाच्या पिकांना तारक ठरला आहे तर काही भागात मात्र कपाशी, मका ही पिके आडवी झाली आहे. दरम्यान सोयगावच्या वेताळवाडी धरण ओव्हरफ्लो झाले आहे त्यामुळे पाट बांधारे विभागाकडून या धरणातून सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे तालुक्यात सरासरी ९५ मी मी पावसाची नोंद झाली असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले आहे त्यामुळे सोयगाव, जरंडी, सावळदबारा या तीन मंडळात सर्वाधिक नोंद झाली आहे.

दरम्यान तालुक्यातील उर्वरित प्रकल्प आणि धरणे भरण्यासाठी दमदार पावसाची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे .

### सोयगाव मंडळात पिके पाण्याखाली

सोयगाव मंडळात झालेल्या मुसळधार पावसाने मका,कपाशी, तूर,सोयाबीन, उडीद,आदी पिके पाण्याखाली बुडाले आहेत जरंडी मंडळातही पिकांचे नुकसान झाले आहे सर्वाधिक फटका सोयगाव मंडळात बसला आहे या पिकांची नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

### जरंडीच्या धिंगापूर धरणात आवक वाढली

तालुक्यातील जरंडी परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने जरंडी च्या धिंगापूर धरणात पाण्याची आवक वाढली आहे त्यामुळे सात गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

Nashik Edition
Aug 19, 2025 Page No. 9
Powered by: erelego.com

आपल्या वाचणयाचा, आपल्या वाचण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# ‘ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर’चे खासगीकरण ?

▸ आनंद बोरा । नाशिक

नाशिकमधील जखमी वन्यप्राण्यांची उचारासाठी ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर असावे ही वन्यजीवप्रेमींची मागणी तब्बल २२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मंजूर झाली असताना म्हसरूळ येथील वनविभागाच्या दोन एकर जागेपैकी एक एकरमधील उपचार केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून वन विभागाने हे सेंटर स्वतः न चालविता एका खासगी संस्थेला दिल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.




ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर सारख्या संकल्पनांचा उपयोग वन्यजीवांच्या आरोग्य व पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. दिवसेंदिवस वाढणारे मानवी हस्तक्षेप, अपघात, अवैध तस्करी, किंवा जंगलातील संघर्ष यामुळे अनेक वन्य प्राणी जखमी, आजारी किंवा दुर्बल होतात. अशा वेळी 'ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर' ही संकल्पना वन विभागासाठी अत्यंत उपयोगी ठरते. ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर हे वन्य प्राण्यांसाठी एक तात्पुरते आरोग्य तपासणी आणि उपचार केंद्र असते. अपघातग्रस्त, जखमी, किंवा आजारी प्राण्यांवर त्वरित प्राथमिक उपचार देणे, तस्करी किंवा अवैध वाहतुकीतून वाचवलेल्या प्राण्यांचे पुनर्वसन करण्यापूर्वी निरीक्षण करणे, प्राणी पुन्हा वनात सोडण्याआधी त्यांची वैद्यकीय चाचणी व काळजी घेणे, अशी कामे येथे केली जातात.तसेच येथे वन्यजीवांच्या आरोग्यविषयक डेटाचा संग्रह केला जाऊ शकतो, जो दीर्घकालीन वन्यजीव व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरतो. "ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर खाजगी संस्थेला चालविण्यासाठी द्यावे का?" हा एक अत्यंत संवेदनशील आणि धोरणात्मक प्रश्न आहे, कारण यामध्ये वन्यजीव संरक्षण कायदा, प्रशासनिक जबाबदाऱ्या, आणि खाजगी सहभागाचे फायदे व धोके या सगळ्यांचा समावेश होतो. वन्यजीव संरक्षण कायदा, 1972 या कायद्यानुसार, सर्व वन्यजीव हे राष्ट्राची संपत्ती मानले जातात.त्यांचे संरक्षण, देखभाल आणि पुनर्वसन ही जबाबदारी राज्य किंवा केंद्र सरकारच्या अधीनस्थ वन विभागाची आहे.वन्यजीवांच्या उपचारासाठी वनविभाग मान्यताप्राप्त व्हेटरिनरी सर्जन, वन्यजीव तज्ञ, किंवा अधिकृत संस्था यांची मदत घेऊ शकतो.मात्र खाजगी संस्था स्वतःच्या नियंत्रणाखाली टीटीसी चालवू शकत नाही, केवळ अधिकृत मान्यतेनंतर व ठराविक अटींवर हे शक्य आहे.सरकार पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप आणि मेमोरंडम ऑफ अंडर अंडरस्टँडिंग अंतर्गत टीटीसी उभारण्यासाठी किंवा चालवण्यासाठी खाजगी संस्थांशी सहयोग करू शकते.



## खासगी संस्थेचे नियोजन चुकले तर...

■ संसाधनांचा अकार्यक्षम वापर ■ अपुरी वैद्यकीय व्यवस्था असल्यास प्राण्यांना धोका ■ स्थानिक परिसंस्थेवर ताण ■ टीटीसीजवळ मानवी वस्ती असल्यास मानव-प्राणी संघर्ष वाढण्याची शक्यता

## खासगी संस्थेला संपूर्ण अधिकार दिल्यास

■ वन्यजीव तस्करीचा धोका ■ चुकीच्या उपचाराने प्राण्यांचा जीव जाऊ शकतो व यातून जबाबदारी टाळली जाऊ शकते ■ टीटीसी खासगी हाती असल्यास पारदर्शकता आणि उत्तरदायित्व कमी होईल ■ पशूंवर प्रयोग, अनावश्यक बंदिस्त ठेवणे यांसारखे प्रकार होण्याची शक्यता ■ वन कर्मचारी आळशी बनतील व प्रशिक्षित नसल्याने भविष्यात अडचणी निर्माण होतील.



“ अशा केंद्रांचे पूर्ण संचालन एखाद्या एनजीओकडे देणे हे कायद्याच्या भावनेला विरुद्ध ठरू शकते. एनजीओची भूमिका पूरक स्वरूपात - तांत्रिक मदत, स्वयंसेवकांची उपलब्धता, जनजागृती अशा बाबींमध्ये असावी. परंतु, टीटीसीचे नियंत्रण व कायदेशीर जबाबदारी ही केवळ वनअधिकाऱ्यांकडेच राहणे गरजेचे आहे. हे केंद्र पूर्णपणे एनजीओ दिले तर आर्थिक पारदर्शकतेचा अभाव, प्राण्यांच्या चुकीच्या हाताळणीची शक्यता व कायदेशीर गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका आहे. यामुळे अशा संवेदनशील केंद्रांचे संचालन वनविभागानेच करावे आणि एनजीओची मदत केवळ सहाय्यक भूमिकेत मर्यादित ठेवावी, हेच योग्य ठरेल.

**- हेमंत उबाळे,**
सहायक वनसंरक्षक, नाशिक

लोकमत

मस्ट READ

# अवयवदान मोहिमेत नाशिक राज्यात अव्वल; १८ ते ४५ वयोगटाच्या युवांचे सर्वाधिक योगदान

लोकमत विशेष

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** केंद्र शासनाच्या वतीने ४ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान झालेल्या अवयव दान मोहिमेमध्ये देशात महाराष्ट्र राज्याने बाजी मारली आहे. तर महाराष्ट्रातही सर्वाधिक ६ हजार ९२६ अवयव दानासाठी नाशिककरांनी पुढाकार घेतल्याने नाशिक जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. त्यामुळे दातृत्वाचे औदार्य दाखविण्यात देशात महाराष्ट्र तर महाराष्ट्रात नाशिककरांनी आघाडी घेतली आहे.

केंद्र शासनाने अवयव दानाची मोहीम जाहीर केल्यापासून देशभरात १८ ऑगस्टच्या दुपारी १२ वाजेपर्यंत ४ लाख २० हजार ९० नागरिकांनी अवयवदानासाठीचे अर्ज भरून दिले आहेत. त्यात सर्वाधिक वाटा हा महाराष्ट्राचा असून सोमवार दुपारपर्यंत १ लाख १ हजार ६४० अवयव दात्यांनी सहभाग नोंदवत देशाच्या एक चतुर्थांश अर्ज नागरिकांनी स्वेच्छेने भरून देत देशात दातृत्वामध्ये मराठी माणूसच सर्वात पुढे असल्याचे दाखवून दिले आहे.




## नाशिकमध्ये महिला पुरुषांच्या दीडपट अधिक

राज्यभरातील अवयव दान मोहिमेच्या आकडेवारीत महिलांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण हे किमान १० टक्के अधिक असल्याचे दिसून येते. देशात आतापर्यंत २ लाख २७ हजार २८२ पुरुषांनी आणि १ लाख ९१ हजार १५५ महिलांनी अवयव दानासाठी पुढाकार घेतला आहे. तर महाराष्ट्रात महिलांनी आघाडी घेतली असून ४१ हजार ७५८ पुरुष तर ५९ हजार ३७७ महिलांनी अवयव दानाचे अर्ज भरले. तर नाशिकमध्ये झालेल्या अवयव दान मोहिमेत पुरुषांची संख्या २ हजार ८०३ तर महिलांचे प्रमाण दीडपट अधिक म्हणजेच ४ हजार ८९ इतके आहे.

## देशातील पाच अव्वल राज्य

१. देशात सर्वाधिक अवयव दानासाठी नावनोंदणी केलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्रानेच एक लाखाचा टप्पा ओलांडला आहे. अन्य एकही राज्य महाराष्ट्राच्या जवळपासही नाही.

२. दुसऱ्या स्थानावर असलेल्या राजस्थानने ९० हजार ३९२ नोंदणी केली असली तरी तिसऱ्या स्थानावरील कर्नाटकने पन्नास हजारपेक्षाही कमी अर्थात ४६ हजार १५ नोंदणी केली आहे.

३. चौथ्या स्थानावरील गुजरात राज्यात ३९ हजार ३८२ तर पाचव्या स्थानावरील मध्य प्रदेशमध्ये २३ हजार ८४५ नागरिकांनी अवयव दानासाठी नोंदणी केली आहे.

लोकमत

# मनपा प्रभागरचना हरकतीवरील सूचनांच्या कालावधीला सहा दिवसांची मुदतवाढ

## शुक्रवारी जाहीर होणार; राजकीय पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागून; अडीच महिन्यांपासून महापालिका प्रशासनाची तयारी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महापालिकेची प्रभाग रचना शुक्रवारी (दि २२) प्रसिद्ध करण्यात येणार असून, हरकतीवरील सूचनांसाठीच्या कालावधीत मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, यापूर्वी निवडणूक आयोगाने २२ ते २८ ऑगस्टदरम्यान प्रभाग रचना प्रसिद्ध व हरकतीसाठीचा कालावधी दिला होता, परंतु या सहा दिवसांत दोन ते तीन दिवस सुट्यांत जात असल्याने कामांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता होती. त्यानुसार निवडणूक आयोगाने त्यात आणखी सहा दिवसांचा कालावधी वाढवून देण्यात आला.

गेल्या अडीच महिन्यांपासून प्रशासनाकडून प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरू होते. प्रभाग रचना तयार करून मनपा प्रशासनाने राज्याच्या नगरविकास विभागाला सादर केला असता नगरविकास खात्याने ११ ऑगस्ट रोजी राज्य निवडणूक आयोगाला प्रभाग रचना सादर केली होती. त्यानंतर शुक्रवार, दि२२ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान प्रभाग रचना प्रसिद्ध करून आलेल्या हरकतींवर सूचना मागविण्यात येणार आहेत. प्रभाग रचना प्रसिद्ध होणार असल्याने प्रभाग रचना कशी असणार याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. ठाकरे व मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी तर प्रभागाची मोडतोड करण्याचे आरोप केले आहेत. त्यामुळे प्रभाग रचना कशी असणार याची उत्सुकता आहे.

### ५ सप्टेंबरपासून हरकतींवर सुनावणी

प्रभाग रचना प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर हरकती मागवल्या जाणार आहेत. त्यानुसार आलेल्या हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी ५ सप्टेंबरपासून सुरुवात करण्यात येईल. सदर सुनावणी १२ सप्टेंबरपर्यंत घेतली जाणार आहे.

## रचना अंतिम करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना

### निवडणूक आयोगाचे मुख्यसचिव सुरेश काकाणी यांनी दिले आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने अंतिम झालेल्या प्रभाग रचना जाहीर करण्याचे अधिकार निवडणूक आयोगाने विभागीय आयुक्तांना दिले असून, २२ ऑगस्ट रोजी त्या जाहीर कराव्यात, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाचे मुख्य सचिव सुरेश काकाणी यांनी हे आदेश दिले आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी नव्याने गट, गण आराखडा जाहीर करण्यात आल्यानंतर निर्धारित



कालावधीत जिल्ह्यातून एकूण ६४ हरकती प्राप्त झाल्या होत्या. सर्वाधिक हरकती निफाड तालुक्यात १८, त्याखालोखाल नाशिक तालुक्यात १४, मालेगावला १२, चांदवडला ४, देवळा ३, नांदगाव आणि सिन्नर प्रत्येकी २, तर त्र्यंबक, येवला, पेठ, सुरगाणा आणि कळवण येथे प्रत्येकी एक हरकत नोंदवण्यात आली. इगतपुरी, दिंडोरी आणि बागलाण या तालुक्यांतून कोणतीही हरकत प्राप्त झालेली नव्हती. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याच्या आदेशानंतर जिल्हा परिषदेच्या गट-गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले होते. तहसील कार्यालयांमध्ये प्राप्त हरकती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविल्यानंतर त्या हरकती अभिप्रायासह विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आल्यानंतर त्यावर ७ ऑगस्टला सुनावणी होऊन त्या निकाली काढण्यात आल्या. त्यानंतर प्रभाग रचना अंतिम करून सोमवारी (दि. १८) निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात आल्यानंतर आयोगाने अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्याची जबाबदारी राज्यातील विभागीय आयुक्तांवर टाकली असून, २२ ऑगस्ट रोजी ती जाहीर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आता शुक्रवारी या प्रभाग रचनेचे अंतिम स्वरूप विभागीय आयुक्त जाहीर करणार असल्याने त्याकडे लक्ष लागले आहे.

Nashik Main
Page No. 2 Aug 19, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

# अवयवदान मोहिमेत नाशिक राज्यात अव्वल; १८ ते ४५ वयोगटाच्या युवांचे सर्वाधिक योगदान

लोकमत विशेष

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** केंद्र शासनाच्या वतीने ४ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान झालेल्या अवयव दान मोहिमेमध्ये देशात महाराष्ट्र राज्याने बाजी मारली आहे. तर महाराष्ट्रातही सर्वाधिक ६ हजार ९२६ अवयव दानासाठी नाशिककरांनी पुढाकार घेतल्याने नाशिक जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. त्यामुळे दातृत्वाचे औदार्य दाखविण्यात देशात महाराष्ट्र तर महाराष्ट्रात नाशिककरांनी आघाडी घेतली आहे.

केंद्र शासनाने अवयव दानाची मोहीम जाहीर केल्यापासून देशभरात १८ ऑगस्टच्या दुपारी १२ वाजेपर्यंत ४ लाख २० हजार ९० नागरिकांनी अवयवदानासाठीचे अर्ज भरून दिले आहेत. त्यात सर्वाधिक वाटा हा महाराष्ट्राचा असून सोमवार दुपारपर्यंत १ लाख १ हजार ६४० अवयव दात्यांनी सहभाग नोंदवत देशाच्या एक चतुर्थांश अर्ज नागरिकांनी स्वेच्छेने भरून देत देशात दातृत्वामध्ये मराठी माणूसच सर्वात पुढे असल्याचे दाखवून दिले आहे.




## नाशिकमध्ये महिला पुरुषांच्या दीडपट अधिक

राज्यभरातील अवयव दान मोहिमेच्या आकडेवारीत महिलांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण हे किमान १० टक्के अधिक असल्याचे दिसून येते. देशात आतापर्यंत २ लाख २७ हजार २८२ पुरुषांनी आणि १ लाख ९१ हजार १५५ महिलांनी अवयव दानासाठी पुढाकार घेतला आहे. तर महाराष्ट्रात महिलांनी आघाडी घेतली असून ४१ हजार ७५८ पुरुष तर ५९ हजार ३७७ महिलांनी अवयव दानाचे अर्ज भरले. तर नाशिकमध्ये झालेल्या अवयव दान मोहिमेत पुरुषांची संख्या २ हजार ८०३ तर महिलांचे प्रमाण दीडपट अधिक म्हणजेच ४ हजार ८९ इतके आहे.

## देशातील पाच अव्वल राज्य

1. देशात सर्वाधिक अवयव दानासाठी नावनोंदणी केलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्रानेच एक लाखाचा टप्पा ओलांडला आहे. अन्य एकही राज्य महाराष्ट्राच्या जवळपासही नाही.
2. दुसऱ्या स्थानावर असलेल्या राजस्थानने ९० हजार ३९२ नोंदणी केली असली तरी तिसऱ्या स्थानावरील कर्नाटकने पन्नास हजारपेक्षाही कमी अर्थात ४६ हजार १५ नोंदणी केली आहे.
3. चौथ्या स्थानावरील गुजरात राज्यात ३९ हजार ३८२ तर पाचव्या स्थानावरील मध्य प्रदेशमध्ये २३ हजार ८४५ नागरिकांनी अवयव दानासाठी नोंदणी केली आहे.

लोकमत

# सिंहस्थ कुंभमेळ्यात भाविकांसाठी आठ मुख्य रस्त्यांवर १६ वाहनतळ

## महापालिकेत विभागांची बैठक : प्रत्यक्ष पाहणी करणार, सूक्ष्म आराखडा तयार करण्याचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहरात आठ मुख्य रस्त्यांवरून येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी १६ ठिकाणी पार्किंगचे नियोजन करण्यात आले असून, त्याबाबतची बैठक मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि.१८) पार पडली. यावेळी पोलिस प्रशासन, एमएसआरटीसी, पाटबंधारे विभाग, मनपा ट्रॅफिक सेल यांनी संयुक्त आराखडा तयार करण्यात येऊन त्याचे सादरीकरण करावे, असे आदेश खत्री यांनी बैठकीत दिले.

कुंभमेळ्यासाठी शहरात येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी ही व्यवस्था असेल. कुंभमेळ्यासाठी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलिस प्रशासनाने मिळून वाहतूक आणि पार्किंगची व्यवस्था करण्याची योजना आखली आहे. शहराच्या बाहेरून येणाऱ्या वाहनांसाठी शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये पार्किंगची सोय केली जाणार आहे. सिंहस्थ नियोजन व व्यवस्थापनातील प्राधान्यक्रमात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, गर्दीचा अंदाज घेऊन प्रभावी उपाययोजना व व्यवस्थापन याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, एसटीचे वाहतूक अधिकारी किरण भोसले, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, शहर अभियंता संजय अग्रवाल, ट्रॅफिक सेलचे कार्यकारी अभियंता रवींद्र बागूल, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे, प्रशांत पगार आदी उपस्थित होते.



### २० ऑगस्टला साइट व्हिजिट

कुंभमेळ्यासाठी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलिस प्रशासनाने मिळून वाहतूक आणि पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार असून, त्याबाबत सर्व विभागाचे अधिकाऱ्यांना सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश खत्री यांनी दिले असून, त्यासाठी सर्व विभागांचे अधिकारी २० ऑगस्ट रोजी साइट व्हिजिट करणार आहेत.

### शहराकडे येणारे मुख्य रस्ते

पेठरोड, दिंडोरी रोड, धुळे रोड, पुणे रोड, गंगापूर रोड, त्र्यंबक रोड, मुंबई रोड, संभाजीनगर रोड इत्यादी ८ ठिकाणी १६ वाहनतळांची उभारणी केली जाणार आहे.

### या ठिकाणी होणार पार्किंग

१ शहराच्या बाहेरून येणाऱ्या वाहनांना शहरात प्रवेश न करता नियोजित वाहनतळांवर वाहने पार्क करता येतील. यासाठी महापालिकेने हद्दीत १६ ठिकाणी वाहनतळ प्रस्तावित केली आहेत.

२ यामध्ये मेरी, दिंडोरी रोडवरील क्रिकेट मैदान, तपोवन मैदान, मीनाताई ठाकरे स्टेडियम, ईदगाह मैदान, आडगाव ट्रक टर्मिनल, डोंगरे वसतिगृह महामार्ग, सिन्नर फाट्यावरील ६० मीटर रस्ता इत्यादी ठिकाणांचा समावेश आहे. बाह्य पार्किंगमधून आतमध्ये वाहनाने व तेथून दोन ते तीन किलोमीटर भाविकांना पायी चालावे लागणार आहे.

### २१ ऑगस्टला बैठक

पार्किंगबद्दलचे नियोजन करण्यासाठी २१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभागांची बैठक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त्यावेळी सर्व विभागांकडून सूक्ष्म नियोजनाचा आराखडा मागविण्यात आला आहे.

### रेल्वे, बसस्थानक परिसरात विशेष व्यवस्था

नाशकात सिंहस्थावेळी रेल्वेस्थानक किंवा बसस्थानक परिसरात येणाऱ्या भाविकांना आउटर पार्किंगमधून येथे यायचे आहे. तेथून दोन ते तीन किमी पायी चालत घाट परिसर किंवा दर्शनासाठी जाणे सुलभ होणार आहे.

> सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेवर विशेष भर देण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> **प्रदीप चौधरी**, अतिरिक्त आयुक्त, मनपा

लोकमत

मस्ट READ

# अधिकाऱ्यांना कुपोषित बालके घ्यावी लागणार दत्तक!

## जि.प.चे सीईओ ओमकार पवार झाले 'पोषण दूत'

**नाशिक** : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी स्वतः 'पोषण दूत' बनत दीपक गोरख पिंपळके या वैष्णवनगर येथील अतितीव्र कुपोषित बालकाचे आरोग्य सुधारण्याची जबाबदारी स्वीकारली. जिल्हा परिषदेच्या पोषण दूत उपक्रमांतर्गत अंतर्गत कुपोषण निर्मूलनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांना बालके दत्तक घेऊन त्यांना सामान्य श्रेणीत आणण्यासह कुपोषणाचे प्रमाण घटविण्यात योगदान द्यावे लागणार आहे.

पोषण दूत उपक्रमांतर्गत प्रत्येक अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील एका कुपोषित बालकाला दत्तक घेतो. संबंधित बालकाच्या कुटुंबाशी नियमित संवाद साधून आहारपद्धती, स्वच्छता, आरोग्य तपासण्या व पूरक आहार याबाबत लक्ष ठेवले जाणार आहे व अंगणवाडी सेविका, आशा व आरोग्य सेविका यांच्याशी समन्वय साधून बालकाचे नियमित वजन व उंची तपासली जाईल, यामुळे कुपोषित बालकांच्या प्रगतीवर थेट लक्ष ठेवले जाणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी पवार यांनी जिल्हा परिषदेंतर्गत सर्व विभागप्रमुख, प्रकल्प अधिकारी, गटविकास अधिकारी व इतर अधिकारी यांनी देखील कुपोषित बालकांचे 'पोषण दूत' बनावे, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक कुपोषित बालकाच्या आरोग्याची सामूहिक जबाबदारी प्रशासनाकडून घेतली जाणार आहे. याप्रसंगी बोलताना पवार म्हणाले, कुपोषण निर्मूलन ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याची सामाजिक जबाबदारी आहे. एक अधिकारी एक बालक अशा पद्धतीने आपण पुढाकार घेतला, तर नाशिक जिल्हा कुपोषणमुक्त करण्यास मदत होईल. यावेळी गटविकास अधिकारी डॉ. सोनिया नाकाडे, सरपंच मंगळू पिंपळके, ग्रामपंचायत अधिकारी विश्वनाथ तरवारे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



**सीईओंनी घेतली दीपकची जबाबदारी**
दीपक हा पाच वर्षांचा असूनही त्याचे वजन ११ किलो व उंची ९३ सेंमी अर्थात तीन फुटांहून किंचित अधिक नोंदविण्यात आली आहे. त्याला सॅम श्रेणीतील (अतितीव्र कुपोषित) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यामुळे 'पोषण दूत' म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी पवार हे थेट कुटुंबाशी संपर्क साधणार आहेत.

लोकमत

# नाशिक शहरात आज 'रेड अलर्ट'

## घाटप्रदेशात अतिवृष्टीचा इशारा : गंगापूर धरणातून विसर्गाची दाट शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क



**नाशिक :** भारतीय हवामान खात्याकडून नाशिक जिल्ह्यातील घाटमाथा व घाटप्रदेशाकरिता मंगळवारी (दि.१९) पावसाचा 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्यामुळे गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे जलसंपदा विभागाकडून वेगाने विसर्ग सोडण्याचे नियोजन केले जात असून, गोदावरी नदीकाठालगत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात सर्वदूर जोरदार पाऊस होत असला तरीदेखील नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढलेला नाही. सोमवारी (दि.१८) दिवसभर शहरात हलक्या-मध्यम सरींचा शिडकावा सुरू होता. सायंकाळपर्यंत १.२ मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद करण्यात आली आहे.

शहरासह जिल्ह्याला तीन दिवसांकरिता 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. घाटप्रदेशात पावसाचा जोर वाढल्यास गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील त्र्यंबकेश्वर, आंबोली, वाघेरा, हरसूल या भागातून पूरपाण्याची मोठ्या प्रमाणात आवक होऊ शकते.

गंगापूर धरण ८४.२५ टक्के, तर गौतमी गोदावरी आणि कश्यपी धरण शंभर टक्के भरलेले आहे. यामुळे पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यास गंगापूर धरणातून टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढविण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाने म्हटले आहे. यामुळे गोदावरी नदीकाठालगत असलेल्या महापालिका, नगरपालिकांसह ग्रामपंचायतीच्या स्तरावर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीकाठालगतच्या विक्रेत्यांनी त्यांची दुकाने, वाहने सुरक्षितस्थळी हलवावी, असेही जारी केलेल्या सतर्कतेच्या इशारा देणाऱ्या परिपत्रकात म्हटले आहे.

### उद्या 'ऑरेंज अलर्ट'

हवामान खात्याकडून नाशिकच्या घाटप्रदेशाकरिता मंगळवारी रेड, तर बुधवारी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित शहरासह जिल्ह्यात तीन दिवसांकरिता 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. यामुळे पुढील दोन दिवस नाशिकमध्ये पावसाचे जोरदार पुनरागमन होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मस्ट READ

# बोगस शालार्थ आयडी : शिक्षक, कर्मचाऱ्यांची पुण्यात चौकशी

## २००९ मधील शिक्षकांनाही नोटीस : कागदपत्रांसह कार्यालयात पाचारण

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : राज्यभर गाजत असलेल्या बोगस शालार्थ आयडीप्रकरणी नाशिकच्या तब्बल ५०० शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात येत असून नाशिकमधील सुमारे ३६० शिक्षक, कर्मचाऱ्यांना त्यासाठी पुण्यात पाचारण करण्यात आले होते.

सोमवारी (दि. १८) यासाठी काही शिक्षकांना पुण्यात बोलावण्यात आले होते, २०१२ नंतरचा हा घोटाळा असतानाही याप्रकरणी २००९ पासून रुजू असलेल्या शिक्षकांना पाचारण करण्यात आल्याने नाराजी व्यक्त केली जाते आहे.



शालार्थ आयडी घोटाळ्याची पाळेमुळे खोदली जात असताना नाशिकचे तत्कालीन शिक्षण उपसंचालक चव्हाण यांनी ७९ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबद्दल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर मालेगाव, सिन्नर, चांदवड या भागातूनही तक्रारी दाखल होऊ लागल्याने शिक्षण विभागाने त्याची दखल घेत चौकशी सुरू केली आहे. त्यात प्रारंभी नाशिक उच्च माध्यमिक बोर्डाच्या कार्यालयात चौकशी आता शिक्षकांना थेट पुण्याला पाचारण केले जाते आहे.

**३६०**
शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विभागाकडून चौकशी.

१२० आणि १८० शिक्षकांना याबाबत एकाच वेळेस नोटिसा बजावून त्यांना कागदपत्रांसह पुणे येथे बोलावले जाते आहे. पहिल्या टप्प्यातील शिक्षकांच्या कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील चौकशी सुरु झाली आहे.

याबद्दल नाराजी व्यक्त करणाऱ्या शिक्षकांनी शिक्षण विभागाच्या चौकशीलाच हरकत घेतली असून एसआयटीची स्थापना झाल्यानंतर शिक्षण विभागाकडून चौकशी करण्याची काय गरज, असा प्रश्न विचारला जातो आहे. त्यामुळे अजूनही ज्या शिक्षकांची चौकशी बाकी आहे त्यांनी आवश्यक ते पुरावे जवळ बाळगावेत, असे आवाहन शिक्षक संघटनांनी केले आहे.

> शासनाने एसआयटी नेमली आहे. त्यातील २०१२ पासूनच्या नेमणुकीची चौकशी करावी, त्यापूर्वीच्या शिक्षकांना चौकशीचा त्रास देऊ नये. त्यापूर्वी ज्यांची भरती झाली त्यातील काही लोकांना शालार्थ आयडीच्या मूळ प्रती दिल्या नाहीत. त्यामुळे ज्यांच्याकडे पुरावा नाही त्यांना त्रास होतो आहे. ही चूक शिक्षण विभागाची असून त्याचे डिजिटायझेशन करायचे असेल तर त्याला मुदतवाढ द्यायला हवी.
>
> **नंदलाल धांडे**, अध्यक्ष, **मुख्याध्यापक संघटना**

> **बोगस शालार्थ आयडीसह बोगस शिक्षक भरती करणाऱ्या टोळीकडे एसआटीने लक्ष केंद्रित केले पाहिजे. ही टोळी शालार्थ आयडीचा यूझर आयडी आणि पासवर्ड घेत शिक्षकांना शाळेत रुजू करून घ्यायला लावतात. त्याच महिन्यात त्या शिक्षकांचे पगार सुरू होतात. शिक्षणाधिकाऱ्यांची ऑर्डर आणि संस्थाचालकांचे पत्र नसताना होत असलेली ही भरती संशयास्पद आहे.**
>
> **एस. बी. देशमुख**, सचिव, राज्य मुख्याध्यापक महामंडळ

लोकमत

# सोलर पंप चोरीचे सत्र कायम; चोरीच्या तक्रारी केवळ कागदावर

## सिन्नर तालुक्यात शेतकऱ्यांची वाढली चिंता; खरेदी पावत्या नसल्याने अडचण

लोकमत न्यूज नेटवर्क

**सिन्नर :** तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या काही महिन्यात विद्युत जलपंप आणि सोलर प्लेटा चोरीला जाण्याच्या प्रकारामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. काही शेतकऱ्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली आहे.

सिन्नरचा पूर्व भाग तसा आवर्षणग्रस्त आहे. शेतकऱ्यांच्या विहिरींना तसे कमीच पाणी असते. त्यात विद्युत जलपंप चोरीला जाण्याच्या घटनांमुळे दुष्काळात तेरावा महिना निर्माण होतो. सिन्नर तालुक्यातील सिन्नर, एमआयडीसीसह वावी पोलिस ठाण्याच्या हद्दीत विद्युत जलपंप चोरांच्या विरोधात काही गुन्हेही दाखल आहेत. काही शेतकऱ्यांकडून जलपंप चोरीला गेल्याच्या केवळ कागदावर तक्रारी घेण्यात आल्याचे समजते.

**निफाडला शेतकरी हवालदिल**

**निफाड :** तालुक्यात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील कृषी पंप, जलपरी तसेच विद्युत साहित्य चोरून नेण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत. या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांच्या विहिरीवरील कृषी पंप मोटारी गावापासून लांब, नदीकिनारी अथवा ओसाड जागी असतात. दुर्गम भागात रात्रीच्या अंधारात कोणी सहज पोहोचू शकत नसल्याचा फायदा घेत चोरटे चोरी करीत आहेत. बिबट्याच्या दहशतीमुळे शेतकरी रात्री शेतवस्तीकडे जाणे टाळतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी पिकांना पाणी भरणे वा विहिरीवर जाणे जवळजवळ बंद झाले आहे.

सततच्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी हवालदिल झाले असून त्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ होत आहे. यामुळे शेतकरी वर्गामध्ये भीती व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस प्रशासनाने या घटनांवर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे. तक्रारी दाखल करून घेतल्या जात असल्या तरी तपासाची गती संथ आहे.



### सोलर प्लेटवरही चोरट्यांची नजर

वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रकारामुळे शेतकऱ्यांनी सोलर बसवून घेतले आहेत. या सोलर प्लेटवरही चोरट्यांची नजर गेली असून, अनेक ठिकाणी सोलर प्लेटाही चोरीला गेल्या आहेत. अनेक महिने उलटूनही विद्युत जलपंप चोरांचा तपास लागत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत.

# पेठ तालुक्यात सौर कृषिपंप चोरीची मालिका सुरूच

लोकमत न्यूज नेटवर्क

**पेठ :** भरमसाठ वीजबिले आणि खंडित वीजपुरवठा यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी सौर ऊर्जेचा वापर करू लागले आहेत. शासनाच्या कृषी व महावितरण विभागाने वाढत्या वीज वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम सौर कृषिपंप योजना दिली. मात्र, याच सौर कृषिपंपांच्या प्लेट चोरीचे प्रकार पेठ तालुक्यात वाढले असून, शेतकऱ्यांना नव्या समस्येचा सामना करावा लागत आहे.

पेठ पोलिस स्टेशन अंतर्गत पेठ व ननाशी परिसरात अनेक शेतकऱ्यांनी शेतावर कृषिपंप बसवले आहेत. पेठ तालुक्यात कुसुम सौर योजनेचे ३,०९९ तर सौर कृषिपंपाचे ७८१ ग्राहक आहेत. महिन्यातून किमान एक तरी पंप किंवा सौर प्लेट चोरीला जाण्याच्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. काहीवेळा चोरटे केवळ एक-दोन प्लेट काढून नेतात, त्यामुळे अनेक शेतकरी पोलिस स्टेशनपर्यंत जाणे टाळतात. शेतात उघड्यावर बसवलेल्या या प्लेट अन्य वापरासाठी सोप्यारीतीने चोरीस जातात. शासकीय योजनेतून मिळालेल्या कृषिपंपांच्या खरेदी पावत्या शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याने फिर्याद दाखल करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.

शेतकऱ्यांकडून शासनाकडे सौर पंपांसाठी संरक्षक जाळी पुरवण्याची मागणी होत आहे, जेणेकरून चोरीवर नियंत्रण मिळवता येईल.

> “ ग्रामीण भागात शेतावर बसवलेले सौर पंप चोरटे चोरून नेत असून, अनेक वेळा चोरी होऊनही शेतकऱ्यांकडे पावत्या उपलब्ध नसल्याने तक्रार दाखल करताना अडचणी निर्माण होतात. शासनाने सौर पंपांना संरक्षक जाळी द्यावी अशी मागणी आहे.
>
> **अंबादास सातपुते**
> शेतकरी, जुनोठी, ता. पेठ

# सोलर पॅनेल चोरी उघडकीस येण्याचे प्रमाण अत्यल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

**दिंडोरी :** तालुक्यात बारमाही बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून विविध धरण, पाझरतलाव, लघु पाटबंधारे, नदी आदी पाण्याचे साठवण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीज पंपाची चोरी प्रकरणे नेहमी घडत असून पंप सोबतच वीज केबल चोरीही मोठ्या प्रमाणात होत आहे. काही पंप मालक पोलिसात जातात तर काही जण पोलिस ठाण्याचे हेलपाटे मारण्याऐवजी दुसरा पंप बसवत आहे. या चोऱ्या उघडकीस येण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. बहुतांशी शेतकऱ्यांनी पानबुडत्या, जलपऱ्या टाकलेल्या असल्याने त्यांचे चोरीचे प्रमाण कमी असले तरी चोरटे केबल वायरवर डल्ला मारत आहे. ज्याठिकाणी एकत्रित जास्त वीज पंप आहे त्या ठिकाणी शेतकऱ्यांनी पंप व केबल संरक्षणासाठी एकत्रित वॉचमन ठेवले आहे.

शेतात शेतकऱ्यांनी अनेक ठिकाणी सोलर पंप बसवले आहे. मात्र या पंपाचे सोलर पॅनल चोरीच्या घटना घडत आहेत.

### येवला तालुक्यात सहापेक्षा अधिक सोलर मोटर चोरी

**येवला :** तालुक्यात इलेक्ट्रिक मोटार चोरीचा सुळसुळाट झाला असून तालुक्यातील प्रत्येक गावात किमान सहा ते सातपेक्षा अधिक इलेक्ट्रिक मोटारींची चोरी होत आहे. पूर्वी उघड्यावर असलेल्या मोटारी चोरीचे प्रमाण अधिक होते. मात्र, आता सोलर मोटारींच्या चोरीच्याही घटना घडत आहेत. १० - २० टक्के मोटार चोरीच्या तक्रारी दाखल होतात.

गांवकरी
www.gavakari.net
19 Aug 2025 - Page 3

# प्रस्तावित रामवाडीतील पुलाला साइड ट्रॅक; निविदेतून वगळले

## उर्वरित सव्वाशे कोटींच्या कामांना मात्र हिरवा कंदील

नाशिक : प्रतिनिधी

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाने काही दिवसांपूर्वी शहरात कोणत्या ठिकाणी नव्याने पूल उभारणे आवश्यक आहे. याकरिता नियोजन केले असता सहा ठिकाणी पूल उभारणे आवश्यक असल्याने त्यासाठी नियोजन करण्यात आले होते. बांधकाम विभागाने सोमवारी (दि.१७) या पुलांच्या कामाची निविदा प्रसिद्ध केली. दरम्यान, या सहा पुलांतून सिंहस्थ कुंभमेळ्यात भाविकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असणाऱ्या रामवाडी येथील घारपुरे घाट येथे २४ कोटी ९१ लाख खर्चून पूल उभारला जाणार होता. परंतु या पुलावर अनपेक्षितपणे फुली मारण्यात आली आहे. त्यामुळे या पुलाच्या कामावर कात्री मारण्याचा हेतू काय? अशी चर्चा महापालिका वर्तुळात होत आहे.

सिंहस्थ काही महिन्यांवर असतानाही शासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची ओरड सुरु होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वी शासनाने पंधरा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागणाऱ्या कामाचे नियोजन सुरू केले होते. त्यानुसार अशा कामांची यादी तयार करुन तत्काळ ते सुरू करण्यात येणार आहे. मनपाला मार्च २०२६ मध्ये २,३६८ कोटींचा निधी विविध कामांसाठी दिला जाणार आहे. दरम्यान मनपाच्या बांधकाम विभागाने यापूर्वीच सिंहस्थात भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सहा पुलांच्या उभारणीची निविदा प्रक्रिया सुरू केली होती. परंतु निधीअभावी हे काम मागे पडले होते. मात्र निधी उपलब्ध होणार असल्याने सोमवारी या पुलांच्या कामासाठी निविदा प्रसिद्ध केली गेली. परंतु रामवाडी परिसरातील पूलाचे काम सध्यास्थित थांबवण्यात आले आहे. यामुळे मात्र विविध प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले आहे.

**प्रस्तावित पूल व त्यासाठीचा खर्च**

१) तपोवन पूल- ३५ कोटी ८९ लाख ६० हजार ८८६
२) रामवाडी ते घारपुरे घाट- २४ कोटी ९१ लाख ९८ हजार ८०५ (काम वगळले)
३) लक्ष्मीनारायण मंदिराजवळ - २० कोटी ९६ लाख ९६ हजार २४४
४) नंदिनी नदी मिलिंदनगर पूल- १९ कोटी २३ लाख ६ हजार
५) वालदेवी नदीवरील वडनेर दुमाला पूल- १६ कोटी ८२ लाख ६० हजार
६) गाडगे महाराज पूल- ११ कोटी ३५ लाख ११ हजार

भाविकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असतानाही या पुलाचे काम निविदेतून का वगळले, असा सवाल उपस्थित होतो आहे. गोदावरी, नंदिनी व वालदेवी, वाघाडीसह एकूण सहा पूल बांधण्याचे नियोजन केले होते. सिंहस्थात दहा कोटी




भाविक शहरात येण्याचा अंदाज आहे. सुरक्षेच्या उपाययोजना म्हणून बांधकाम विभागाने ३७ पुलांच्या स्ट्रक्चर ऑडिट सुरू केले आहे. यासोबतच सिंहस्थ काळात वाहतूक कोंडी न होता, भाविकांना शहराच्या चारही बाजूंनी बाहेर पडता यावे. याकरिता पुलांचे ऑडिट करण्याबरोबरच १३७ कोटींचे समांतर पूल उभारले जाणार आहेत. परंतु नियोजित कामातून रामवाडीतील पुलाचे काम वगळल्याने ११० कोटींचा खर्च येणार आहे. एकीकडे भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य म्हणायचे अन दुसरीकडे महत्वाचे काम रद्द करायचे, असा काहीसा प्रकार मनपात सुरू असल्याचे चित्र आहे.

LOKMAT TIMES

# FDA Nashik woefully short of staff members

## Circulation of fake medicines on the rise; public health at risk

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, AUG 18

The Food and Drug Administration (FDA) department in Nashik is grappling with a severe manpower shortage, with no drug inspectors currently posted in the city. This vacuum has led to unchecked sale of fake and expired medicines, stockpiling, and irregular trade practices.

At the same time, as monsoon-related epidemics spread, the city is facing another crisis - a sharp rise in the circulation of counterfeit medicines.

### Ban on sale without prescription

The drug inspection mechanism in Nashik city and district remains severely inadequate. Sale of medicines without a doctor's prescription is prohibited by law, yet violations are common. Reports suggest a growing trend of illegal sales of counterfeit medicines, raising serious concerns about public health.

### One officer handling all FDA work!

All six sanctioned posts of Inspector in Nashik city presently lie vacant. The department also has sanction for two assistant commissioners and four drug inspectors, but at present, only one assistant commissioner is holding charge of all operations. His responsibilities range from daily inspections of medical shops and blood banks to monitoring allopathy, ayurveda, and homeopathy manufacturing units, while also filing cases and appearing in court as a witness. This enormous workload is being handled solely by a single officer, that too, functioning as in-charge.

### Nearly 6,000 Medical Stores

Nashik district has around 5,500 registered medical shops, and under the Mumbai Nursing Act, the total number is estimated to be nearly 6,000. The number exceeds 5,000 in the city alone. The responsibility of daily inspections of these wholesale and retail shops lies entirely with the FDA.

> Our department carries out regular inspections and takes action as per law. We have previously conducted raids in Malegaon and other parts of the district. The nature of this work demands a large workforce, but currently only a handful of officials are managing the enormous workload.
>
> **- Suresh Deshmukh**, Assistant Commissioner, FDA

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# नदी जोड प्रकल्प कार्यालयांमुळे वाद

## नाशिकहून छत्रपती संभाजीनगरात स्थलांतरीत करण्याची मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** राज्याचे जलसंपदामंत्री अहिल्यानगरचे आहेत. त्यामुळे नदीजोड प्रकल्पाची कार्यालये नाशिकमध्ये नेण्यात येत आहेत. मुळात नदी जोड प्रकल्पातील पाणी मराठवाड्याला मिळणार आहे. गोदावरी खोऱ्यात वरील भागात केवळ सर्वेक्षणाचे काम होईल. त्याची अंमलबजावणी मराठवाड्यात करायची आहे. त्यामुळे मुख्य अभियंता, नदीजोड प्रकल्प, नाशिक हे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे स्थलांतरीत करण्याची मागणी आता पुढे आली आहे.

ऑगस्टच्या प्रारंभी नाशिक येथील सिंचन भवनात उल्हास-वैतरणा नदीजोड प्रकल्प कार्यालयाचे उद्घाटन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, खासदार भास्कर भगरे यांच्यासह अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील आमदारांच्या उपस्थितीत झाले होते. हे संगमनेर येथील कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभागाचे नाशिकमध्ये स्थलांतरीत झालेले कार्यालय आहे. त्यांच्यावर पश्चिमी वाहिनी उपखोऱ्यातील अतिरिक्त पाणी वळविण्याची अनुषंगिक कामे सोपविली जातील. सिंचन भवनमध्ये राज्यातील नदी जोड प्रकल्पाचे समन्वयक (मुख्य अभियंता) हे कार्यालय आधीपासून अस्तित्वात आहे. जलसंपदाच्या उत्तर महाराष्ट्र प्रदेशचे ( नाशिक) मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे नदीजोड प्रकल्पाचे समन्वयक म्हणून अतिरिक्त जबाबदारी आहे. नदी जोड प्रकल्पातून भविष्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याची पळवापळवी आतापासून सुरू झाल्याचे आरोप होत असताना आता नदी जोड प्रकल्पांच्या नाशिकमधील कार्यालयांवर मराठवाड्यातून आक्षेप घेतला जात आहे.

मराठवाड्याची तूट भरून काढण्यासाठी शासनाने २०१९ मध्ये पश्चिमी वाहिनी खोऱ्यातून (कोकण) १६८.७५ टीएमसी पाण्यापैकी १५५ टीएमसी पाणी मराठवाड्यासाठी मंजूर केल्याकडे मराठवाडा जलसमुद्धी प्रतिष्ठानने लक्ष वेधले आहे. यासाठी मुख्य अभियंता नदीजोड प्रकल्प, नाशिक हे नदीजोड प्रकल्प कार्यालय मराठवाड्यासाठी असल्याने ते छत्रपती संभाजीनगर येथे स्थलांतरीत करावे, जेणेकरून प्रत्यक्ष अमलबजावणीसाठी प्रशासकीय दृष्टीने ते सोयीचे ठरेल, असा आग्रह प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. शंकरराव नागरे यांनी धरला. सर्वेक्षण व तत्सम कामे करणारी काही कार्यालये नाशिकमध्ये ठेवण्यास हरकत नाही. परंतु, नदीजोड प्रकल्पाचे पाणी मराठवाड्यात द्यावयाचे असल्याने अंमलबजावणीसाठी या प्रकल्पाचे मुख्य अभियंता कार्यालय संभाजीनगरमध्ये असायला हवे, असे प्रतिष्ठानचे म्हणणे आहे.

### कार्यालयासाठी नाशिक योग्य

नाशिकमधील नदीजोड प्रकल्पाचे (समन्वय) मुख्य अभियंता हे कार्यालय संपूर्ण राज्यातील नदी जोड प्रकल्पांसाठी समन्वयाचे काम करते. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, या कामातील अडचणी दूर करण्यासाठी या कार्यालयामार्फत प्रयत्न केले जातात. नदी जोड प्रकल्पाच्या अमलबजावणीची जबाबदारी त्या, त्या भागातील मुख्य अभियंत्यांवर आहे. मराठवाड्यातून होणाऱ्या कार्यालय स्थलांतराची मागणी तार्किकदृष्ट्या योग्य नाही. नदी जोड प्रकल्पांसाठी कोकण, ठाणे, नाशिक भागात जमिनीवर काम करायचे आहे. त्यामुळे या क्षेत्राजवळ मुख्य अभियंता नदी जोड प्रकल्पाचे कार्यालय योग्य असल्याचा दावा जलसंपदा विभागाकडून केला जातो.



लोकसत्ता

# महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात मोठ्या रस्त्यांचे जाळे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात येणारी वाहतूक ही नाशिक प्राधिकरण क्षेत्रातून होणार असल्याने आणि या क्षेत्रातील वाढत्या औद्योगिकरणामुळे भविष्यात वाहतुकीचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होण्यासाठी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (एनएमआरडीए) हद्दीत मोठ्या रुंदीच्या रस्तांचे जाळे विकसित करण्यात येणार आहे. प्राधिकरण क्षेत्रात विकास परवानग्या देताना पोहोच रस्त्याची रुंदी किमान १५ मीटर बंधनकारक करण्यात आली आहे.

**शिर्डी, ओझर विमानतळावरून होणाऱ्या वाहतुकीचे नियोजन लक्षात घेऊन वाहतुकीचे जाळे विकसित होणे आवश्यक आहे.**

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात एकूण २७५ गावांचा समावेश आहे. या निर्णयाद्वारे एनएमआरडीए क्षेत्रात मोठ्या रस्त्यांचे जाळे विकसित होईल. या संदर्भातील आदेश एनएमआरडीएचे आयुक्त डॉ. माणिकराव गुरसळ यांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते विकास आराखड्यानुसार अस्तित्वातील व प्रस्तावित वर्गीकृत रस्त्यांचा विचार करून या गावांमध्ये प्राप्त होणाऱ्या विकास परवानगीच्या प्रस्तावांना प्राधिकरण मान्यता देते. एनएमआरडीए क्षेत्रातील विकास लक्षात घेता नाशिक महानगरपालिका हद्दीतून येणाऱ्या रस्त्यांच्या जाळ्यांचे नियोजन होणे आवश्यक आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यात येणारी वाहतूक नाशिक प्राधिकरण क्षेत्रातून होईल. शिर्डी, ओझर विमानतळावरून होणाऱ्या वाहतुकीचे नियोजन आणि नाशिक प्राधिकरण क्षेत्रात वाढते औद्योगिकीकरण लक्षात घेऊन भविष्यातील वाहतुकीचे व्यवस्थापन होण्यासाठी आताच मोठ्या रस्त्यांचे जाळे प्राधिकरण क्षेत्रात विकसित होणे आवश्यक आहे.

प्राधिकरणाकडे विकास परवानगी मिळण्यासाठी प्राप्त होणाऱ्या बहुतांश प्रस्तावातील जागा जवळच्या सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या जागांतून संबंधित जागा मालकाच्या संमतीने पोहोच रस्ता उपलब्ध करून घेतला जातो. प्रचलित एकिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यक उपलब्ध पोहोच रस्त्याच्या रुंदीनुसार प्रस्तावित जागेत विकास परवानगी दिली जाते. त्या अनुषंगाने भविष्यात मोठ्या रुंदीच्या आवश्यकता विचारात घेऊन या पोहोच रस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर इतकी असणे अनिवार्य असेल. काही अपरिहार्य नदी, धरणे, डोंगर असे भौतिक, भौगोलिक अडथळ्यांबाबत महानगर आयुक्त यांच्या पूर्व मान्यतेने किमान १२ मीटर इतक्या रुंदीचा पोहोच रस्ता संमतीने घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे गुरसळ यांनी आदेशात म्हटले आहे.

### सहा तालुक्यात अमलबजावणी

- नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एनएमआरडीएच्या अखत्यारीत २६४९.७४ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ क्षेत्राचा समावेश आहे.
- यामध्ये नाशिक, निफाड, सिन्नर, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यांमधील २७५ गावे समाविष्ट आहेत.
- उपरोक्त क्षेत्रात मोठ्या रस्तांचे जाळे विकसित करण्यास या निर्णयाचा लाभ होणार आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# कंत्राटी कर्मचाऱ्यांना संघटनांची साथ

## आदिवासी विकास भवनावर मोर्चा काढण्याचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** सुमारे ४१ दिवसांपासून आश्रमशाळा कंत्राटी कर्मचारी तृतीय वर्ग व चतुर्थ वर्ग संघटनेचे येथे आदिवासी विकास भवनाच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन चालू असून आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी समविचारी संघटनांच्या सहकार्याने आयोजित बैठकीत २५ ऑगस्ट रोजी मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

शासनाने आश्रमशाळांमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी ४१ दिवसांपासून आदिवासी भवनाच्या प्रवेशद्वारासमोर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन चालू आहे. काही लोकप्रतिनिधींनी आंदोलकांची भेट घेतली असली तरी या प्रश्नावर अद्याप तोडगा निघालेला नाही. आंदोलकांनी आदिवासी विकास भवन परिसरात शिरण्याचा प्रयत्न केला असता पोलीस तसेच आदिवासी आयुक्तालयाच्या वतीने त्यांना विरोध करण्यात आला. शासन, प्रशासनाकडून आंदोलनाची कोणतीच दखल घेण्यात येत नसल्याबद्दल रविवारी समविचारी आदिवासी संघटनांनी एकत्र येत बैठक घेतली. बैठकीत २५ ऑगस्ट रोजी तपोवन परिसरातून आदिवासी भवनापर्यंत मोर्चा काढण्याचे ठरविण्यात आले. या मोर्चात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आदिवासी कर्मचारी संघटना सहभागी होणार आहेत. हा मोर्चा तपोवन परिसरातून अशोकस्तंभ-सीबीएसमार्गे आदिवासी भवनावर धडकणार आहे.

याविषयी उलगुलान संघटनेचे प्रभाकर पारसे यांनी माहिती दिली. सहा महिन्यांहून अधिक काळापासून शिक्षकांचे वेतन झालेले नाही. मुलांचे शिक्षण थांबलेले आहे. आंदोलनाच्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था नाही. आंदोलक काही पैसे गोळा करत एक वेळच्या जेवणाची व्यवस्था करत आहेत. आंदोलकांचे पगार न झाल्याने त्यांच्या कुटूंबियांनाही दोन वेळच्या जेवणासाठी धडपड करावी लागत असल्याचे पारसे यांनी सांगितले.

नाशिक, कळवणसह जिल्ह्यात ३६ आश्रमशाळा आहेत. या आश्रमशाळांमध्ये हजारोंहून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. जूनपासून आंदोलनामुळे शिक्षक कामावर रुजू नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारे शिकविण्यात आलेले नाही, अध्ययन झालेले नसताना आदिवासी विभागाकडून पहिली घटक चाचणी घेण्यात येत आहे. शिकवलेच नाही तर विद्यार्थी परीक्षा कशी देणार, असा प्रश्न पारसे यांनी केला आहे. शिक्षकांसह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने आता आरपारची लढाई होत असल्याचे पारसे यांनी सांगितले.



आदिवासी विकास भवनासमोर थांबलेले आंदोलक

### एकनाथ शिंदे यांची भेट

बाह्यस्त्रोत नियुक्ती रद्द करण्यासह इतर मागण्याविषयी आंदोलकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाणे येथील निवासस्थानी भेट घेतली. आंदोलकांनी आपली व्यथा मांडली. मागण्यांचे निवेदन दिले. याबाबत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी लवकरच चर्चा करुन या विषयावर तोडगा काढू, असे आश्वासन दिले. आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांच्याशी संपर्क करत आंदोलक ऊन, पावसात प्रवेशद्वारासमोर असल्याने त्यांना आदिवासी भवन परिसरात येऊ द्यावे, अशी सूचना केली. मात्र आंदोलक बाहेरच बसण्यावर ठाम आहेत.

19/08/2025 | Nashik | Page : 9
Source : https://epaper.loksatta.com

दै.महाराष्ट्र टाईम्स

दि.१९ ऑगस्ट,२०२५

# 'एचएसआरपी' तेरा टक्केच!

## नंबर प्लेटबाबत ६२ टक्के वाहनधारक उदासीन

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

सुरक्षेच्या कारणास्तव वाहनांवर 'एचएसआरपी' नंबर प्लेट बसवून घ्या, असे आवाहन सरकार वारंवार करीत असले तरी नाशिककर त्याबाबत कमालीचे उदासीन असल्याचे वास्तव आहे. जिल्ह्यात आतापर्यंत केवळ १२.८४ टक्केच वाहनधारकांनी या नंबरप्लेट बसविल्या आहेत. २४.५९ टक्के वाहनधारकांनी नंबरप्लेट बसविण्यासाठी नोंदणी केली असून, ६२ टक्के वाहनधारकांनी या नंबरप्लेट बसविण्याचा विचारही अजून केलेला नाही.

सन २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवून घेण्याचे आवाहन सरकारने केले आहे. परंतु, त्यासाठी वाहनधारकाला पैसे मोजावे लागणार आहेत. याशिवाय नोंदणी करून वाहनावर प्रत्यक्ष नंबर प्लेट बसवून घेण्यासाठी नोंदणीही करावी लागणार आहे. वेळ, पैसा आणि श्रम तीनही गोष्टी खर्च कराव्या लागणार असल्याने वाहनधारकांत याबाबत कमालीची उदासीनता आहे. या नंबरप्लेट बसविण्यासाठी सरकारने यापूर्वी वारंवार मुदतवाढ दिली. स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १५ ऑगस्टला मुदत संपल्यानंतर पुन्हा ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे संकेत सरकारने दिले असून, १ डिसेंबरपासून दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. कारवाई टाळण्यासाठी तरी वाहनधारक या नंबरप्लेट बसवून घेतील, असा प्रशासनाला विश्वास आहे. जिल्ह्यात 'एचएसआरपी' नंबरप्लेटसाठी ९४ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. सन २०१९ पूर्वीच्या ९ लाख ९४ हजार ८९३ वाहनांवर 'एचएसआरपी' नंबरप्लेट बसविण्याचे उद्दिष्ट नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयाने ठेवले आहे. त्यापैकी १ लाख २७ हजार ७४६ वाहनांवर आतापर्यंत या नंबरप्लेट बसविण्यात आल्या आहेत. २ लाख ४४ हजार ७०६ वाहनधारकांनी नंबरप्लेट बसविण्यासाठी ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करून अपॉइंटमेंट घेतलेली आहे. म्हणजेच येत्या काही महिन्यांत एकूण ३ लाख ७२ हजार १५२ वाहनांवर या नंबरप्लेट बसणार आहेत. तरीही ६ लाख २२ हजार ७४१ वाहने या नंबरप्लेटविनाच असून, नोव्हेंबरअखेर कितीजण नंबरप्लेट बसवून घेतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




> सन २०१९ पूर्वीच्या वाहनांवर 'एचएसआरपी' नंबरप्लेट्स बसविणे अनिवार्य आहे. यासाठी सरकारने नोव्हेंबर अखेरपर्यंत मुदत वाढवून दिली आहे. जिल्ह्यातील वाहनधारकांनी या नंबरप्लेट बसवून घेण्यासाठी तत्काळ कार्यवाही करावी.
>
> – प्रदीप शिंदे, प्रादेशिक परिवहन अधिकारी

| | |
|---|---|
| जिल्ह्यात कार्यरत सेंटर्स | ९४ |
| नंबरप्लेट बसविण्याचे उद्दिष्ट असलेली एकूण वाहने | ९,९४,८९३ |
| नंबरप्लेट बसविलेली वाहने | १,२७,७४६ |
| नंबर प्लेटसाठी बुकिंग | २,४४,७०६ |


# बेफिकिरीने डेंग्यूचा उद्रेक

## दीड हजार घरांत आढळल्या अळ्या; ८१ नवे रुग्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

शहरातील डेंग्यूबाधितांचा आकडा वाढत असल्याने महापालिकेच्या मलेरिया विभागाने सहा विभागांत दोन लाख घरांना भेटी दिल्या. त्यात १,४३१ ठिकाणी डेंग्यूच्या अळ्या आढळून आल्या. त्यामुळे संबंधित बेफिकिरांवर दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करून २३३ जणांना नोटिसाही बजावण्यात आल्या.

पावसामुळे जुलैपाठोपाठ ऑगस्ट महिन्यातही शहरातील डेंग्यूचा उद्रेक कायम असून, ऑगस्टच्या दोन आठवड्यांत डेंग्यू बाधितांचा आकडा ८१ पर्यंत पोहोचला आहे. जुलै महिन्यात डेंग्यूचे ८४ रुग्ण आढळून आले होते. ऑगस्ट महिन्यात पंधरा दिवसांतच डेंग्यूबाधितांनी ८१ चा आकडा ओलांडला आहे. या पार्श्वभूमीवर ही तपासणी करण्यात आली. डेंग्यू आजाराच्या उत्पत्तीस कारणीभूत ठरणाऱ्या एडिस इजिप्ती या प्रजातीच्या डासांची उत्पत्ती स्वच्छ पाण्यातच होते. पावसामुळे घर परिसरातील नारळाच्या करवंट्या, निकामी टायर्स, शोभेच्या वनस्पतींच्या कुंड्या आदींमध्ये पाणी साचते. या स्वच्छ पाण्यात डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती होत असल्याने डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. जुलै महिन्यात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली आहे. शहरात पावसाळा सुरू होताच डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढण्यास सुरुवात झाली आहे. जुलैत रुग्णसंख्या ८४ वर पोहोचली. आता ऑगस्टमध्ये दोन आठवड्यांतच ८१ डेंग्यूबाधित रुग्ण आढळले आहेत .जानेवारीपासून डेंग्यूचे ३०३ रुग्ण आढळून आले आहेत. त्यात नाशिकरोड, सिडको, सातपूर या विभागांत डेंग्यूचा मोठा उपद्रव पाहायला मिळत आहे. डेंग्यूच्या अळ्या तपासण्यासाठी सहा विभागांत मोहीम हाती घेण्यात आली असून, दंडात्मक कारवाई केली जात असल्याची माहिती मलेरिया विभागप्रमुख डॉ. प्रशांत कोशिरे यांनी दिली.




### दोन लाख घरांची तपासणी

महापालिकेच्या मलेरिया विभागाच्या पथकांमार्फत घरोघरी तपासणी करण्यात आली. त्यात नवीन बांधकामे, शासकीय कार्यालये, तसेच नागरिकांच्या घरांना भेटी देण्यात आल्या. सहा पथकांद्वारे करण्यात आलेल्या तपासणीत जवळपास दोन लाख सहा हजार ११५ घरांना भेटी देण्यात आल्या. त्यात १,९५१ ठिकाणी पाणीसाठे आढळून आले. त्यापैकी १,४३१ ठिकाणी डासांची उत्पत्ती करणाऱ्या अळ्या आढळून आल्या. या तपासणीदरम्यान २३३ जणांना दंडात्मक कारवाईच्या नोटिसा देण्यात आल्या. यात सर्वाधिक डेंग्यूच्या अळ्या नाशिकरोड, सिडको आणि सातपूर या ठिकाणी आढळून आल्या आहेत. या भागात धूर फवारणी होत नसल्याचेही चित्र आहे.

# पोस्टाची ‘रजिस्टर्ड’ सेवा ‘स्पीड’ मध्ये विलीन

**डाक विभागाकडून एक सप्टेंबरपासून अंमल शक्य**


जितेंद्र तरटे
jitendra.tarte@timesofindia.com

मटा विशेष

**नाशिक :** 'ओ पाटील , तुमचं रजिस्टरं आहे', ही हाळी आता १ सप्टेंबरपासून पोस्टमनकडून कानावर येणार नाही. काळाशी सुसंगत सेवा देण्याच्या प्रयत्नातून एकेकाळी 'रजिस्टर्ड पोस्ट' या नावाने पोस्ट ग्राहकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारी सेवा आता 'स्पीड पोस्ट' या सेवेत विलीन होणार आहे.

या संदर्भात भारतीय डाक विभागाने अधिकृत घोषणा केली आहे. संवादाची साधने तंत्रज्ञानाच्या युगात वेगाने कार्यरत असताना या स्पर्धेत मागे पडू नये म्हणून टपाल विभागाने हा निर्णय केंद्रीय स्तरावरून घेतल्याचे अधिकारी सांगतात. ही सेवा 'स्पीड पोस्ट' सेवेत विलीन करण्याअगोदर पोस्टाकडून शासनाचे विविध विभाग, न्यायालये, शासकीय-निमशासकीय आस्थापना आदी संस्थांना त्यांच्या सेवा रजिस्टर्ड पोस्टवरून स्पीड पोस्टवर हस्तांतरित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

टपाल वितरणाच्या बाबतीत कुरिअरसारख्या समांतर सेवेशी तुलना करताना 'रजिस्टर्ड पोस्ट' सेवेचा खर्च हा अत्यल्प होता. या तुलनेत 'स्पीड पोस्ट'चा खर्च सुमारे २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. यामुळे सामान्य नागरिक, छोटे व्यापारी, शेतकरी वर्गासह अनेक आस्थापना या सेवेचे वर्षानुवर्षे लाभार्थी होते. काही वर्षांपासून आधुनिक संवाद माध्यमांच्या वाढत्या वापराच्या परिणामी 'रजिस्टर्ड पोस्ट' सेवा घटत असल्याने पोस्टाने हा निर्णय घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



### अधिकच्या दरामुळे भुर्दंड

डाक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक विभागात दिवसाकाठी हजारो 'रजिस्टर्ड पोस्टा'ची नोंदणी होत होती. आता या सेवेस 'स्पीड पोस्ट' सेवेचा पर्याय पोस्टाने तात्काळ उपलब्ध करून दिल्याने ग्राहकांची गैरसोय टळणार असली तरीही अधिकच्या दरामुळे काहीसा भुर्दंड मात्र बसणार आहे.

### ग्राहकांशी भावनिक नाते

पोस्टाच्या 'रजिस्टर्ड' सेवेचा भावबंध देशातील कोट्यवधी ग्राहकांशी जोडला गेला होता. 'रजिस्टर्ड पोस्टा'द्वारे येणाऱ्या तरुणांच्या नोकरीच्या आदेशापासून ते व्यापार-उद्योगातील व्यवहारांच्या पावत्यांपर्यंत, न्यायालयांच्या नोटिशींपासून ते महत्त्वाच्या पत्रव्यवहारापर्यंत असंख्य व्यवहार 'रजिस्टर्ड पोस्टा'द्वारे होत होते. तीन पिढ्यांपासून 'रजिस्टर्ड पोस्ट' सेवेशी ग्राहकांचे भावनिक नाते राहिले.

> **'रजिस्टर टपाल सेवा' ही डाक विभागातील प्रमुख सेवांपैकी एक होती. काळानुरूप पावले टाकताना जलद सेवा देण्याच्या हेतूने डाक विभागाने केंद्र स्तरावरून रजिस्टर टपाल सेवा बंद न करता केवळ ती स्पीड पोस्टमध्ये विलीन केली आहे. या अनुषंगाने अत्याधुनिक सॉफ्टवेअरही अपडेट केले आहेत. याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील**
>
> – प्रफुल्ल वाणी, प्रवर डाक अधीक्षक, डाक विभाग, नाशिक

# वाहतूक कोंडी फुटणार

## नाशिक शहराचे जोडरस्ते होणार अधिक रुंद

- 'एमएमआरडीए'कडून १५ मीटर रस्त्यांबाबत अधिसूचना जारी
- सिंहस्थापूर्वी नाशिकची कनेक्टिव्हिटी वाढणार

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक**

आगामी सिंहस्थ कुंभमेळा, ड्रायपोर्ट, समृद्धी महामार्ग, वाढवण बंदराला नाशिकची कनेक्टिव्हिटी आणि वाढत्या औद्योगीकरणामुळे एनएमआरडीए हद्दीतून शहराला जोडणारे सर्व पोचरस्ते आता १५ मीटर रुंद केले जाणार आहेत. शहराला जोडणारे सर्व रस्ते कमीत कमी १५ मीटर आणि जास्तीत जास्त ३० मीटर रुंदीकरणाबाबतचे आदेश नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काढले आहेत. सध्या अस्तित्वातील नऊ मीटर, तसेच १२ मीटरच्या रस्त्यांचेही विस्तारीकरण होणार असल्यामुळे नाशिकची कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.

शहराचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. महापालिका हद्दीत विस्तारीकरणाला जागा नसल्यामुळे सरकारने शहराभोवतालचा परिसर विकसित करण्यासाठी २०१६ मध्ये नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एनएमआरडीए) स्थापना केली आहे. एनएमआरडीएच्या माध्यमातून सिन्नर, पिंपळगाव, निफाड, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी परिसराचा विकास केला जाणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने या क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. समृद्धी महामार्गासह प्रस्तावित ड्रायपोर्ट, आयटी पार्क, वाढते औद्योगीकरण, लॉजिस्टिक पार्क, ओझर विमानतळाचा विस्तार, वाढवण बंदराशी नाशिक थेट जोडले जाणार असल्यामुळे येत्या काळात नाशिकची कनेक्टिव्हिटी अधिकच वाढणार आहे. येत्या काळात नाशिकमध्ये येणाऱ्यांची गर्दी पाहता, रस्त्यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. नाशिकच्या विकासाला हातभार लावतील, अशा पद्धतीने मोठमोठ्या रस्त्यांचे नियोजन सुरू केले आहे. कार्यक्षेत्रातील रस्त्यांबाबत नवीन नियमावली तयार केली आहे. भविष्यातील नाशिकचा विकास पाहता 'एनएमआरडीए'ने रस्ते रुंदीकरणाबाबतच्या नियमावलीत बदल करत आपल्या कार्यक्षेत्रात यापुढे कमीत कमी १५ मीटरपासून ३० मीटरपर्यंतचे रस्ते मंजूर केले जाणार आहेत. त्यामुळे सध्या अस्तित्वातील रस्ते रुंद होणार असल्यामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी टळणार असल्याचे चित्र आहे.



### असा आहे आदेश

आता ले-आउट करताना प्रमुख रस्त्यांना जोडणारे रस्ते १५ मीटर बंधनकारक करण्यात आले आहे. प्रचलित एकिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील तरतुदींनुसार आवश्यक उपलब्ध पोचरस्त्याच्या रुंदीनुसार एनएमआरडीए हद्दीत प्रस्तावाधीन जागेत विकास परवानगी दिली जाते. त्या अनुषंगाने भविष्यातील मोठ्या रुंदीच्या रस्त्यांची आवश्यकता विचारात घेता, पोचरस्त्यांची किमान रुंदी १५ मीटर अनिवार्य असेल, तसेच अपरिहार्य भौतिक किंवा भौगोलिक अडथळे जसे, की नदी, धरणे, डोंगर आदींबाबत महानगर आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने किमान १२ मीटर रुंदीचा पोचरस्ता संमतीने घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल. एनएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. माणिकराव गुरसळ यांच्या स्वाक्षरीने आदेश काढण्यात आले आहेत. त्यामुळे ले-आउट करताना जागामालकांना जागा सोडावी लागणार आहे.

# ‘एक्स्पो’त शंभर कोटींची उलाढाल

## ‘क्रेडाई’च्या गृह प्रदर्शनाचा समारोप; नागरिकांची गर्दी

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

क्रेडाई नाशिक मेट्रोच्या ‘नमः नाशिक’ या गृह प्रदर्शनाच्या अखेरच्या दिवशी नागरिकांनी मोठी गर्दी केली. पाच दिवसांच्या या प्रदर्शनातून तब्बल शंभर कोटींची उलाढाल झाल्याचे सांगितले जात असून, आगामी सणासुदीच्या काळात आणखी व्यवहार होण्याची शक्यता आहे.

क्रेडाई नाशिक मेट्रोच्या वतीने ठक्कर डोम येथे दि. १४ ऑगस्टपासून हे प्रदर्शन सुरू होते. त्याचा सोमवारी (दि. १८) समारोप झाला. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, ‘म्हाडा’चे विभागीय अध्यक्ष रंजन ठाकरे यांची उपस्थिती होती. भुसे म्हणाले की, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विकासकामे होणार असून, देशविदेशातील भाविकांसाठी हा सोहळा संस्मरणीय ठरणार आहे. नाशिकची ‘एज्युकेशन हब’ अशी ओळख निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. रंजन ठाकरे यांनी सांगितले की, ‘म्हाडा’ ही बांधकाम व्यावसायिकांना त्रास देणारी संस्था असे अनेकांना वाटते. यापूर्वी जे झाले ते झाले. ‘म्हाडा’ला घाबरण्याचे कारण नसून, शासन निर्णयात काही त्रुटी असतील तर त्या दूर करता येतील.

क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरव ठक्कर म्हणाले की, आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे प्रदर्शन अनेक कारणांनी यशस्वी ठरले. प्रदर्शनामुळे नाशिकचे ब्रॅण्डिंग होण्यास मदत झाली. टाऊनशिप, अॅमिनिटीजबरोबरच मोठ्या घरांकडे कल दिसून आला.

समन्वयक नरेंद्र कुलकर्णी यांनी प्रदर्शनाचा आढावा घेतला. ते म्हणाले की, प्रदर्शन कालावधीत पन्नासहून अधिक फ्लॅट व प्लॉटचे स्पॉट बुकिंग करण्यात आले. अनेक साइट व्हिजिटही झाल्या असून, सणासुदीत बुकिंग होतील. याप्रसंगी माजी अध्यक्ष कृणाल पाटील, एक्स्पो समितीप्रमुख मनोज खिंवसरा, उपाध्यक्ष अनिल आहेर, उदय घुगे, प्रवीण तिदमे, कामगार विकास उपायुक्त विकास माळी, माजी अध्यक्ष जितेंद्र ठक्कर, सुरेश पाटील, अनंत राजेगावकर, किरण चव्हाण, सुनील कोतवाल, उमेश वानखेडे, रवी महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मानद सचिव तुषार संकलेचा यांनी स्वागत केले. ते म्हणाले की, शहराची प्रगती व अर्थकारण यात बांधकाम व्यावसायिकांचा मोठा वाटा असून, एका गृह प्रकल्पामुळे अनेकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. समन्वयक ऋषिकेश कोते यांनी आभार मानले.

प्रदर्शन यशस्वीतेसाठी क्रेडाई नाशिक मेट्रोचे कोशाध्यक्ष श्रेणिक सुराणा, सहसचिव सचिन बागड, हंसराज देशमुख, वृषाली हिरे, दीपाली बिरारी, भूषण कोठावदे, शिवम पटेल, हिरेन भडजा, मयुरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल, आदित्य भातंबरेकर आदींनी परिश्रम घेतले.

पंकज चांडोले



### उत्कृष्ट स्टॉलसाठी पुरस्कार

प्रथम : वास्तू ग्रुप, द्वितीय : ठक्कर ग्रुप लिमिटेड, तृतीय : कन्स्ट्रुवेल प्रा. लिमिटेड, चतुर्थ : स्पॅन कन्स्ट्रक्शन्स

# पोलिसांची कारकीर्द आता ‘ई-सेवापुस्तिकेत’

## राज्यात सर्वत्र ‘ई-ऑफिस’ कार्यान्वित

सौरभ बेंडाळे
saurabh.bendale@timesofindia.com

**नाशिक :** पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवाअंतर्गत आणि सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ देणे सुलभ व्हावे, तसेच संबंधितांच्या कारकीर्दीची अचूक आणि स्पष्ट नोंद व्हावी, याकरिता सेवापुस्तिका ई-स्वरूपात करण्याचा निर्णय गृह मंत्रालयाने घेतला आहे. त्या संदर्भात राज्य पोलिस दलातील सर्व घटकप्रमुखांना आदेश देण्यात आले असून, ‘ई-ऑफिस’ कार्यपद्धतीची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यापाठोपाठ जीर्ण सेवापुस्तिकांचे ‘स्कॅनिंग’ होणार असून, सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे ‘ई-सेवापुस्तक’ राज्यातील सर्व पोलिस घटकांत तयार होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये शंभर दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर आता दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. त्याअंतर्गत पोलिस दलाची कार्यपद्धती ई-स्वरूपात सुरू झाली आहे. राज्यातील सर्व पोलिस घटकांत ‘ई-ऑफिस’ सुरू करून त्याद्वारे नियमित पत्रव्यवहार, आदेश जारी करण्यासह अधिकारी ई-स्वाक्षरी करीत आहेत. विशेष म्हणजे, अधिकारी-कर्मचाऱ्यांना रजेचा अर्ज सादर करण्यासाठीही आता ‘ई-ऑफिस’चा वापर करावा लागत आहे. त्यामुळे कार्यपद्धतीत ‘डिजिटायझेशन’सह अधिक पारदर्शकता निर्माण होत आहे.

दरम्यान, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे स्थायित्व प्रमाणपत्र, सेवेतील नियमित दिनांक, वेतनविषयक लाभ, कारकिर्दीच्या नोंदींसह निवृत्तिवेतन, उपदान, रजा रोखीकरणासह इतर नोंदणी सेवापुस्तिकेत करण्यात येतात. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या सूचनेनुसार, शहरात आस्थापनेवर महा-आस्था प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्या कक्षाचे सह व उपसचिव प्रशासकीय अधिकारी नागेश हडपे, तर कार्यालय अधीक्षक गोरख भोईर अवर सचिव आहेत. राज्यातील सर्व घटकांत या स्वरूपाचे कामकाज होत असून, त्यासाठीचे वेळापत्रक संबंधित नोडल अधिकाऱ्यांना दिले आहे.

### कामकाज असे...

- सेवापुस्तिकातील नोंदी अद्ययावत करण्यासह सेवापुस्तिका सुस्थितीत ठेवणे
- सेवापुस्तिकांचे स्कॅनिंग करण्यासाठी फाटलेल्या अथवा खराब पानांची दुरुस्ती करावी
- महा-आस्था कक्षाकरिता स्वतंत्र ई-मेल तयार करावा
- ‘ई-ऑफिस’मध्ये सर्व पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांची नोंद करावी
- मंत्रालयीन कर्मचाऱ्यांकडे शासकीय ई-मेल नसल्यास ते प्राधान्याने तयार करून घ्यावेत

**मटा विशेष**

**“आयुक्तालयातील कामकाजात ई-ऑफिसचा वापर करीत आहोत. ई-स्वाक्षरी सुरू असून, सेवापुस्तिका ई-स्वरूपात करण्यात येणार आहेत. महा-आस्था कक्ष नेमला असून, प्रत्येक कामकाजाचा अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे. त्याबाबत सरकारलाही वेळोवेळी अहवाल सादर होणार आहे.**

- चंद्रकांत खांडवी, पोलिस उपायुक्त, मुख्यालय नाशिक

# मुदतवाढीनंतरही पीकविम्याकडे पाठच!

## ६३ हजार शेतकरी बाकी; तीन लाख हेक्टर क्षेत्र संरक्षित

म. टा. वृत्तसेवा, सिन्नर

एक रुपयात पीकविमा मिळण्याची बंद केलेली योजना, नुकसानभरपाई मिळण्याचे बदललेले ट्रिगर आणि राज्य आणि केंद्र शासनाने हिस्सा न भरता संपूर्ण विमा रक्कम भरण्याचा शेतकऱ्यांच्या माथी मारलेला आर्थिक भुर्दंड त्यामुळे शेतकऱ्यांनी पीकविमा भरण्याकडे पाठ फिरवली. परिणामी, गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ६३ हजार २३३ शेतकऱ्यांनी अद्याप पीकविमा घेतलेला नाही.

गतवर्षी एक रुपयात पीकविमा योजना असताना जिल्ह्यातील पाच लाख २१ हजार ३७४ शेतकऱ्यांनी पिकांचा विमा उतरवला होता. यंदा केवळ चार लाख ५८ हजार १४१ शेतकऱ्यांनीच विमा उतरवला आहे. मालेगाव तालुक्यात सर्वाधिक ८५ हजार ९५१, तर नाशिक तालुक्यात सर्वात कमी ४४५६ शेतकऱ्यांनी विम्याचे संरक्षण घेतले. मालेगाव तालुक्याखालोखाल येवला तालुक्यात ६२ हजार ८०९ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीकविमा उतरविला आहे. खरीप हंगाम २०२५ वर्षाकरिता ३१ जुलैपर्यंत प्रारंभी पीकविमा भरण्याची मुदत होती. मात्र, बहुतेक शेतकरी विमा योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने शासनाने १४ ऑगस्टपर्यंत मुदत वाढ दिली होती. त्यामुळे प्रधानमंत्री पीकविम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. ३१ जुलैपर्यंत साडेतीन लाखांवर थांबलेली विमाधारकांची संख्या तब्बल एक लाखापेक्षा अधिक वाढली.

खरीप हंगामात भात, ज्वारी, कापूस, बाजरी, सोयाबीन, मूग, उडीद, तूर, मका, कांदा, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे या खरीप पिकांसाठी पीकविमा संरक्षण प्राप्त झाल्याने १४ ऑगस्टपर्यंत नाशिक जिल्ह्यात चार लाख ५८ हजार १४१ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीकविम्याचे कवच घेतले.



### कृषी विभागाकडून जनजागृती

कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्या माध्यमातून गावोगावी जाऊन प्रधानमंत्री पीकविमा योजनेची माहिती देऊन प्रचार प्रसिद्धी व जनजागृती मोहीम राबविण्यात आली होती. मात्र, विमा संरक्षित रक्कम मिळण्याचे ट्रिगर बदलल्याने यामुळे शेतकरी पीकविमा भरण्यास अनुत्सुक दिसले.

### पीकविमा घेतलेले तालुकानिहाय शेतकरी

| तालुका | कर्जदार शेतकरी | बिगर कर्जदार शेतकरी |
|---|---|---|
| बागलाण | १२६ | ५२,१९५ |
| चांदवड | १८९ | ५४,६५९ |
| देवळा | १४ | ३२,५३५ |
| दिंडोरी | २४ | ४२०४ |
| इगतपुरी | ४२ | २७,९२६ |
| कळवण | ०० | ४,७५५ |
| मालेगाव | २२ | ८५,९२९ |
| नांदगाव | ५० | ५१,९२५ |
| नाशिक | २५ | ४,४३१ |
| निफाड | ९५ | २१,६८८ |
| पेठ | ०० | ६,४३१ |
| सिन्नर | ७५ | ३२,४४० |
| सुरगाणा | ०० | ८,३५७ |
| त्र्यंबकेश्वर | १० | ७,१७९ |
| येवला | १९८ | ६२,६११ |

- २०२५ खरीप हंगामातील पीकविमा धारक शेतकरी : ४ लाख ५८ हजार १४१
- २०२४ खरीप हंगामातील पीकविमा धारक शेतकरी : ५ लाख २१ हजार ३७४
- सन २०२५ मधील खरीप विमा संरक्षित क्षेत्र : २,९५,३६६.१६ हेक्टर

# पार्किंगचे नियोजन

## सिंहस्थ पर्वणीत ५० लाख भाविकांच्या वाहनांची व्यवस्था

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

सन २०२७ मध्ये होत असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात प्रत्येक पर्वणीला ५० लाख भाविक अपेक्षित धरून गर्दीचे नियोजन करण्यासह वाहनतळ व पार्किंगचेही नियोजन सुरू केले आहे. शहरात येणाऱ्या आठ रस्त्यांवर पार्किंगसाठी २२ ठिकाणी वाहनतळ उभारले जाणार असून, जवळपास २६३ हेक्टर जागेवर पार्किंग असणार आहे. या पार्किंग स्थळापासून नदीकाठावरील घाटापर्यंतचे अंतर दोन ते अडीच किलोमीटरपेक्षा अधिक असू नये अशा सूचना महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी दिल्या आहेत. त्यानुसार सिंहस्थाशी संबंधित सर्व विभाग उद्या, बुधवारी (दि. २०) संयुक्त पाहणी करणार असून, गुरुवारी (दि. २१) विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अहवाल सादर करणार आहेत.

नाशिकमध्ये सन २०२६-२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत असून, त्याची प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू झाली आहे. प्रयागराजच्या धर्तीवर नाशिकचा कुंभमेळा व्हावा यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सिंहस्थाच्या तयारीसंदर्भात बैठक होऊन नियोजनाला चालना देण्याचे निर्देश त्यांनी दिले होते. त्यानुसार प्रशासनानेही गर्दीचे नियोजन सुरू केले आहे. तर, विभागीय आयुक्त तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी महापालिकेला वाहनतळांसह पार्किंगसाठीचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार नाशिक महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे वाहतूक व्यवस्थापन आणि पार्किंग सुविधांसाठी नियोजन सुरू केले आहे. सोमवारी (दि. १८) महापालिका आयुक्त खत्री यांच्या अध्यक्षतेखाली या सर्व विभागांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक किरण भोसले, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खाडवी, जलसंपदाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, शहर अभियंता संजय अग्रवाल, वाहतूक सेलचे कार्यकारी अभियंता रवींद्र बागूल यांच्यासह रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत महापालिकेने तयार केलेल्या पार्किंग आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर या बैठकीत भाविकांची जास्त पायपीट होऊ नये यासाठीचे नियोजन करण्यात आले. सिंहस्थातील पार्किंग ते घाटापर्यंत भाविकांना घेऊन जाण्यासह शहराबाहेर भाविकांना सोडण्यासंदर्भातील नियोजनावर चर्चा झाली. शहराबाहेर पार्किंग, तेथून बसेसद्वारे घाटापर्यंत पोहचविण्याचे नियोजन, त्यानंतर पुन्हा शहराबाहेर भाविकांना सोडविण्यासाठी या बैठकीत चर्चा झाली.

चित्र : एआय




**“ सिंहस्थात पार्किंगच्या नियोजनासाठी सर्व विभागांचा २० तारखेला एकत्र पाहणी दौरा केला जाणार आहे. भाविकांची पायपीट होऊ नये यासाठी घाट आणि पार्किंगचे अंतर कमीत कमी ठेवण्याचे नियोजन आहे.**

- प्रदीप चौधरी, अतिरिक्त आयुक्त, मनपा

### पार्किंग स्थळांची संयुक्त पाहणी

शहराच्या बाहेरून येणाऱ्या वाहनांना शहरात प्रवेश न देता नियोजित वाहनतळांवर वाहने पार्किंग करता येतील, यासाठी महापालिकेने हद्दीत २२ ठिकाणी वाहनतळ प्रस्तावित केले आहेत. यामध्ये पेठरोड, दिंडोरी रोड, धुळेरोड, पुणेरोड, गंगापूररोड, त्र्यंबकरोड, मुंबईरोड, संभाजीनगर रोड आदी ठिकाणी वाहनतळांचा समावेश आहे. त्यामुळे या पार्किंग स्थळांची उद्या, बुधवारी वाहतूक सेल, एसटी महामंडळाचे अधिकारी, रेल्वेचे अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस अधिकारी संयुक्त पाहणी करणार आहेत. या पाहणीचा अहवाल २१ तारखेला विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे होणाऱ्या बैठकीत ठेवला जाणार आहे. त्यानंतर पार्किंगस्थळे अंतिम केली जाणार आहेत.

# घाट माथ्यावर आज 'रेड अलर्ट'

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

राज्यात मुंबईसह अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस सुरू असून, नाशिककरांना अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. हवामान विभागाने मंगळवारी नाशिक जिल्ह्याच्या घाट माथ्यावर रेड अलर्ट दिला आहे. त्यामुळे अनेक भागांत मुसळधार पाऊस किंवा अतिवृष्टी होण्याची शक्यता असून, नदीकाठच्या रहिवाशांना जिल्हा प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. सोमवारी शहरात पावसाचा हलका शिडकावा झाला. दिवसभरात केवळ १.२ मिमी पावसाची नोंद झाली.



नाशिक जिल्ह्यात सोमवारी यलो अलर्ट देण्यात आला होता. ग्रामीण भागात काही ठिकाणी पावसाच्या मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. परंतु, शहरात मात्र केवळ हलक्या सरींचा शिडकावा झाला. हवामान विभागाने आज, मंगळवारी (दि. १९) नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर पावसाचा 'रेड अलर्ट' जारी केला आहे. याशिवाय बुधवारीही 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवस जिल्ह्यात धुव्वांधार पाऊस होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाने शहर आणि जिल्ह्यात नदीकाठांवर राहणाऱ्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## गंगापूर धरणातून विसर्गाची शक्यता

हवामान विभागाने १८ ते २१ ऑगस्ट या कालावधीत कोकण व घाट भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तविला आहे. घाटमाथा प्रामुख्याने गंगापूर धरणाचे पाणलोट क्षेत्र आहे. त्यामुळे पावसाचा जोर वाढेल तसा गंगापूरसह अन्य धरणांमधून विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे पावसाचा जोर वाढेल, तसा विसर्गही वाढविण्यात येणार असून नदीकाठच्या रहिवाशांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले आहे.

# प्रारूप प्रभागरचनेवरील हरकतींसाठी मुदतवाढ

**म. टा. विशेष प्रतिनिधी**, नाशिक

राज्यात २२ ते २८ ऑगस्टदरम्यान शासकीय सुट्ट्या असल्यामुळे महापालिका निवडणुकांसाठी प्रभागरचनेच्या कालबद्ध कार्यक्रमात पुन्हा दुरुस्ती करण्यात आली आहे. राज्यांच्या नगरविकास विभागाकडून प्रारूप प्रभागररचनेवरील हरकती व सूचनांसाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे. आलेल्या हरकतींवर ५ ते १२ सप्टेंबरदरम्यान सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाला फेर प्रभागरचनेचे निर्देश दिले. नगरविकास विभागाने २०२२ मधील प्रभागरचनेबाबत घेतलेले आदेश कायम ठेवत, त्यानुसार महापालिकांना चार सदस्यीय प्रभागरचना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार नाशिक महापालिकेने २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे १२२ सदस्यसंख्या असलेले चार सदस्यीय २९ व तीन सदस्यीय दोन अशा एकूण ३१ प्रभागांची प्रारूप रचना तयार केली. महापालिकेच्या निवडणूक विभागाने प्रत्येक प्रभागामध्ये जाऊन पुन्हा सीमा निश्चिती, महामार्ग तसेच रस्त्यांच्या सीमा, तसेच अन्य हरकतींची तपासणी केली. त्यानुसार ३१ प्रभागांची प्रारूप रचना बंद लिफाफ्यात

## राज्य शासनाकडून सुधारित कार्यक्रम

महापालिकेने ५ ऑगस्ट रोजी राज्य शासनाला सादर केली होती. यानंतर राज्याच्या नगरविकास विभागाने प्रारूप प्रभागरचनेचा आराखडा राज्य निवडणूक आयोगाला सादर केला. आधीच्या कार्यक्रमानुसार २२ ते २८ ऑगस्टदरम्यान प्रारूप प्रसिद्धी व त्यावर हरकती व सूचनांसाठी मुदत देण्यात आली होती. सुधारित कार्यक्रमानुसार २२ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान प्रारूप प्रसिद्धी व त्यावर हरकती-सूचनांसाठी मुदत देण्यात आली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार हरकती व सूचनांसाठी मुदत वाढवून देण्यात आल्याने आता ५ ते १२ सप्टेंबरदरम्यान प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी केली जाणार आहे.

# अकरा नगर परिषदांची प्रारूप रचना प्रसिद्ध

**म. टा. खास प्रतिनिधी,** नाशिक

जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांची प्रारूप प्रभाग रचना सोमवारी प्रसिद्ध करण्यात आली. यावर हरकती व सूचना दाखल करण्याकरीता ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार असून, दिवाळीनंतर बिगुल वाजणार आहे. नगर परिषदांच्या प्रभाग रचनेच्या वेळापत्रकानुसार प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगर विकास विभागाद्वारे निवडणूक आयोगाकडे सादर झाला. आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांद्वारे प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिल्यानंतर सोमवारी जिल्ह्यातील ११ नगर परिषदांच्या प्रारूप प्रभाग रचना संबंधित नगर परिषदांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. जिल्ह्यात एकूण ११ नगर परिषदांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. मनमाड (३३), सिन्नर (३०), ओझर (२७), येवला (२६), पिंपळगाव बसवंत (२५), सटाणा (२४), इगतपुरी (२१), चांदवड, भगूर, त्र्यंबकेश्वर आणि नांदगाव नगर परिषदेत प्रत्येकी २० जागांसाठी निवडणूक होणार आहे. यातील ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. प्रारूप प्रभागरचनेबाबत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर १ ते ८ सप्टेंबर या कालावधीत सुनावणी होईल. त्यानंतर अंतिम केलेली प्रभागरचना पुढील काळात नगर विकास विभागाला सादर केली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम केलेली प्रभाग रचना २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत प्रसिद्ध होणार आहे.

## अंतिम प्रारूप मान्यता २२ ऑगस्टला

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गट-गणाच्या अंतिम प्रारूप मान्यतेला राज्य निवडणूक आयोगाने शुक्रवारपर्यंत (दि. २२) मुदतवाढ दिली आहे. परंतु, अंतिम प्रसिद्धीची नवीन तारीख आयोगाने जाहीर केली नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. प्रस्तावित प्रारुपानुसार जिल्हा परिषदेत नव्याने तीन गट वाढले असून, त्यांची एकूण संख्या ७४ वर पोहचली आहे. तर, पंधरा पंचायत समित्यांमधील गणांची संख्या १४८ वर पोहचली आहे. यावर ६४ हरकती दाखल झाल्या. विभागीय आयुक्तांकडे त्यावर सुनावणी घेण्यात आली. सोमवारी (दि. १८) जिल्हाधिकाऱ्यांनी गट-गणाचे अंतिम प्रारूप आयोगाकडे सादर करून त्यास प्रसिद्धी देणे अपेक्षित होते. परंतु, आयोगाने गट-गणाचे प्रारूप अंतिम करण्यासाठी चार दिवसांची मुदत वाढवून दिली आहे. आता शुक्रवारी (दि. २२) जिल्हाधिकारी गट-गण अंतिम करून त्याचे प्रारूप आयोगाकडे सादर करतील.

# अमली पदार्थांविरोधात कारवाईस जिल्ह्यात वेग

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

नाशिक शहरात अडीच वर्षांत अकरा कोटी ७५ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त झाले असून, जिल्ह्यातही गांजा, मॅफेड्रॉन (एमडी) यासह इतर अमली पदार्थांच्या सेवनामुळे असंख्य तरुणांसह अनेकांचे जीवन संकटात सापडले आहे. या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थांपासून 'स्वातंत्र्य' या संकल्पनेवर आधारित जनजागृतीसह 'ड्रग्ज पेडलर्स'वर छापेमारीस प्रारंभ केला आहे.

केवळ नाशिकच नव्हे, तर महाराष्ट्रासह देशभरात 'ड्रग्ज'चा विळखा घट्ट होत असल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाने जनजागृती मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे. शहरात सलग दोन वर्षांपासून मॅफेड्रॉन (एमडी) तस्करीमध्ये कारखाने, गोदामांसह मुंबई-भिवंडी-ठाणेमार्गे संशयितांनी नशेखोरीत पाऊल टाकल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तांत्रिक तपासाअंती व्यवहारांच्या 'कनेक्शन'मध्ये ठराविक पद्धतीचे 'कॉल्स' व 'डार्क वेब'चा वापर झाल्याचे समोर येत आहे. अडीच वर्षांत नाशिक शहरात ११ कोटी ७५ लाख २८ हजार ९९८ रुपयांचे ड्रग्ज जप्त झाले आहेत. तस्करीत तंत्रज्ञानाचा वापर अधिक होत असल्याने संशयितांची साखळी उघड करण्यात काहीसे अडथळे पोलिसांसमोर उभे ठाकले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयानेही याची दखल घेत राज्यभरात सर्वत्र 'ड्रग्जपासून स्वातंत्र्य' ही मोहीम राबविण्याची सूचना केली आहे. त्यानुसार शहरात पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, तर जिल्ह्यात ग्रामीण अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार 'ड्रग्ज फ्री' मोहीम राबविण्यात येत आहे.

अमली पदार्थांचा वापर, विक्री, साठा करणाऱ्यांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू आहे. 'ड्रग्जमुक्त' नाशिकसाठी पथके प्रबोधन करीत असून, नागरिकांनीही अमली पदार्थ विक्रेत्यांबाबत माहिती द्यावी, असे आवाहन गुन्हे शाखेचे सहाय्यक आयुक्त संदीप मिटके यांनी केले आहे.

# जिल्हा अहिल्यानगर

दै.लोकमत

दि.१९ ऑगस्ट,२०२५

लोकमत

# नेवाशामध्ये अग्नितांडव, फर्निचरच्या गोदामाला आग लागून एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

## आगीचे कारण अस्पष्ट, चुलतभाऊ बालंबाल बचावला, गोदामातील साहित्याचा कोळसा, तरुणांकडून मदतकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**नेवासा :** शहरातील अहिल्यानगर परिसरातील कालिका फर्निचरच्या मागील बाजूस असलेल्या गोदामाला रविवारी (१७ ऑगस्ट) मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील पाच जणांचा गुदमरून मृत्यू झाला. मयूर अरुण रासने (वय ३८), त्यांची पत्नी पायल मयूर रासने (वय ३०), दोन मुले अंश (वय ११) व चैतन्य मयूर रासने (वय ६), तसेच आजी सिंधुताई चंद्रकांत रासने (वय ८७) अशी मृतांची नावे आहेत. दरम्यान, या घटनेत चुलत भाऊ यश रासने हा बालंबाल बचावला. आगीचे कारण समजू शकले नाही.

नेवाशातील 'कालिका फर्निचर' या दुकानाच्यावर रासने कुटुंब राहत होते. दुकानामागे त्यांचे चार ते पाच हजार चौरस फुटाचे गोडाऊन आहे. त्यात टीव्ही, कपाटे, फ्रीज, बेड, वॉशिंग मशीन आदींसह फर्निचरचे साहित्य होते. रविवारी मध्यरात्री अचानक गोदामाला आग लागली. दुकानावरील तिसऱ्या मजल्यावर मयूर रासने, पत्नी पायल रासने, मुलगा अंश व चैतन्य व त्यांची आजी सिंधुताई चंद्रकांत रासने झोपले होते, तर दुसऱ्या मजल्यावर चुलतभाऊ यश रासने झोपला होता. आग लागल्याचे लक्षात येताच, परिसरातील नागरिकांनी रासने कुटुंबास मोठमोठ्याने आवाज दिला. लोकांचा आवाज ऐकून यश रासने जागा झाला. त्यानंतर काही तरुणांनी त्यास बाहेर काढले. यश याच्या माहितीनुसार, नेवाशाचे पोलिस निरीक्षक महेश पाटील हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, नेवासा



पायल रासने मयूर रासने



सिंधुताई रासने

नगरपंचायत व ज्ञानेश्वर कारखाना, भेंडा येथील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी आल्यानंतर सोमवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास आग आटोक्यात आली. त्यानंतर मयूर व इतरांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले असता, पाचही जणांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, यश यास नेवासा फाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असून, त्याची प्रकृती स्थिर आहे. नेवासा ग्रामीण रुग्णालयात पाचही मृतदेहांची उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर सोमवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास नेवाशातील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, उदयन गडाख, बाजार समितीचे नंदकुमार पाटील, शरद भाद्रकर, श्रीधर कासार यांनी मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रकरणी नेवासा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने नेवासा शहर व परिसरात शोककळा पसरली आहे.



अंश रासने



चैतन्य रासने

### आई-वडील गावाला गेल्याने बचावले

मृत मयूरचे वडील अरुण व आई नंदा रासने हे मालेगाव येथील पाहुण्यांकडे गेले होते. त्यामुळे सुदैवाने ते या घटनेत बचावले. नेवासा येथे आल्यानंतर मुलासह नातवंडांचे मृतदेह पाहून त्यांना मोठा धक्का बसला. त्यांनी केलेला आक्रोश पाहून अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

### आईच्या कुशीत चिमुकल्यांचा अखेरचा श्वास

रासने कुटुंबातील अंश व चैतन्य हे चिमुकले रात्री आई पायल यांच्या कुशीत झोपले होते. आईच्या कुशीतच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आई पायल यांच्या चितेवरच या दोन्ही मुलांचाही अंत्यसंस्कार करण्यात आला. मृत मयूर रासने व आजी सिंधुताई यांच्यावर त्यांच्या शेजारी अंत्यसंस्कार करण्यात आले.





नेवासा येथील फर्निचरच्या गोदामाला रविवारी मध्यरात्री आग लागली. यात गोदाम खाक झाले. वरील छायाचित्रात आगीचे लोळ दिसत आहेत. छाया : सुहास पळाडे

### बचावासाठी गेलेल्या तरुणांचेही श्वास कोंडले

रासने कुटुंबाला वाचविण्यासाठी काही तरुणांनी क्रेनच्या सहाय्याने घरात जाण्याचा प्रयत्न केला, मात्र धुराचे लोट मोठ्या प्रमाणात निघत असल्याने मदतकार्यात अडथळा येत होता. क्रेनच्या सहाय्याने वर गेलेल्या तरुणांचाही धुरामुळे श्वास कोंडला. प्रकृती बिघडल्याने त्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर आहे.

**दै.दिव्य मराठी** **दि.१९ ऑगस्ट,२०२५**

**पाऊसपाणी** २४ तासांत ८.३ मिमी पाऊस, धरणाच्या क्षेत्रात पावसाचा जोर, अद्याप ५४ मिमी पावसाची तूट कायम

# ७८ दिवसानंतर २०७ मिमीची सरासरी पावसाने ओलांडली

प्रतिनिधी | अहिल्यानगर

जिल्ह्यात गेल्या २४ तासांत झालेल्या पावसामुळे ७८ दिवसानंतर २०७ मिमी सरासरी ओलांडली ओलांडली. मंगळवारी (१९ ऑगस्ट) जिल्ह्यात भारतीय हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. जिल्ह्यात २४ तासांत ८.३ मिमी पाऊस, धरणाच्या क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. नदीपात्रांतून धरणांत पाणी सोडले जात आहे. सोमवारी शहर व परिसरात दिवसभर रिमझिम पाऊस सुरु होता. दरम्यान, जून, जुलै व १८ ऑगस्टपर्यंत २६१ सरासरी पाऊस होत असतो, यंदा मात्र या कालावधीत २०७ मिमी पाऊस झाला असून, ५४ मिमी पावसाची तूट कायम आहे.

यंदा जून, जुलै महिन्यातील बहुतेक दिवस पावसाने पाठ फिरवली होती. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यातही केवळ ढगाळ वातावरण होते. मात्र १४ ऑगस्टपासून पुन्हा पावसाला सुरुवात झाली होती. गेल्या ४ दिवसांपासून शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरु आहे. रविवारी देखील दिवसभर रिमझिम पाऊस होता, सोमवारीही दिवसभर रिमझिम पाऊस सुरु होता.



जिल्हाभरात ढगाळ वातावरण असून विस्कळीत स्वरूपाचा पाऊस सुरू आहे.

जून-जुलै महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होऊनही जिल्ह्यात ६ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरण्या झाल्या होत्या, मात्र मध्यंतरी पावसाअभावी खरीपाची पिके सुकू लागली होती. त्यातच आता पावसाला पुन्हा सुरुवात झाल्यामुळे या पिकांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत अहिल्यानगर २१०, पारनेर १७६, श्रीगोंदे १९७, कर्जत २४४, जामखेड २३०, शेवगाव २४९, पाथर्डी २२६, नेवासे १९५, राहुरी १३०, संगमनेर १६७, अकोले २६५, कोपरगाव १७७, श्रीरामपूर १३१, राहता १८६ मिमी पाऊस झाला आहे. दरम्यान सोमवारी भिमा नदीतून दौंड पुलात ३ हजार ४४ क्युसेक, सीना नदीतून सीना धरणात २६९ क्युसेकने पाण्याचा विसर्ग झाला. अहिल्यानगर जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भिमा, प्रवरा, गोदावरी, घोड, सीना तसेच मुळा धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे नद्यांची पाणीपातळी वाढू शकते. मुळा नदीपात्रातील कोतूळ येथून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## नदीकाठावरील गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

भिमा नदी (दौंड पूल) -३०४४ क्युसेक, सीना नदी (सीना धरण) २६९ क्युसेकने विसर्ग सुरु आहे. पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भिमा, प्रवरा, गोदावरी, घोड, सीना तसेच मुळा धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे नद्यांची पाणीपातळी वाढू शकते. मुळा नदीपात्रातील कोतूळ येथून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## २४ तासांत झालेला पाऊस

गेल्या २४ तासांत अहिल्यानगर ४.२ पारनेर ०८, श्रीगोंदे ०.९, कर्जत १.६, जामखेड ५.३, शेवगाव २२.५, पाथर्डी ९.५, नेवासे २०.४, राहुरी ६.८, संगमनेर ७.६, अकोले २८, कोपरगाव १५.७, श्रीरामपूर ४.५, राहता १९.२ मिली मीटर पाऊस झाला आहे.

**समस्या** • सकाळी ९ ते दुपारी दीड वाजेपर्यंत या मार्गावर वाहनांच्या लागतात लांब रांगा

# तारकपूरच्या एकेरी रस्त्यावर वाहतूक कोंडीचा 'हॉटस्पॉट'

**प्रतिनिधी** | अहिल्यानगर

तारकपूर बसस्थानक परिसर सध्या वाहतूक कोंडीचा 'हॉटस्पॉट' ठरत आहे. मनमाड रस्त्यावरील सिमेंट काँक्रिटीकरण आणि एकेरी रस्त्यावरून चालणारी दुहेरी वाहतूक, यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सकाळी ९ ते दुपारी दीड वाजेपर्यंत या मार्गावर गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागतात. रुग्णवाहिकाही वाहतूक कोंडीत अडकत असल्याने आपत्कालीन सेवा विस्कळीत होत आहे.

पोलिस अधीक्षक चौक ते पत्रकार चौकदरम्यान सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे तारकपूर बसस्थानकाच्या एका बाजूचे प्रवेशद्वार पूर्णतः बंद केले आहे. हॉटेल धामजवळील दुसऱ्या बाजूच्या प्रवेशद्वारातूनच बससेवा सुरू आहे. या प्रवेशमार्गावरून बस, खाजगी वाहने, दुचाकी, रिक्षा अशी सर्व प्रकारची वाहतूक एकाच दिशेने दोन्ही बाजूंनी सुरू असल्याने रस्ता अरुंद पडतो आहे.



तारकपूर आगारासमोर बेशिस्त वाहनचालकांमुळे वाहतूक कोंडी होत आहे.

या भागात रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. रस्त्यातील खड्ड्यांमुळे वाहने अत्यंत धीम्या गतीने पुढे जातात. अवजड वाहनांची संख्या अधिक असल्याने संपूर्ण वाहतूक ठप्प होते. विशेष म्हणजे या रस्त्यावर वाहतूक पोलीस किंवा नियमनासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत नाही.

बसस्थानकात आणि बाहेर वाहनचालक मनमानी पद्धतीने वाहने चालवतात. त्यांना कुणीही रोखत नाही. यामुळे किरकोळ अपघात तर नित्याचे झाले आहेत.

या भागात अनेक खासगी रुग्णालये असून रुग्णवाहिका वेळेवर पोहोचू शकत नाहीत. वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकांचे अनेकदा हतबल दृश्य पाहायला मिळते. नागरिकांनी वाहतूक विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नाही.

### पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष

तारकपूर परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली असून, प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. वाहतूक नियमनासाठी नियुक्त पोलीस मित्रालाही बेशिस्त वाहनचालक जुमानत नाहीत.

दै.राष्ट्र सह्याद्री

दि.१९ ऑगस्ट,२०२५

राष्ट्र सह्याद्री
E-pepar - 19 Aug 2025 - Page 5

# श्रीगोंद्यात खर्च कागदावर, खड्डे रस्त्यावर ! नागरिक त्रस्त

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा:** तालुक्यातील चांडगाव ते टाकळी कडे येथील रस्त्याची अक्षरशः वाताहत झाली आहे. पावसाळ्यात हा प्रमुख रस्ता पुन्हा एकदा खड्डेमय झाला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांची तारांबळ उडत आहे. या मार्गावर अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. वाहने रस्त्यावरच बंद पडत आहेत. काही महिन्यापूर्वी नव्याने झालेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने कामासाठी शेकडो लाखो रुपये खर्ची पडले. मात्र खर्च झाला कागदावर आणि खड्डे पडले रस्त्यावर, अशीच सध्याची स्थिती आहे. दा तालुक्यातील श्रीगोंदा आढळगाव तसेच श्रीगोंदा घोडेगाव – चांडगाव – टाकळी मार्गे राशीन ला जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मागील काही महिन्यापूर्वी हिरडगाव फाटा ते टाकळी कडेवळीत या ठिकाणी झालेल्या नवीन रस्त्यावर लाखो रुपये खर्चून नूतन रस्ता बनविण्यात आला मात्र पहिल्याच पावसात रस्ता मोठ्या प्रमाणात खड्डेमय झाला. असल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत. रस्त्यावर दररोज हजारो वाहने जा-ये करतात. खड्ड्यांमुळे या रस्त्याची वाताहत झाली आहे. पावसाळ्यामुळे हा रस्ता अनेक ठिकाणी उखडला गेला आहे. जागोजागी खड्डे या रस्त्याचे पडले आहेत, अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यापूर्वी रस्त्यावर झालेले डांबरीकरण गुणवत्तापूर्ण नसल्याचा आरोप नागरिकांसह वाहनधारकांतून होत आहे. या रस्त्यावर कायम लहान-मोठे अपघात सातत्याने घडत आहेत. जखमींना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर रात्रं-दिवस मोठी वर्दळ असते. रात्रीच्यावेळी खड्ड्यांचा अंदाज न आल्याने अपघात घडत आहेत.दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. यापूर्वीच या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली होती. नुकताच रस्ता झाला असताना त्यावर पहिल्याच पावसात रस्ता खड्ड्यात आहे. खड्ड्यावर रास्ता आहे हे समजू शकत नाही मात्र नंतर तात्पुरती मलमपट्टी करत काही ठिकाणचे खड्डे मुजविण्यात आले होते. हा रस्ता राष्ट्रीय मार्गावर लगत येत असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. मागील काही वर्षांमध्ये अवजड वाहतूक वाढली आहे. त्यामुळे सुरक्षितता धोक्यात आली आहे. अनेकवेळा वाहने रस्त्यावरच बंद पडतात. यामुळे वाहतुकीस अडथळ होऊन अपघाताचा धोका वाढतो अनेकदा ट्रॉली जोडून निघालेले ट्रॅक्टर रस्त्यावरच बंद पडतात. त्यामुळं वाहतुकीची कोंडी होते. संपूर्ण रस्त नव्याने दर्जेदार बनवावा, अशी मागण वाहनधारकांतून होत आहे. अन्यथा याप्रश्नी आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांना दिला आहे. पावसात काम टिकणार नाही – (विजय होके अभियंता श्रीगोंदा ) तालुक्यातील हिरडगाव फाटा ते टाकळी कडे या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अडचण होत असली तरीही त्याचे काम लवकरच होईल. पावसात डांबर टिकत नाही त्यामुळे पाऊस उघडला कि त्या ठेकेदाराकडून पूर्ण काम पुन्हा करून घेतल्याशिवाय बिले अदा केली जाणार नाहीत , असेही सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता विजय होके यांनी बोलताना सांगितले आहे त्या कामाबरोबरच आपल्या भागातील रस्त्यांचे काम सुरू करणार आहोत. पण, रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही, याची काळजी ग्रामस्थांनी घ्यावी.

दै.पुढारी

दि.१९ ऑगस्ट,२०२५

# जेऊरमधील अतिक्रमणांचा प्रश्न चिघळणार?

## शासनाची भूमिका अनाकलनीय; ग्रामस्थ आक्रमक

**नगर तालुका : लक्सफ**

नगर तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या जेऊर गावातील अतिक्रमणांचा प्रश्न चिघळणार असल्याचे चित्र गावांमध्ये दिसून येत आहे. अतिक्रमणांबाबत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने अतिक्रमणे हटविले नाही, तर आम्ही जागा दिसेल, त्या ठिकाणी अतिक्रमण करणार असल्याची भूमिका काही ग्रामस्थांनी घेतली आहे. त्यामुळे अतिक्रमणाचा प्रश्न चांगलाच चिघळणार असल्याने चित्र गावांमध्ये निर्माण झाले आहे.

संपूर्ण जेऊर गावाला अतिक्रमणांचा विळखा पडला आहे. अनेक वर्षांपासून अतिक्रमणांचा मुद्दा गाजत असून देखील प्रशासनाची उदासीन भूमिका व स्थानिक पदाधिकाऱ्यांची चुप्पी, यामुळे अतिक्रमणधारकांमध्ये कमालीचा आत्मविश्वास आला आहे. कोणत्याही परिस्थितीत अतिक्रमणे हटविली जाणार नाहीत, याचा ठाम विश्वास अतिक्रमणधारकांमध्ये दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण गाव अतिक्रमणांच्या विळख्यात सापडले गेलेले पहावयास मिळते. सीना नदीपात्र अतिक्रमणांत सापडले असून पूर्वी असणारे रस्ते बंद करून रस्त्यावरच व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहेत.



गावातील सर्वच शासकीय जागा स्वतःच्या मालकीच्या असल्याप्रमाणे अतिक्रमणधारक वागत आहेत. वाढत्या अतिक्रमणांचा त्रास पंचक्रोशीतील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी, तसेच महिला वर्गाला होत आहे. आतवडे बाजाराला देखील जागा शिल्लक राहिलेली नाही. प्रशासनाची भीतीच नसल्याने अतिक्रमणधारक दिवसेंदिवस आपले अतिक्रमणे वाढवत गेले. सद्यस्थितीत संपूर्ण गावाला अतिक्रमणांचा विळखा पडलेला आहे.



प्रशासनाकडून अतिक्रमणधारकांवर कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने अतिक्रमणे हटवली नाही, तर आम्ही जागा मिळेल, तेथे अतिक्रमणे करून व्यवसाय सुरू करणार असल्याची भूमिका काही ग्रामस्थांनी घेतली आहे. प्रशासनाकडून वारंवार मागणी करून देखील अतिक्रमण हटविण्यात येत नाही. यामागील गौडबंगाल काय? असा सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित केला जात आहे.

सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून भविष्यात येथे जीवित हानी होण्याचा धोका असून देखील प्रशासन याबाबत गांभीर्य दाखवत नाही.

अतिक्रमणांमुळे सीना नदीपात्र अक्षरशः कचरा डेपो बनले आहे. याच ठिकाणी पंचक्रोशीतील शेतकरी आठवडे बाजारात आपल्या भाजीपाल्याची खरेदी- विक्री करण्यासाठी येत असतात. येथील घाणीच्या साम्राज्यामुळे आरोग्याचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. तरी जेऊर गावातील सर्व अतिक्रमणे हटवून गावाचा श्वास मोकळा करावा. अन्यथा जागा मिळेल तेथे अतिक्रमण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### अतिक्रमणे झालेले 'पॉईंट'

सीना नदीपात्र, गावात जाणारा मुख्य रस्ता, महावितरण कंपनी चौक सीना नदीपात्र रस्ता, जेऊर गावठाण, बायजामाता डोंगर परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर, जुनी नगर वाट, वाघवाडी गावठाण, गावांतर्गत असलेले रस्ते, तसेच इतर शासकीय जागा.

### जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ निर्णय घ्यावा

जेऊर गावातील अतिक्रमणांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळला आहे. नाशिक विभागीय आयुक्तांनी अतिक्रमणे हटविण्याचे आदेश देऊनही अतिक्रमणे हटविण्यात आली नाहीत. जेऊर गावातील सर्व अतिक्रमणे हटवून गावाचा श्वास मोकळा करण्यासाठी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

### स्थानिक पदाधिकाऱ्यांची चुप्पी ?

अतिक्रमणांबाबत स्थानिक राजकीय पदाधिकारी चुप्पी साधून आहेत. त्यांची भूमिका गुलदस्त्यातच आहे. ग्रामपंचायत सदस्यांची भूमिका देखील स्पष्टपणे समजत नाही. केवळ मतांच्या राजकारणासाठी स्थानिक पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य अतिक्रमणांबाबत ठोस भूमिका घेताना दिसून येत नाहीत. काहीजण दोन्ही डगरीवर हात ठेवून आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असा संतप्त सवाल याबाबत वाऱ्यांवरील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# जिल्हा धुळे

दै.लोकमत दि. १९ ऑगस्ट,२०२५

लोकमत

मस्ट READ

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मेथीचे शेतकरी मृत्यूच्या दारात ?

## शेतकऱ्यांकडून प्रशासनाला देण्यात आले निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** : शिंदखेडा तालुक्यातील मेथी गावात एका खाणीला दिलेली परवानगी रद्द करावी या मागणीसाठी शेतकरी १३ दिवसांपासून उपोषण करत आहेत. परंतू प्रशासनाने जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केल्याने मेथी येथील उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत आहे. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन उद्धवसेनेतर्फे सोमवारी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना देण्यात आले.

या खाणीसाठी परवानगी देताना बनावट कागदपत्रे आणि चुकीचे पंचनामे सादर करण्यात आले. पंचनाम्यामध्ये धार्मिक स्थळे, शाळा आणि राज्यमार्गांपासून खाणीचे चुकीचे अंतर दाखवण्यात आले आहे. तसेच, भूजल सर्वेक्षण अहवालही नियमांनुसार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या सर्व बाबींमुळे शासनाची दिशाभूल करून ही परवानगी मिळवण्यात आली आहे.

सदर सर्व भारतीय संवैधानिक नियमांच्या विरोधात असल्याने, या प्रकरणाची लेखापरीक्षण अंतर्गत चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. जोपर्यंत ही खदान रद्द केली जात नाही आणि दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी घेतला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देऊन उध्दवसेनचे उपजिल्हा प्रमुख शानाभाऊ सोनवणे, संदिप मिस्तरी, जगदीश गोसावी, हरी सोनवणे, संदीप माळी, इश्वर आगवे आदींनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निर्दशने केली.



जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करताना शानाभाऊ सोनवणे, संदीप मिस्तरी, जगदीश गोसावी, हरी सोनवणे, संदीप माळी, ईश्वर आगवे.

# धुळे-साक्री महामार्ग विकासाचा नाही, तर बनतोय मृत्यूचा सापळा?

## विस्तारीकरणातही रस्त्याची दुरवस्थाच; प्रवाशांचा जीव धोक्यात, प्राधिकरणाकडून होते टाळाटाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** धुळे ते साक्रीदरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग ५३ (जुना एनएच ६) हा गेल्या दहा वर्षांपासून प्रशासकीय अनास्थेमुळे मृत्यूचा सापळा बनला आहे. एकेकाळी विकासाचे प्रतीक मानला जाणारा हा मार्ग आज प्रवाशांसाठी जीवघेणा ठरत आहे. रस्त्यावर पडलेले जीवघेणे खड्डे, दुभाजकांवरील वाढलेली काटेरी झुडपे, आणि कुसुंबा गावाजवळील गेल्या दीड वर्षांपासून बंद असलेला पूल या सर्व समस्यांमुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे.

या मार्गाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडले आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे अत्यंत धोकादायक ठरतात. तात्पुरती डागडुजी करूनही १५ दिवसांत पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' होते. कुसुंबा गावाजवळील बंद पुलामुळे वाहतूक एकाच मार्गाने सुरू आहे, ज्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. नुकताच याच ठिकाणी एक भीषण अपघात झाला होता, ज्यामुळे या मार्गाची भयावह स्थिती पुन्हा एकदा समोर आली. शेवाळी फाटा येथील चौपदरी रस्त्यावर उड्डाणपुलाची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, पण त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या ठिकाणी वारंवार अपघात होत असतानाही प्रशासनाला जाग आलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी या गंभीर परिस्थितीवर बोलण्यास तयार नाहीत. त्यांचे दावे पूर्णपणे निराधार असून, त्यांच्या ढिसाळ कारभाराचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे. हा महामार्ग आता प्रशासकीय अनास्थेचा उत्तम नमुना बनला असून, प्रवाशांना 'प्रवास की अपघात?' असा प्रश्न पडला आहे.



दहीवेल जवळ नव्याने बनवलेल्या पुलावर तयार झालेले जीवघेणे खड्डे.

### महामार्ग बनतोय मृत्यूचा सापळा ?

**दहा वर्षांपासून रखडलेले काम आणि प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेता, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अन्यथा, या मार्गावरील प्रवास 'मृत्यूचा सापळा' बनल्याशिवाय राहणार नाही.**

## कुसुंबा येथील बंद पूल अपघातांचे केंद्र

१ या मार्गावरील सर्वांत मोठी समस्या म्हणजे कुसुंबा गावाजवळील पूल. गेल्या दीड वर्षांपासून हा पूल वाहतुकीसाठी बंद आहे. यामुळे वाहतूक एकाच मार्गाने सुरू आहे, ज्यामुळे अनेकवेळा अपघात झाले आहेत. नुकताच याच ठिकाणी आयशर ट्रक आणि स्विफ्ट गाडीचा भीषण अपघात झाला होता. अधिकारी हा रस्ता लवकरच सुरू करण्याचे दावे करत असले, तरी प्रत्यक्ष कामाचा पत्ता नाही. दीड वर्षांपासून ज्या कामासाठी हा पूल बंद केला होता, त्याचे काम गेल्या आठवड्यात सुरु झाले आहे. मात्र, हे ठिकाण अपघाताचे केंद्र बनले आहे.

## दहा वर्षांपासून रखडलेले काम, झालेत जीवघेणे खड्डे

या रस्त्याचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेले आहे. त्यामुळे आनंदखेडे, कुसुंबा, नेर, अक्कलपाडा, शेवाळी, साक्री आणि दहिवेल गावांजवळ मोठे खड्डे पडले आहेत.

**रात्रीच्या वेळी हे खड्डे अधिकच धोकादायक ठरतात. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी अधिकच धोकादायक आहेत. रस्त्याची तात्पुरती डागडुजी केली जाते, पण १५ दिवसांत पुन्हा खड्डे पडतात. काही ठिकाणी रस्ता खरडून ठेवल्यामुळे दुचाकीस्वारांचे अपघातही होत आहेत.**

## शेवाळीच्या उड्डाणपुलाची मागणी अनुत्तरित

२ शेवाळी फाटा येथे चार रस्ते एकत्र येत असल्याने ही जागा अत्यंत धोकादायक बनली आहे. येथे उड्डाणपुलाची मागणी अनेक वर्षांपासून होत असूनही प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहे. वर्दळीच्या या ठिकाणी अनेक अपघात होत असतानाही सुरक्षिततेचे उपाय केले जात नाहीत. या गंभीर परिस्थितीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात. फोन केल्यावर ते जुजबी उत्तर देऊन फोन ठेवतात आणि नंतर कोणताही प्रतिसाद देत नाहीत. यामुळे या समस्येकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# बालिकेवर अत्याचार, आदिवासी बांधवांचा मूकमोर्चा

## मोर्चात आदिवासी बांधवांसोबत महिलांचाही सहभाग, सर्वपक्षीय मूकमोर्चा शांततेत; पोलिसांना दिले निवेदन, जलद कोर्टात खटला चालवण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : तालुक्यातील एका गावात आठ वर्षीय बालिकेवर गावातील एका इसमाने बलात्कार केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी नराधमास अटक केली आहे. मात्र, त्यास फाशी द्यावी, या मागणीसाठी आदिवासी समाजासह सर्व पक्षीय मूक मोर्चा काढून यासंदर्भात प्रांताधिकारी डॉ. शरद मंडलिक यांना निवेदन देण्यात आले. मूकमोर्चा शांततेत पार पडला.

शिरपूर तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या आठ वर्षीय चिमुरडी ही शेजारच्या घरात टीव्ही पाहण्यासाठी गेली असता. तेथून तिथेच वास्तव्यास असलेल्या सुनील भिरोभा काळे (वय २८) या नराधमाने फूस लावून त्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर अमानूष अत्याचार केले. घटनेनंतर सदर बालिका जखमी अवस्थेत नातेवाईकांना सापडली.

याप्रकरणी बालिकेच्या नातेवाईकाने पोलिसात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली. या घटनेचा निषेध करण्यासाठी तसेच आरोपीवर गुन्हा दाखल करून सदर खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून त्याला फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी दि. १८ रोजी पोपडा जीनपासून मूकमोर्चा काढण्यात आला. मूकमोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून फिरून प्रांताधिकारी कार्यालयावर पोहचला.

**मोर्च्यात यांचा होता सहभाग**

या मोर्चात आमदार काशिराम पावरा, उद्योगपती भूपेशभाई पटेल, जि. प.चे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्षा धरती देवरे, आदिवासी संघटनेचे पदाधिकारी, भाजपा, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आरएसएस संघटना, सत्यशोधक संघटना, सर्वपक्षीय पदाधिकारी, आदिवासी समाजातील महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रांताधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर सर्व आदिवासी बांधव व नेते मंडळी तेथून निघून गेली. मूकमोर्चा शांततेत पार पडला.



शिरपूर शहरातून काढण्यात आलेल्या आदिवासी बांधवांच्या मूकमोर्चा सहभागी आंदोलनकांनी हातात फलक घेत निषेध नोंदविला होतो.

**२०००** पेक्षा अधिक आदिवासी बांधव तालुक्यातून एकत्र येत सोमवारी मूकमोर्चा काढला होता. त्यामुळे शिरपूर शहरात दिवसभर चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होतो.

**शिरपूर शहरात चोख पोलिस बंदोबस्त....**

# लाल रंगाचा शर्ट घातलेल्या तरुणाने केला पोलिस निरीक्षकावर हल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : आदिवासी बांधवांचा मूकमोर्चा संपल्यानंतर बेकायदेशीर रित्या केलेला रस्तारोको मागे घेण्यासंदर्भात पोलिसांनी वारंवार समजावूनही जमाव आक्रमक झाला. या दरम्यान लाल रंगाचा शर्ट घातलेल्या तरुणाने अचानक पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्यावर धारदार शस्त्राने पाठीवर वार करून गंभीर दुखापत केली. संतप्त जमावाने इतर पोलिसांनाही धक्काबुक्की केली. तत्काळ पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत कारवाई केल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. दरम्यान, जखमी पोलीस निरीक्षक हिरे यांना पाठीवर जखम झाली आहे. त्यांच्यावर उपचार केल्यानंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

घटना घडल्यानंतर पोलिसांनी त्वरित त्याठिकाणी जमलेला जमाव पांगविला आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. रात्री शहरात आणि सांगवी गावात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

तसेच पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सायंकाळी शिरपूर येथे पोहचल्यावर घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर ते सांगवी येथेही जाऊन आले. घटनेचे गांभीर्य ओळखून नाशिक विभागाचे आयजी दत्तात्रेय कराळे यांनी देखील घटनेची माहिती घेतली आहे. रात्री शहरासह तालुक्यात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

### लाल रंगाचा शर्ट घातलेल्या तरुणाने केला हल्ला

शहरातील गुजराथी कॉम्प्लेक्ससमोर जमलेल्या बेकायदेशीर जमावाने सांगवीचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या सशस्त्र हल्ला केल्याप्रकरणी सायंकाळी शिरपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेनंतर रात्री जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे हे शिरपूरात दाखल झाले होते. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सुचना करीत होते. रात्री उशीरापर्यंत पोलीस अधीक्षक शिरपुरात तळ ठोकून बसले होते.

**जमावातील अनिल सिताराम पावरा (२०), सागर जहागीरदार पावरा (२०), दिनेश रमेश पावरा (१९), सुनिल ओटन सोनवणे (२३), राहुल संजय भिल (१९), कुणाल सुभाष भिल (१९) व जगन सतीष भिल (१९) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यापैकी जगन भिल या आरोपीवर पोलीस निरीक्षक हिरे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे शिरपूर शहरात तणावपूर्ण शांतता पसरली आहे.**

जखमी पोलीस निरीक्षक हिरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपीविरोधात विरोधात १०९,१२१,१२१ (१),१२६ (२), १२७ (१८९(२), १८९ (४),१८९ (३), १९१ (३), ११०(३), ११०, ११५ (२) कलमांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींवर शासकीय कामात अडथळा, जमावबंदीचे उल्लंघन, खुनाचा प्रयत्न आदी गंभीर कलमाखाली गुन्हे दाखल केला आहे.

लोकमत

# शुध्द पाण्यासाठी कापडणे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कापडणे** : येथील पाणी संघर्ष समितीने शुद्ध पाणी पुरवठा व्हावा यासाठी शनिवारपासून कापडणे येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ शुध्द पाणी संघर्ष समितीच्यावतीने बेमुदत उपोषण सुरू आहे. सोमवारी चौथ्या दिवशी कापडणेकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत कापडणे बंदला हाक दिली.

१५ जुलै २०२५ रोजी ग्रामपंचायत व प्रशासनाला कापडणे गावाला शुध्द पाणी मिळावे, यासाठी निवेदन दिले होते. यावेळी प्रश्न न सुटल्याने १५ ऑगस्ट रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

परंतू प्रशासनाने दखल न घेतल्याने संघर्ष समितीच्यावतीने उपोषण सुरू आहे. या आंदोलनात आतापर्यंत विविध राजकीय पक्षासह सामाजिक संघटनाकडून पाठिंबा दर्शविण्यात आला आहे. जो पर्यत प्रश्न मार्गी लागत नाही. तो पर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा पावित्रा घेतला आहे.

**४**
दिवसापासून कापडण्यात आंदोलन सुरू आहे.



कापडणे ग्रामस्थांना शुध्द पाणीपुरवठा व्हावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत सोमवारी कापडणे बंदची हाक देण्यात आल्याने गावात दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

## अशी आहे मागणी...

महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरण मिशनचे काम योग्य व सुरळीत व्हावे, सदर कामाची चौकशी होऊन संबंधित अधिकारी व ठेकेदारावर गुन्हे दाखल व्हावेत अशी मागणी आहे.

## कापडण्यात दिवसभर होती शुकशुकाट...

कापडणे बंद प्रतिसाद मिळाल्याने मुख्य बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शांततेत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात महिलांसह युवक व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. दुकाने, व्यवसाय आस्थापने बंद ठेवून व्यापाऱ्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला. शुद्ध पाण्याचा प्रश्न सोडविल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यात नसल्याचे आंदोलकांनी सांगितले.

सकाळ

# लाडक्या बहिणी तीन महिने वंचित

## सन्मान निधीची प्रतीक्षा; शिवसेनेचा अधिकाऱ्यांना घेराव



**धुळे** : लाडकी बहीण योजनेबाबत अधिकाऱ्यास जाब विचारताना शिवसेनेचे आंदोलक.

### अंगणवाडी सेविकांना तपासणीचा आदेश

■ शिवसेनेने आंदोलन केल्यानंतर बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक चाटे (नागरी प्रकल्प) यांनी सर्व अंगणवाडी सेविकांना तत्काळ कागदपत्रे तपासून सादर करावीत, असे आदेशित केले. यापूर्वी अंगणवाडी सेविकांनी याबाबत कामकाज केल्याचे दिसून येत नाही, अशी नाराजीही चाटे यांनी पत्राव्दारे व्यक्त केली आहे. तसेच आंदोलनाची दखल घेत जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांनीही या विभागाच्या सचिवांशी पत्रव्यवहार सुरू केल्याची माहिती श्री. मोरे, श्री. वाल्हे यांनी दिली.

■ **सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. १८ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत जिल्ह्यात मे, जून, जुलै या तीन महिन्यांचा सन्मान निधी मिळालेला नाही. त्यामुळे शेकडो लाभार्थी महिला लाभापासून वंचित आहेत. या प्रकरणी चौकशीअंती सन्मान निधी प्रदान करावा, अशी मागणी शिवसेनेने (शिंदे गट) जिल्हा महिला बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना घेराव घालत सोमवारी (ता. १८) केली.

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेत्यांनी ही योजना सुरू केली. यात लाडक्या बहिणींना दरमहा प्रत्येकी पंधराशे रूपये सन्मान निधी दिला जातो. त्यामुळे महायुतीवर विश्वास ठेवत लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणुकीवेळी दोनशेहून अधिक आमदार निवडून दिले. परंतु, जबाबदार अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे मे ते जुलैपर्यंतचा सन्मान निधी लाडक्या बहिणींना मिळालेला नाही. जिल्ह्यातील शेकडो लाभार्थी या लाभापासून वंचित आहेत.

या पार्श्वभूमीवर महिला व बालविकास विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी फेरतपासणीतून पात्र महिलांना प्रतिक्षेतील तीन महिन्यांचा सन्मान निधी द्यावा. अन्यथा, शिवसेना तीव्र आंदोलन करेल, असा इशारा जिल्हाप्रमुख मनोज मोरे, महानगरप्रमुख संजय वाल्हे, मनोज कोळेकर, प्रवीण वाडलेकर, बबलू शेख, अनिल जगताप, भटू गवळी, आशपाक मण्यार, शेखर बडगुजर, अस्लम खाटीक, नितीन पाटील, दीपक बडगुजर, रवी शिंदे, राजू चौधरी, नितीन म्हसदे, राजू लोंढे आदींनी दिला.

Dhule, Dhule-Today
19/08/2025 Page No. 1



धुळे : पांझरा नदीतील गॅबियन वॉलप्रकरणी संदीप सोनवणे यांना निवेदन देताना शिवसेना (उबाठा) पक्षाचे शिष्टमंडळ.

सकाळ

# शिवसेनेचा सिंचन अधिकाऱ्यास घेराव

## 'उबाठा'कडून पांझरा नदीतील गॅबियन वॉल तोडण्याची मागणी

■ सकाळ वृत्तसेवा

धुळे, ता. १८ : शहरातील साक्री रोडवरील महिंदळे शिवारात पांझरा नदीपात्रात गॅबियन पद्धतीने उभारल्या जाणाऱ्या भिंतीच्या कामावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाला आहे. या कामाबाबत परवानगी कोणाकडून देण्यात आली, पूररेषेत बांधकाम कसे सुरू झाले, याबाबत सिंचन विभागाचे अधीक्षक अभियंता संदीप सोनवणे यांना शिवसैनिकांनी सोमवारी (ता. १८) प्रश्नांची सरबत्ती करत तासभर घेराव घातला.

सुमारे एक किमी लांब, पाच मीटर उंच व दोन मीटर रुंद भिंतीचे काम नदीपात्रात सुरू आहे. हे बांधकाम न्यायालयीन आदेश व राज्य शासनाच्या परिपत्रकाच्या विरोधात असल्याचा आरोप शिवसेना उबाठाने केला. या प्रकरणी पाटबंधारे, महसूल, नगररचना विभाग व महापालिका सर्वच जबाबदार असल्याचा आरोप घेरावकर्त्यांनी केला. भिंतीबाबत रॉयल्टी बुडवून शासनाचे नुकसान केल्याचेही त्यांनी सांगितले. आठ दिवसांत पूररेषेतील बेकायदा बांधकामावर कारवाई न झाल्यास पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांना कार्यालयात बसू दिले जाणार नाही, असा इशारा शिवसेना उबाठाच्या घेरावकर्त्यांनी दिला.

### बांधकाम पाडले जाईल

अधीक्षक अभियंता सोनवणे यांनी वरिष्ठांशी चर्चा करून पूररेषेत असलेले बांधकाम पाडले जाईल. शासनाच्या वेबसाइटवर अंतिम झालेल्या पूररेषेला बाधा आणणारे काम तातडीने थांबवले जाईल, असे आश्वासन दिले. जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी, महानगरप्रमुख धीरज पाटील, भरत मोरे, सुनील पाटील, प्रशांत ठाकूर, अण्णा फुलपगारे, कपिल लिंगायत, संदीप चौधरी, महिला आघाडीच्या ज्योती चौधरी, युवा सेनेचे मनोज जाधव, पंकज भारस्कर, अजय चौधरी, सागर निकम, संदीप चौधरी, अनिल शिरसाट, अमोल ठाकूर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

Dhule Dhule-Today
19/08/2025 Page No. 1

सकाळ

# विराट मोर्चातील घोषणांनी शिरपूर दणाणले

## अत्याचार करणाऱ्याला फाशीची मागणी; पोलिस निरीक्षकावर चाकूने वार

■ सकाळ वृत्तसेवा



**शिरपूर :** बालिकेवरील अत्याच्याराच्या निषेधार्थ सोमवारी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी महिला.

शिरपूर, ता. १८ : दहिवद (ता. शिरपूर) येथील आठवर्षीय बालिकेवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेचा निषेध करत सोमवारी (ता. १८) शिरपूर शहरात आदिवासी संघटना, विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी विराट निषेध मोर्चा काढण्यात आला. 'फाशी द्या, फाशी द्या, नराधमाला फाशी द्या' या घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले. प्रांताधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ठिय्या धरल्यानंतर संतप्त नागरिकांनी प्रशासनाला निवेदन सादर केले.

मोर्चाची सुरुवात सकाळी साडेदहाच्या सुमारास चोपडा जिन परिसरातून झाली. मुख्य रस्त्याने मार्गक्रमण करत मोर्चा न्यायालय परिसरातून पोलिस उपअधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात पोहोचला. तेथे संतप्त नागरिकांनी ठिय्या देत आक्रोश व्यक्त केला. यावेळी आमदार काशिराम पावरा, भाजपच्या महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा जयश्री अहिरराव, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपच्या जिल्हाध्यक्षा धरती देवरे, जि.प. माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, माजी नगराध्यक्षा संगीता देवरे, पंचायत समितीच्या माजी उपसभापती कल्पना कोळी, ॲड. शालिनी सोनवणे, बाजार समितीचे सभापती के. डी. पाटील, माजी नगरसेवक रोहित रंधे, हेमंत पाटील, मनोहर पाटील आदींसह अनेक पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्चेकऱ्यांनी प्रांताधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी व पोलिस उपअधीक्षक सुनील गोसावी यांना निवेदन दिले. तसेच काँग्रेस, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह विविध सामाजिक संघटनांतर्फेही स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणातील संशयिताला अटक केल्याचे गोसावी यांनी स्पष्ट केले. तो सध्या पोलिस कोठडीत असून, फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

### गुजराती कॉम्प्लेक्स परिसरात तरुणांचा धुडगूस

मोर्चा आटोपल्यानंतर काही युवकांनी शिरपूर शहरातील गुजराती कॉम्प्लेक्स परिसरात रस्ता अडवून धुडगूस घातला. त्यांना पांगविण्यासाठी सांगवी पोलिसांचे पथक पोहोचले असता झालेल्या गोंधळात एका संशयिताने पोलिस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या पाठीवर चाकूने वार केला. यात ते जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर शिरपूर शहर व परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### दहिवद गावात कडकडीत 'बंद'

बालिका अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ दहिवद गावात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. ग्रामस्थांनी दिवसभर सर्व व्यवहार बंद ठेवले व मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होत संशयिताला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

**जिल्हा जळगाव**

लोकमत

# शेतकऱ्यांच्या 'तोंडचा घास' हिरावला!

## पावसाने शेती व घरांची वाताहत : वडली, म्हसावद भागात ३०० हेक्टरवरील मका उद्ध्वस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : तालुक्यात झालेल्या वादळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. वडली, म्हसावद, बोरनार, जवखेडा, पाथरी, वराड, लोणवाडी, डोमगाव यासारख्या अनेक गावांमध्ये निसर्गाच्या या रौद्ररूपाने शेती आणि जनजीवनाचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोरच त्यांच्या मेहनतीचे पीक उद्ध्वस्त झाले असून, त्यांच्या 'तोंडाचा घास' हिरावला गेला आहे. जवळपास ३०० हेक्टरवरील मका पूर्णपणे आडवा झाला आहे. कणसे भरलेली असतानाच वादळाने हे पीक भुईसपाट केल्यामुळे शंभर टक्के नुकसान झाले आहे. पिकांचे होत्याचे नव्हते झाले.

या वादळाचा सर्वात मोठा फटका शेतीला बसला आहे. कापसाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन निम्म्यावर आले आहे. वडली गावातील जितेंद्र पाटील, अनिल पाटील, संजय पाटील, रवींद्र उंबरे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. म्हसावदजवळील नागदुली, दहीगाव संत, वरखेडी आणि खडके येथेही मका आणि इतर पिकांची अशीच दुरवस्था झाली आहे. केवळ शेतीच नाही, तर या वादळाने गावागावांतील घरांचीही मोठी पडझड केली आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले, तर युवराज संभाजी पाटील यांच्यासह काही लोकांच्या घरांच्या भिंती कोसळल्या. काहींचे पत्रे उडून गेले, ज्यामुळे त्यांना उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे.



नुकसानीची पाहणी करताना शीतल राजपूत, माणिकराव गोपचे, चैताली पाटील आदी.

### सरकारी यंत्रणाही गारद

या वादळात गावातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी, आणि बीएसएनएल केंद्रात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. अंगणवाडीतील महत्त्वाची कागदपत्रे, बेबी किट व धान्याचे नुकसान झाले असून, अंगणवाडी सेविका माधुरी चव्हाण यांनी नुकसानीचा अहवाल सादर केला आहे.

### अधिकारी पोहोचले बांधावर

या गंभीर स्थितीनंतर, तहसीलदार शीतल राजपूत, तलाठी माणिकराव गोपचे आणि कृषी विभागाच्या चैताली पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. लगेच पंचनामे सुरू केले. तसेच, माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर आणि नरेंद्र सोनवणे यांनीही शेतकऱ्यांची विचारपूस करून त्यांना तत्काळ मदतीसाठी कृषी अधीक्षकांशी चर्चा केली आहे.

दै.देशोन्नती

दि.१९ ऑगस्ट,२०२५

देशोन्नती

# अजंदे गावाचा संपर्क तुटला, केळी सह अन्य पिकांचे मोठे नुकसान



प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, पूरस्थितीवर बारीक लक्ष ठेवले जात आहे.

Jalgaon Edition
Aug 19, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

लोकशाही
epaper.lokshahilive.com
JALGAON - 19 Aug 2025 - Page 1

# जिल्ह्यात पावसाचा जोर; 'बेडूक'उड्या कायम !

## जिल्हा प्रशासन सतर्क : हतनूर धरणातून ५६ हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जिल्ह्यात दि. १६ व १७ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पाऊस व विजेच्या तडाख्यामुळे जळगाव जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये शेतपिकांचे, घरांचे, जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले आहे. प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच महसूल व कृषी खात्याचे अधिकारी यांनी नुकसानीची पाहणी करून पंचनामे सुरू केले आहेत. बाधित कुटुंबांना तात्पुरते निवारा, अन्न, पिण्याचे पाणी व बिछायतची व्यवस्था करण्यात आली आहे. अमळनेर तालुक्यात पातोंडा व नांद्री गावांतील पारधी वस्त्यांना पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांना शाळा व स्थानिक भवनात हलविण्यात आले. भडगाव तालुक्यात कनाशी व बोरनार येथे कपाशीचे मोठे नुकसान झाले आहे. कोठली येथे ऊस पिकाचे नुकसान झाले आहे. रावेर तालुक्यात नागझिरी नाल्याला पूर आल्याने बक्षीपुर येथे घराची भिंत कोसळून सात-आठ शेळ्या दगावल्या.



तसेच जळगाव तालुक्यात वडली जवखेडे व बोरनार-लमांजन शिवारात पिकांचे नुकसान झाले असून धरणगाव तालुक्यात कल्याणे खुर्द येथे नुकसान पाहणी करण्यात आली. पारोळा व एरंडोल तालुका विविध शिवारात पिकांची हानी झाली आहे. बोदवड तालुक्यात घरावर झाड कोसळून नुकसान; घरातील व्यक्तींना सौम्य दुखापत झाली. पाचोरा तालुक्यात लासगाव, सामनेर येथे पीकनुकसानीची पाहणी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने कळविले आहे की, आपत्तीग्रस्तांना शासनाकडून मदत व नुकसानभरपाई लवकरात लवकर देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. शासन ठामपणे आपत्तीग्रस्तांच्या पाठीशी आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे होतील. मदत वेळेत व पारदर्शकपणे पोहोचविली जाईल. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. रावेर तालुक्यातील बक्षिपूर गावातील जूनी संरक्षण भिंत नागझिरी नाल्यातील पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे कोसळली. या घटनेत झालेल्या नुकसानीची पाहणी आज महसूल विभागाच्या अधिकारीवर्गाने केली. या पाहणीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी सौ. अर्चना मोरे, प्रभारी उपविभागीय अधिकारी फैजपूर निवृत्ती गायकवाड, रावेरचे तहसीलदार बंडू कापसे तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रावळ उपस्थित होते. नुकसानग्रस्त भागाची माहिती घेतल्यानंतर पुढील आवश्यक ती उपाययोजना व मदत तातडीने करण्याबाबत अधिकाऱ्यांनी स्थानिक प्रशासनाला सूचना दिल्या.

### गावांना सुरक्षिततेसाठी आवाहन

हतनूर धरणाच्या (पूर्णा व तापी नदीच्या) पाणलोट क्षेत्रात झालेला पाऊस व वाढलेला येवा तसेच धरण पातळीत झालेली वाढ लक्षात घेऊन आज दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता धरणातून १५९८.०० क्युमेक्स (५६४३३.३७ क्युसेक्स) इतका प्रवाह नदीपात्रात सोडण्यात आला आहे. यासाठी धरणाची ०४ गेट पूर्णपणे व १६ गेट प्रत्येकी १.०० मीटर इतकी उघडण्यात आली आहेत. तापी व पूर्णा नदीकाठी राहणाऱ्या गावातील नागरिकांनी नदीकाठावर न जाणे, पोहणे, मासेमारी करणे तसेच गुरे-ढोरे बांधणे टाळावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वांनी दक्षता बाळगावी, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हा नंदुरबार

दै.पुण्यनगरी

दि.१९ ऑगस्ट,२०२५

पुण्य नगरी

# ...अखेर बिबट्या अडकला पिंजऱ्यात

## विसरवाडी परिसरात नागरिकांना दिलासा

**विसरवाडी :** नवापूर तालुक्यातील विसरवाडी परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वन विभागाच्या पथकाला यश आले आहे. दरम्यान, बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

नवापूर तालुक्यातील विसरवाडी परिसरातील बालआमराई, बालहाट, कन्हाळा, नानगीपाडा या भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्त वावर सुरू होता. शेतांमध्ये व रस्त्यावर रात्रीच्या वेळी बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर चिंचपाडा वनपरिक्षेत्र वनविभागाच्या प्रयत्नांना यश आले असून लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. या भागात सतत बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी रात्री शेतात



जाण्यास घाबरत होते. विशेषतः शेतीपंपांना वीजपुरवठा प्रामुख्याने रात्री होत असल्याने शेतकऱ्यांना पाणी सोडण्यासाठी जीव मुठीत घेऊन शेतात जावे लागत होते. तसेच परिसरातील कुत्रे, कोंबड्या, बकऱ्या, वासरे, पाळीव जनावरे फस्त केली. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला होता. नागरिकांच्या तक्रारीनंतर वनविभागाने परिसरात पिंजरे लावले होते. अखेर यातील एका पिंजऱ्यात तीन ते चार वर्षांचा बिबट्याला पकडण्यात यश आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. चिंचपाडा वनपरिक्षेत्र वनक्षेत्रपाल नितीन वाघ, वनपाल सुजितकुमार बेडसे, वनपाल शितल तोरवणे, युवराज भाबड, वनरक्षक अनिल वळवी, मिताली गावित, शिवराम गावित, इलान गावित, दिनानाथ कोकणी, रामदास पावरा, अनिल पावरा, अमोल गावित, अमोल गावित, वाहन चालक बाळा गावित, चामाऱ्या गावित, वनमजूर जयु गावित, पांडु गावित, फिलीप गावित, जमसु गावित आदी सहभागी झाले होते. स्थानिकांनी वनविभागाच्या कार्याचे कौतुक करतानाच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. तसेच शेतीसाठी वीजपुरवठा रात्रीऐवजी दिवसा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

Nandurbar Edition
Aug 19, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# जिल्ह्यात तीन दिवस 'येलो अलर्ट'; मध्यम पावसाची शक्यता

## दोन दिवसानंतर पावसाची विश्रांती ; मुसळधारची प्रतीक्षा कायम

**नंदुरबार :** मुंबई प्रादेशिक हवामान विभागाने जिल्ह्यात १८ ते २० ऑगस्ट असे तीन दिवस येलो अलर्ट जारी केला आहे. सोमवारी हलक्या पावसासह सुमारे ताशी ३० किमी वेगाने वारे वाहण्याची तर मंगळवार व बुधवारी मध्यम पावसाचा अंदाज वर्तविला असताना काल सोमवारी दिवसभर पावसाने जिल्ह्यात विश्रांती घेतली. सकाळपासून ढगाळ वातावरण होते तर सायंकाळी ४ वाजेनंतर सूर्यदर्शन झाले. शनिवारी १० मिमी व रविवारी १६ मिमी पाऊस झाला तर गेल्या २४ तासात फक्त २.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मागील दोन दिवसातील दमट हवामानानंतर सोमवारी पावसाऐवजी शेतकऱ्यांना सुर्यदर्शन झाले. एकीकडे हवामान विभागाने पावसाचा अंदाज व्यक्त केला असताना दुसरीकडे पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने जारी केलेल्या अंदाजानुसार सोमवार ते बुधवारी जिल्ह्यात येलो अलर्ट आहे. सोमवारी हलका पाऊस व ताशी ३० किमी वेगाने



वारा वाहण्याचा अंदाज होता.मात्र, काल पावसाने विश्रांती घेतली.तर आज मंगळवार व बुधवार या दोन दिवसात जिल्ह्यात मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. मात्र, सध्या वातावरणात झालेल्या बदलामुळे पाऊस होणार का? याबाबत शेतकऱ्यांमधून शंका उपस्थित करण्यात येत आहे.खरीप पिकांना सध्या जीवदान मिळाले असले तरी जोरदार पावसाची नितांत गरज आहे. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी डोळे लावून बसला आहे.

या हंगामात १ जून ते कालअखेर ६०७.९ मिमी सरासरी पैकी २८५.४ मिमी पाऊस झाला आहे. हा पाऊस फक्त ४६.९ टक्के आहे. दरम्यानच्या, काळात ५७५.५ मिमी अर्थात ९४.७ टक्के पाऊस होता. मागील वर्षीच्या तुलनेत तब्बल ५३ टक्के पाऊस कमी आहे.यामुळे आता समाधानकारक पाऊस न झाल्यास शेतकऱ्यांना पुन्हा अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

### जिल्ह्यात २ मिमी पाऊस...

नजीकच्या धुळे व जळगाव जिल्ह्यात समाधानकारक पाऊस होत असताना नंदुरबारमध्ये रविवारी सकाळपासून पुन्हा विश्रांती घेतली. २४ तासात २.६ मिमी पाऊस नोंद झाली. यात अक्कलकुवा ९.९ मिमी, धडगाव ६ मिमी नवापूर नंदुरबार ०.६ मिमी, तळोदा ०.७ मिमी, शहादा ०.१ मिमी व तळोदा ०.० मिमी पाऊस झाला आहे.

Nandurbar Edition
Aug 19, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# तोरखेडा शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात गाय, वासरु जखमी

## परिसरात भिती; तत्काळ पिंजरा लावून बंदोबस्ताची मागणी

**वडाळी :** ब्रम्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गालगत तोरखेडा हद्दीतील पद्मांराजे नगर पुढे वीट भट्टयालगत दिलीप गरुड यांच्या शेतात बिबट्याने रखवालदाराच्या झोपडीशेजारी बांधलेल्या गायीसह वासरावर हल्ला केला. यादरम्यान, रखवालदाराला जाग आल्याने बिबट्याने सावध होत धूम ठोकली. वीट भट्टीशेजारी राहणाऱ्या नागरिकांसह शेत मजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने त्या हल्लेखोर बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करुन त्याला जेरबंद करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

शहादा तालुक्यातील तोरखेडा येथील राष्ट्रीय महामार्गावर ब्रम्हानपूर-अंकलेश्वर महामार्गालगत असलेल्या पदमांराजे नगरामध्ये बहुतांशी कुटुंबिय वास्तव्याला आहेत. जवळच वीटभट्टया आहेत. यालगतच दिलीप गरुड यांच्या मालकीच्या शेतात रखवालदार रमेश पाडवी याच्या झोपडीशेजारी गाय, वासरु बांधले. रात्री एक ते दीड वाजेच्या सुमारास गाय, वासरुवर बिबट्याने हल्ला चढवला. जनावरांच्या झटापटीचा आवाज येत असल्याने रखवालदारास याची चाहूल लागली. त्याने आरडाओरड केल्याने बिबट्याने जंगलाकडे धूम ठोकली.यात गाय, वासरुचा जीव वाचला असला तरी गंभीर जखमी झाले आहेत. जखमी जनावरांवर खाजगी पशुवैद्यांनी तत्काळ उपचार केले. बिबट्याने गाय वासरूवर केलेल्या हल्ल्यामुळे शेजारीच मानवी वस्ती असल्याने येथील रहिवाशांमध्ये शेतीशिवारात राहणाऱ्या रखवालदार तसेच मजुरांमध्ये भीती निर्माण झाली आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी अनेक वेळा वनविभागाकडे मागणी करुनही वनविभागाने दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तात्काळ पिंजरा लावून त्या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी जोर धरत आहे.



तोरखेडासह फेस बामखेडा शेती शिवारात अनेक हिंस्त्र प्राण्यांचा वावर आहे. शेतीकाम करणाऱ्या मजूर, शेतमालक तसेच रखवालदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून तोरखेडा शिवारात बिबट्यास जेरबंद करण्यासाठी तात्काळ पिंजरे लावून बंदोबस्त करावा.

-जयसिंग गरुड (माजी उपसरपंच, तोरखेडा)

Nandurbar Edition
Aug 19, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# सातपुड्यात मुसळधारमुळे नद्यांना पूर

## यंदा अवघा ३७ टक्के पावसाने चिंता वाढली; समाधानकारक पावसाची प्रतीक्षाच

**शहादा** : गेल्या दीड महिन्यांपासून दडी मारलेल्या पावसाने शहादा शहरासह तालुक्यात काही ठिकाणी तुरळक तर काही ठिकाणी हजेरी लावल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.मात्र, शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, तालुक्याची जीवन वाहिनी गोमाई नदीच्या उगम क्षेत्रात व सातपुडा पर्वत रांगेत मुसळधार पाऊस झाल्याने यंदाच्या हंगामात पहिल्यांदा नद्यांना पूर आला आहे. तालुक्यात एकूण सरासरीच्या केवळ ३७ टक्के पाऊस झाल्याने पाणी टंचाईची चिंता व्यक्त केली जात आहे.



शहरासह तालुक्यात अवकाळीने मे महिन्यात जोरदार हजेरी लावली. परिणामी यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल, असा अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात होता. मात्र, १५ जून ते १५ ऑगस्टदरम्यान पाऊस झाला नसल्याने सर्वत्र चिंता व्यक्त केली जात होती. शनिवारी व रविवारी कोसळलेला पाऊसही मध्यम स्वरुपाचा असल्याने पिकांच्या पोषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मध्यप्रदेशातील मुसळधार पावसामुळे शहादा तालुक्यातून वाहणाऱ्या गोमाई नदीच्या उपनद्या सुखनाई, वाकी आणि सुसरी नदीला पावसाळ्यात पहिल्यांदाच पूर आला आहे. गत दोन महिन्यांपासून दमदार पाऊस नसल्याने सुसरी, उमरी, वाकी, सुखनाई नद्या कोरड्याठाक होत्या. परंतु, शनिवारी मध्यरात्रीपासून मध्य प्रदेशाच्या खेतिया, मेलन पानसेमलसह सातपुड्याच्या पर्वत रांगेत पावसाने जोरदार हजेरी लावली होती. यामुळे सुखनाई, गोमाई, सुसरी, वाकी नद्या दुथडी भरुन वाहत आहेत.या नद्यांना पूर आला असला तरी तरी इतर नदी,धरणांच्या पाणी पातळीत वाढ झालेली नाही.

यंदाच्या श्रावण महिन्यातही पाऊस नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. परिणामी काही ठिकाणी पिके वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शनिवारी व रविवारी मध्यम पावसानंतरही पिकांवरचे संकट कायम आहे. गोमाई नदीला पूरामुळे ३ नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. सोमवारी पावसाने विश्रांती घेतल्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांसह नागरिक आहेत.